

महात्मा फुले स्मृतिशताब्दी

# महात्मा फुले आणि धर्म

MR 891.461 5
Sa 38 M

आ. ह. साळुंखे

INDIAN INSTITUTE
OF
ADVANCED STUDY
LIBRARY, SHIMLA

# महात्मा फुले आणि धर्म

आ. ह. साळुंखे

लोकवाङ्मय गृह

**महात्मा फुले आणि धर्म** / आ. ह. साळुंखे

म / १०३३
© आ. ह. साळुंखे
दुसरी आवृत्ती : मार्च १९९८
तिसरी आवृत्ती (I) : मे २००१
चौथी आवृत्ती (I) : नोव्हेंबर २००२
पाचवी आवृत्ती (I) : नोव्हेंबर २००३
सहावी आवृत्ती (I) : जानेवारी २००५
सातवी आवृत्ती (I) : मे २००६
आठवी आवृत्ती (I) : डिसेंबर २००७

Library IIAS, Shimla
MR 891.461 5 Sa 38 M
00124306

मुखपृष्ठ : कमल शेडगे

MR
891.4615
Sa 38 M

मूल्य : २० रुपये

124306
31.3.08

मुद्रक/प्रकाशक
प्रकाश विश्वासराव
लोकवाङ्मय गृह
भूपेश गुप्ता भवन
८५, सयानी रोड, प्रभादेवी
मुंबई - ४०० ०२५

मुद्रणस्थळ
न्यू एज प्रिंटिंग प्रेस
भूपेश गुप्ता भवन
८५, सयानी रोड
प्रभादेवी
मुंबई - ४०० ०२५

Library IIAS, Shimla
MR 891.461 5 Sa 38 M
00124306

# मनोगत

१८२७-१८९० या कालखंडात होऊन गेलेले जोतीराव गोविंदराव फुले म्हणजे 'बोले तेसा चाले' या वचनाचा भारताच्या ज्ञात इतिहासातील एक उत्तम आदर्श होय. दुसरीकडे 'धर्म' ही मानवजातीच्या इतिहासातील एक अत्यंत प्रभावी संकल्पना होय.

व्यक्ती तितक्या प्रकृती असे म्हणतात. त्याच धर्तीवर व्यक्ती तितके धर्म असेही म्हणणे शक्य आहे. याचा अर्थ आपापले अनुभव, चिंतन, उद्देश इत्यादींना अनुसरून धर्माविषयी विविध लोकांच्या विविध भूमिका असतात. त्यांपैकी परस्पर विरुद्ध अशा दोन टोकांच्या भूमिकांचा उल्लेख पुढीलप्रमाणे करता येईल. हे सर्व दुःखाचे मूळ असल्यामुळे तो उखडून फेकून दिला पाहिजे, असे काहींना वाटत असते. 'धर्म' हा शब्द कानांवर पडला तरी या लोकांच्या तळपायची आग मस्तकाला जाते. याउलट, धर्म हा समाजधारणा करीत असल्यामुळे प्रसंगी आपले वा दुसऱ्याचे रक्त सांडूनही त्याचे रक्षण केले पाहिजे, असे काहींना वाटत असते. 'धर्म' हा शब्द कानांवर पडला, तरी त्यांच्या चित्तवृत्ती उल्लसित होतात, उत्तेजित होतात. या दोन भूमिकांच्या मधे आणखी असंख्य भूमिका असतात. आपल्यापुढे आता प्रश्न आहे तो असा : यांपैकी महात्मा फुल्यांची धर्माविषयीची भूमिका नेमकी कोणती होती?

अगदी संक्षेपाने ही भूमिका अशी सांगता येईल : त्यांनी धर्म नाकारला, त्याचा तिरस्कार केला, हे खरे आहे; पण हेही तितकेच खरे आहे, की त्यांनी धर्म स्वीकारला, त्याचा पुरस्कार केला. त्यांच्या भूमिकेबद्दलची ही विधाने प्रथमदर्शनी आपणाला विसंगतच नव्हे, तर चमत्कारिकही वाटतील. परंतु प्रत्यक्षात त्यांमधून अत्यंत सुसंगत असे एक सत्य व्यक्त होते. कारण फुल्यांनी नाकारलेल्या पदार्थाचे व स्वीकारलेल्या पदार्थाचे 'धर्म' हे एकच नाव असले, तरी त्या दोन पदार्थांचा आशय एकमेकांपासून फार वेगळा आहे. प्रस्तुत पुस्तक म्हणजे त्यांनी नाकारलेल्या व

स्वीकारलेल्या धर्माचे स्वरूप स्पष्ट करण्याचा एक प्रयत्न होय.

या पुस्तकाची मांडणी करताना विविध ग्रंथांतून व्यक्त झालेल्या. म. फुल्यांच्या धर्मविषयक विचारांचे मी एका विशिष्ट पद्धतीने वर्गीकरण केले आहे. मला स्वत:लाच मांडणीच्या आणखी काही पद्धती सुचत होत्या. पण त्यांमधून मी ही पद्धत निवडली. ही मांडणी करताना फुल्यांच्या स्वत:च्या विचारांवर लक्ष केंद्रित व्हावे, अशी इच्छा असल्यामुळे इतरांनी त्यांच्या विचारांवर केलेल्या भाष्यांची आणि विशेषत: फुल्यांच्या विचारांवर घेण्यात आलेल्या आक्षेपांची चिकित्सा करणारा एक सर्वसमावेशक असा स्वतंत्र ग्रंथ होण्याची मात्र आवश्यकता आहे. श्री. हरी नरके यांचे अलीकडचे पुस्तक हे त्या दिशेने टाकलेले एक चांगले पाऊल आहे, असे मला वाटते. तसे म्हटले तर आणखी दोन पुस्तकांचीही मला गरज वाटते. फुल्यांनी धर्मशास्त्रांतील असंख्य सिद्धान्तांवर आपली प्रतिक्रिया नोंदविली आहे. त्यांच्या अशा सर्व विधानांना धर्मशास्त्रातील जी वचने कारणीभूत झाली, त्यांचे साकल्याने व साधार विवेचन करणारे पुस्तक, हे त्यांपैकी एक होय आणि प्राचीन भारतातील चार्वाकादींच्या तत्त्वज्ञानाशी फुल्यांच्या विचारांची तुलना करणारे पुस्तक, हे दुसरे होय.

प्रस्तुत पुस्तकातील लेखनाच्या ओघात मी फुल्यांच्या विचारांवर जागोजागी अभिप्राय व्यक्त केले असले आणि आवश्यक तेथे समर्थन, स्पष्टीकरण वगैरे केले असले तरी त्यांच्या धर्मविषयक विचारसरणीचे तिच्या यशापयशासह समग्र मूल्यमापन करण्याचा प्रयत्न मात्र केलेला नाही. त्यांच्या स्वत:च्या विचारांचा परिचय करून देणे हाच प्रमुख हेतू असल्यामुळे ही मर्यादा आखून घेतली आहे.

पुस्तकात अवतरणांचे प्रमाण काहीसे अधिक झाले आहे. फुल्यांचे विचार त्यांच्याच शब्दांत मांडणे अधिक उचित, असे अनेक मुद्द्यांच्या बाबतीत जाणवत गेल्यामुळे असे झाले आहे. अवतरणे निवडताना काही वेळा मूळ वचने तोडून वेगवेगळ्या ठिकाणी उद्धृत केली आहेत, तर काही वेळा वेगवेगळ्या ठिकाणची वचने एकत्रित आणली आहेत. असे करताना फुल्यांच्या मूळ विचारांची गुंफण एका विशिष्ट पद्धतीने होईल, परंतु त्यांचा आशय विकृत होणार नाही, याची शक्य तितकी काळजी घेतली आहे. काही ठिकाणी पुनरुक्ती झाली आहे. ती टाळता आली नसतीच, असे नाही. परंतु तसे करण्यामुळे कदाचित काही ठिकाणी तुटकपणा आला असता. तो टाळण्यासाठी पुनरुक्तीचा पर्याय स्वीकारला. काही मुद्द्यांचे विवेचन त्यांच्या महत्त्वाच्या प्रमाणापेक्षा कमी वा अधिक झाले असण्याची शक्यता आहे. संदर्भाचा मारा करण्यापेक्षा मोजके संदर्भ देणे पसंत केले आहे. आणखीही त्रुटी वा मर्यादा असतील, याची मला जाणीव आहे. अशा प्रकारच्या पुस्तकात मूळ आधाराविना काही लिहू नये, असा आदर्श सांगणाऱ्या 'नामूलं लिख्यते किंचित्' या वचनाचे पालन

करण्याचा शक्य तितका प्रयत्न मी केला आहे, एवढेच मी माझ्या बाजूने म्हणू शकेन.

गेले काही महिने जणू काही म. फुल्यांच्या सहवासात राहत होतो. हा सुखद अनुभव ॲड. गोविंद पानसरे, श्री. नारायण सुर्वे आणि डॉ. अशोक चौसाळकर यांच्यामुळे मिळाला. या 'सुहृदांचा' मी अत्यंत ऋणी आहे. हे पुस्तक प्रकाशित केल्याबद्दल मी 'लोकवाङ्मय गृहा'चाही ऋणी आहे.

**आ. ह. साळुंखे**
लोकायत
१३ यशवंत नगर
गेंडा माळ
सातारा - ४१५ ००२

# १. व्रजापेक्षाही कठोर, फुलापेक्षाही हळुवार

## विचार करा

म. फुल्यांची धर्मविषयक विचारसरणी समजून घेण्यासाठी पार्श्वभूमी म्हणून काही महत्त्वाच्या बाबी ध्यानात घेणे आवश्यक आहे.

*अशा वर्तनाने सर्वांसुख द्याल ।*
*स्वत: सुखी व्हाल जोती म्हणे ।।*[१]

किंवा

*बुद्धिसामर्थ्याने सुख द्यावे घ्यावे ।।*[२]

असे त्यांनी म्हटले आहे. स्वत:सह इतरांना सुखी करणारे हे बुद्धिसामर्थ्य, सारासारबुद्धी वा सदसद्विवेक ईश्वराने (फुल्यांच्या भाषेत निर्मिकाने) सर्व मानवांना दिला आहे, असा त्यांचा विश्वास होता. या बुद्धीचा चांगला उपयोग केला पाहिजे, असे त्यांना वाटत असे. म्हणूनच आमचा आम्ही विचार केला पाहिजे, असे ते म्हणत असत. ज्यांच्या बाजूने ते लढत होते, त्यांनादेखील ते विचार करण्याचा हा सल्ला सतत देत असत. विचार करा, शोध घ्या, अशा प्रकारची विधाने त्यांच्या लेखनात इतस्तत: आढळतात. बुद्धी वा विद्वता पिढीजात नसल्यामुळे प्रत्येक जण विचार करू शकतो, असे त्यांचे सांगणे होते. ते ज्यांच्याविरुद्ध लढत होते, त्यांनीही न्यायाचा विचार करावा, असे ते सांगत असत.

या बुद्धीचे लक्षण सांगताना ते म्हणतात,

*खरे हेच ज्ञान आत्मपरीक्षण ।*
*बुद्धीचे लक्षण जोती म्हणे ।।*[३]

या आत्मपरीक्षणाचे महत्त्व सांगण्यासाठी त्यांनी तेरा 'अखंड' लिहिले आहेत.[४] आपल्याकडे मोक्षप्राप्तीसाठी आत्मज्ञानाची महती सांगणारी वेदांतासारखी दर्शने आहेत. परंतु फुल्यांनी स्वत:चे गुणदोष ओळखणे, या अर्थाने आत्मज्ञानाचे महत्त्व सांगितले आहे. बुद्धीचा उपयोग व्यक्तिगत वा जातिगत स्वार्थासाठी करून नये, असे त्यांना वाटे.

## घ्यायचे-द्यायचे माप एक

त्यांच्या धर्मविषयक समग्र विचारसरणीचे अधिष्ठान म्हणता येईल, असे एक तत्त्व त्यांना या आत्मपरीक्षणातून मिळाले. आत्मपरीक्षण करणारा मनुष्य 'आपल्यावरून जग ओळखतो'. विशिष्ट हक्क प्राप्त झालेला आणि काही कर्तव्यांशी बांधिलकी असलेला समाजाचा एक जबाबदार घटक म्हणून वागायचे असेल, तर इतरांनी आपल्याशी जसे वागावे अशी आपली इच्छा असेल, तसेच आपण स्वत:देखील इतरांशी वागले पाहिजे, अशी त्यांची नैतिक धारणा होती. आपले घ्यायचे माप व द्यायचे माप एकच असले पाहिजे, या विवेकावर त्यांचे विचार व आचार अधिष्ठित होते.

## हे भान हवे

त्यांचे हे आचारविचार समजून घेताना आपल्याजवळही ही सारासारबुद्धी, हे आत्मनिरीक्षण आणि हे द्यायचे-घ्यायचे एकच माप असायला हवे. पूर्वग्रह, सांस्कृतिक अहंकार, संकुचित उद्दिष्टे यांसारखी किल्मिषे दूर ठेवूनच त्यांचे मूल्यमापन केले पाहिजे.

पेशवाई नुकतीच संपली असली, तरी ब्राह्मणांचा मोठा पगडा आहे, अशा त्यांच्या काळातील धार्मिक, सामाजिक, शैक्षणिक इत्यादी प्रकारची परिस्थिती आणि आजची आपल्या अवतीभोवतीची परिस्थिती यांच्यात बरेच अंतर आहे, याचे भान आपल्याला असणे आवश्यक आहे. उदाहरणार्थ, त्यांच्या काळात विधवांचे केशवपन केले जात असे आणि ते बंद व्हावे म्हणून त्यांनी नाभिकांचा संपही घडवून आणला होता. परंतु ही अनिष्ट प्रथा आज आपल्या समाजात अस्तित्वात नसल्यामुळे आपल्याला या प्रथेमागचा दुष्टावा आणि त्याविरुद्ध फुल्यांनी पुकारलेले बंड समजून घेताना मनाने त्यांच्या काळातच गेले पाहिजे. मुसलमानांबद्दलच्या त्यांच्या भूमिकेविषयीही असेच म्हणता येईल. हिंदू आणि मुसलमान यांच्यात त्यांच्या काळी काहीच तणाव नव्हते असे नव्हे; तरीदेखील भारताची फाळणी होऊन बनलेले पाकिस्तानसारखे कोणत्या ना कोणत्या स्वरूपात इस्लामवर आधारलेले राष्ट्र फुल्यांसमोर नव्हते. पाकिस्तानने पंजाब, काश्मीर इत्यादी ठिकाणी अतिरेक्यांना नाना प्रकारची मदत देऊन भारतासमोर उभे केलेले प्रश्न त्यांच्या काळात नव्हते. किंवा अशाच अन्य काही कारणांनी हिंदू आणि मुसलमान या समाजांमध्ये परस्परांविषयी निर्माण झालेला कटुपणा वा गैरसमज त्यांच्या काळात नव्हते. हिंदूंमधील अंतर्गत प्रश्नांकडे वळलो, तर बेकारी, राखीव जागा इत्यादींमुळे निर्माण झालेले तणाव नव्हते. सांगण्याचा हेतू हा, की त्याचे विचार त्यांच्या काळातील परिस्थितीच्या संदर्भातच समजून घेतले पाहिजेत.

## मर्यादा

त्यांचे धर्मविषयक आचारविचार चिकित्सेसाठी सर्वांना खुले आहेत, यातही काही संशय नाही. मानवी कर्तृत्वाला मर्यादा असतात, याचे स्वत: त्यांनाही भान होतेच. त्यांच्या या मर्यादांचा शोध घ्यायचा, तर त्यांच्या लेखनात शब्दरचनेच्या बाबतीत काही वेळा शिथिलता, संदिग्धता वा विसंगती आढळते, असे म्हणता येईल. परंतु या उणिवांना फार महत्त्व देण्याचे मुळीच कारण नाही. त्यांच्या विचारात आशयाच्या बाबतीत खटकणारा भाग मात्र क्वचितच आढळतो. अशा खटकणाऱ्या एक-दोन बाबींचा येथे निर्देश करता येईल.

त्यांनी एका 'अखंडा'मध्ये केलेले मानवी शरीराचे वर्णन[५] साधुसंत वगैरेंनी केलेल्या परंपरागत वर्णनाशी जुळणारे आहे. खरे तर जगाला व संसाराला पवित्र मानणाऱ्या फुल्यांनी शरीरालाही पवित्रच मानायला हवे होते. वेदांनी वगैरेंनी केलेली शरीराची निंदादेखील खरे तर चुकीचीच आहे. परंतु ते आत्म्याला पवित्र असे एकमेव सत्य मानत असल्यामुळे त्यांनी केलेली शरीराची निंदा त्यांच्या तत्त्वज्ञानाशी तरी सुसंगत असते. परंतु 'कुडीविणा आत्मा' अस्तित्वात नसतो, असे म्हणणाऱ्या फुल्यांनी शरीराचे केलेले हे वर्णन मात्र खटकते. तसेच कोणा धर्मगुरूंनी अशा नाशवंत व घाणीचे आगर असलेल्या शरीरात ईश्वराचे अस्तित्व कल्पिले म्हणून टीका करणे, हे फुल्यांच्या एकूण विचारसरणीशी विसंगतच म्हटले पाहिजे. ईश्वर निराकार असतो, अशी त्यांची धारणा असल्यामुळे तो साकार शरीरात असणार नाही असे त्यांनी मानले, तर ते समाजण्यासारखे आहे. परंतु त्यासाठी शरीराची अशी निंदा करणे, हे मात्र आवश्यक नव्हते. अशीच एक विसंगती शिवाजी महाराजांवरील त्यांच्या पोवाड्यातही आढळते. या पोवाड्यात त्यांनी वेगवेगळ्या संदर्भात 'गेला जन्नत स्वर्गास', 'निघून गेला स्वर्गास', 'काळाला हूल देऊन स्वत: गेला स्वर्गाला' इत्यादी प्रकारची विधाने केली आहेत. युद्धात मरण पावलेले बाजी प्रभू देशपांड्यांसारखे योद्धे अथवा आयुष्यभर सत्कर्म केलेले शिवाजींसारखे महापुरुष स्वर्गाला जातात, अशी परंपरागत धारणा आहे. फुले परलोकाच्या स्वरूपातील परंपरागत स्वर्गाचे अस्तित्व मानत नाहीत. अशा स्थितीत ते बाजी प्रभू वगैरे स्वर्गाला गेल्याचे वर्णन करतात तेव्हा ह्यामध्ये विसंगती जाणवते. वकिली पद्धीने युक्तिवाद करायचे म्हटले, तर या मुद्द्यावरही त्यांचे समर्थन करता येईल. कारण फुल्यांनी 'स्वर्ग' ही संकल्पना मुळातूनच नाकारलेली आहे, असे नाही. इहलोकीच स्वर्ग असतो, असे त्यांनी मानलेले आहे. त्यामुळे शिवाजी वगैरे स्वर्गाला गेले, याचा अर्थ त्यांचे जीवन इहलोकीच कृतार्थ झाले, असा लावणे शक्य आहे. शब्दावर बोट ठेवून बोलायचे झाल्यास तो चुकीचाही नाही. परंतु या समर्थनानंतरही मनात कोठेतरी असमाधानाची भावना राहते. हा पोवाड लिहिताना फुले

नकळत पोवाड्यांच्या रचनेमध्ये नेहमी आढळणाऱ्या सांकेतिक वर्णनांच्या चाकोरीत अडकले, असे दिसते. तत्त्वज्ञानाची परिपक्व अशी बैठक तयार होण्यापूर्वी हा पोवाडा लिहिला गेला असला, तर त्यांच्या लेखनावर कविसंकेताचा असा प्रभाव आढळणे स्वाभाविक म्हणता येईल. अर्थात, त्यांच्या या लेखनामुळे 'स्वर्गा'विषयीच्या त्यांच्या संकल्पनेबद्दल कोणताही संभ्रम निर्माण होणार नाही, इतकी त्यांनी ती अन्यत्र स्पष्ट केली आहे.

## शेतकऱ्यांचेही उद्धारकर्ते

फुल्यांविषयी समाजाच्या विविध गटांत जाणीवपूर्वक गैरसमज निर्माण करून देण्याचे अनेक प्रयत्न झाले आहेत. या प्रयत्नांचे भान ठेवून त्यांची भूमिका समजून घेतली पाहिजे. उदाहरणार्थ, त्यांनी मांग, महार इत्यादी अस्पृश्यांसाठी जीवाचे रान केले, याचा अर्थ हिंदू धर्मातील इतरांविषयी त्यांना कळकळ नव्हती, असे नाही. 'शेतकऱ्याचा असूड' व अन्य लेखनातून त्यांनी शेतकऱ्यांच्या समस्या व त्यांवरील उपाय यांचे सखोल व अनेक बाजूंनी पोटतिडकीने विवेचन केले आहे. ते पाहता ते केवळ स्त्रीशिक्षण वगैरे क्षेत्रातील पहिले भारतीय क्रांतिकारक होते असे नाही, तर शेतकऱ्यांच्या उद्धारासाठी धडपणारे पहिले क्रांतिकारकही होते, याविषयी संशय राहत नाही.

## तेजोभंग नव्हे

धर्मविषयक विचार मांडताना फुल्यांनी हिंदू धर्मव्यवस्थेतील गुणदोषांना मोठ्या प्रमाणात जबाबदार असलेल्या ब्राह्मणांवर जी तिखट टीका केली आहे, ती आपण नजरेआड करू शकत नाही. तिची सर्वांगीण कारणमीमांसा वा तिच्या औचित्याचे समग्र मूल्यमापन करण्याचे हे स्थळ नव्हे. तरीही मन पूर्वग्रहरहित असण्यासाठी काही मुद्दे संक्षेपाने येथे नोंदवितो. विशिष्ट व्यक्ती ब्राह्मण जातीतील आहेत, एवढ्याच कारणासाठी फुल्यांनी त्यांच्यावर ही टीका केलेली नाही. धर्माचा दुरुपयोग करणाऱ्या ब्राह्मणांवर त्यांनी प्रहार केले, परंतु न्यायाच्या बाजूने येणाऱ्यांविषयी आत्मीयता दाखविली, याचे विवेचन पुस्तकात येईलच. त्यामुळे त्यांच्या टीकेतील 'ब्राह्मण' शब्द पाहून आजच्या ब्राह्मण व्यक्तींनी बिचकून जाण्याचे वा ती टीका आपल्यावर ओढवून घेण्याचे कारण नाही. तथापि आपण सांस्कृतिक अहंकाराच्या बाजूने उभे राहणार की न्यायाच्या बाजूने उभे राहणार, याचा निर्णय विवेकपूर्वक घेण्याची मात्र आवश्यकता आहे. ज्यांना त्यांची टीका झोंबते, त्यांनी त्या टीकेच्या जोडीने 'मनुस्मृती'सारखे धर्मग्रंथ वाचण्याची आणि त्या आधारे त्यांची टीका न्याय्य आहे की अन्याय्य आहे, याचा

तटस्थपणे निर्णय घेण्याचीही आवश्यकता आहे. पूर्वी ज्यांनी शोषण केले, त्यांच्या वंशजांचे आता शोषण करावे वा त्यांच्यावर अन्याय करावा, अशी सुडाची भावना फुल्यांच्या मनात अजिबात नव्हती, याचीही दखल घेतली पाहिजे.

जे जे अनिष्ट, संकुचित वगैरे वाटले ते ते त्यांनी आपल्या धारदार टीकेचा विषय बनविले. त्यांची ही टीका म्हणजे आपला तेजोभंग आहे, असे कोणी मानण्याचे कारण नाही. त्यांनी ज्या गोष्टींवर टीका केली, त्या तेजस्वरूप नव्हत्याच. त्या तमस्वरूप होत्या. म्हणजेच फुल्यांनी तमोभंग केला आणि तमोभंग हा तेजोभंग नसून ती तेजाची निर्मिती असते, हे विसरता कामा नये.

## टीका गतार्थ, फुले कृतार्थ

त्यांनी ज्या गोष्टींवर टीका केली, त्यांपैकी अनेक गोष्टी गेल्या शे-दीडशे वर्षांत आपल्या समाजाने टाकून दिल्या. ज्या टाकून दिल्या नाहीत, त्या टाकून देणे इष्ट आहे, असे आपण निदान जाहीररीत्या तरी बोलत असतो. याचा अर्थच असा की त्यांनी केलेली टीका ही समाजाची निकोप जडणघडण होण्याच्या दृष्टीने विधायक अशीच होती. त्यांनी ज्या अनिष्ट गोष्टींवर टीका केली, त्या अनिष्ट गोष्टी आपण टाकून दिल्यामुळे ज्या दिवशी त्यांची टीका कालबाह्य, गतार्थ होईल, त्या दिवशी खरे तर फुले धन्य, कृतार्थ झाले असे म्हणता येईल. त्यांनी केलेली कडवट टीकाही त्या कडवट टीकेला विषयच शिल्लक राहू नये असा समाज निर्माण करण्याकरता होती, हे आपण विसरू शकत नाही.

## यासाठी कठोर टीका

फुल्यांनी टाकाऊ मूल्यांवर ज्या भाषेत टीका केली, त्या भाषेवर अनेक आक्षेप घेण्यात आले आहेत. त्या सर्वांचे विवेचन येथे करायचे नसले तरी त्या संदर्भातील एखाद-दुसरा महत्त्वाचा मुद्दा येथे नोंदवायचा आहे. त्यांनी जी भाषा वापरली ती अत्यंत जाणीवपूर्वक वापरलेली आहे. भावनेच्या भरात, अविचाराने, विशिष्ट प्रसंगाची प्रतिक्रिया म्हणून किंवा अशाच एखाद्या तात्कालिक कारणाने झालेला उद्रेक असे त्यांच्या टीकेचे व त्या टीकेसाठी वापरेलेल्या भाषेचे स्वरूप नाही. धर्मांचा, संस्कृतींचा बुरखा घेतलेल्या एका अक्राळविक्राळ शक्तीशी त्यांना झुंज द्यायची होती. एका धूर्त, क्रूर, दृढमूल आणि समाजाच्या सर्व अंगांत भिनलेल्या विषारी व्यवस्थेविरुद्ध त्यांनी युद्ध पुकारले होते. हे युद्ध कोणत्या पद्धतीने लढायचे याचे काही अडाखे त्यांनी मनाशी बांधलेले होते. सुईने निघणारा काटा काढण्यासाठी तलवार वापरू नये, हे खरे; परंतु अणुस्फोटाशिवाय ज्याच्या चिंधड्या होणार नाहीत, असा किल्ला उखडून

टाकण्यासाठी सुई वापरून चालत नसते. आपल्या विरोधातील विचारांची बंडे मोडून काढण्याच्या अनेक युक्त्या आणि असंख्य साधने ज्यांच्या हातात होती, त्यांच्याशी फुल्यांना लढायचे होते. आपल्या शत्रूची बलस्थाने त्यांना ठाऊक होती. आपण कोणाशी लढतो आहोत, याचे त्यांना भान होते. गौतम बुद्धांसारख्या अलौकिक महापुरुषांच्या चळवळी ज्यांनी मोडीत काढल्या, चार्वाकासारख्या अत्यंत बुद्धिमान आणि धैर्यशील लोकांचे बंड ज्यांनी नामशेष केले आणि वेळोवेळी निर्माण झालेले लहान-मोठे विरोध ज्यांनी नेस्तनाबूत केले, त्यांच्याशी लढताना सौम्य व ऋजू भाषा उपयोगी पडणार नव्हती. फुल्यांना भिंतीला धडक द्यायची होती. परंतु ही धडक डोके फोडून घेण्यासाठी नव्हती; भिंत पाडण्यासाठी होती आणि ती पाडण्यासाठी जबरदस्त हल्ल्यांचीच आवश्यकता होती. ज्यांनी ज्यांनी सौम्य विरोध केले, त्यांना तथाकथित हिंदू संस्कृतीने पचवून संपविले. फुल्यांना स्वत:च्या बाबतीत हे होऊ द्यायचे नव्हते. म्हणूनच टीका कोणत्या भाषेत करायची, ते त्यांनी विचारपूर्वक ठरविले होते. स्वाभाविकच त्यांनी स्वत:च अशी भाषा वापरण्याचे समर्थन केले आहे. ते म्हणतात,[६]

"any one who will consider well the whole history of Brahmin domination in India, and the thralldom under which it has retained the people even up to the present day will agree with us in thinking that no language could be too harsh by which to characterise the selfish heartlessness and the consummate cunning of the Brahmin tyranny by which India has so long governed."

## आणि हळुवारपणाही

अनिष्ट गोष्टींवर त्यांनी केलेले प्रहार खरोखरच अत्यंत कठोर होते. आपल्यासमोर कोणता महापुरुष वा कोणता धर्मग्रंथ आहे, याची फिकीर केली नाही. त्याची कीर्ती, त्याच्याविषयीचा समाजातील पूज्यभाव, त्याची प्रतिष्ठा इत्यादींची पर्वा केली नाही. तो अन्याय करीत असेल, तर एखाद्या वादळाप्रमाणे ते त्याच्यावर तुटून पडले. एखाद्या जागृत ज्वालामुखीप्रमाणे टीकेचा लाव्हारस त्यांनी त्याच्यावर उधळला. परंतु हे वादळ दिशाहीन नव्हते. ज्वालामुखी विवेकहीन नव्हता. त्यांची ही सगळी आक्रमकता अनिष्टाला उखडून टाकण्यासाठी होती. बाहेरून ज्वालामुखीप्रमाणे वाटणाऱ्या या माणसाच्या अंत:करणांत या देशातील स्त्रिया आणि शूद्रादी-अतिशूद्र समाज यांच्याविषयी अपार करुणा होती, विलक्षण हळुवारपणा होता. म्हणूनच भवभूतीने एका वेगळ्या संदर्भात लोकोत्तर व्यक्तींचे जे वर्णन केले आहे, ते फुल्यांनाही लागू पडणार आहे.

*वज्रादपि कठोराणि मृदूनि कुसुमादपि ।*
*लोकोत्तराणां चेतांसि को हि विज्ञातूमर्हति ।।*

वज्रापेक्षा कठोर आणि फुलापेक्षाही हळुवार अशी लोकोत्तर व्यक्तींची मने कोण बरे जाणू शकतो?

या प्रश्नाला 'आम्ही जाणू शकतो' असे आचरणाच्या आधारे सार्थपणे उत्तर देण्याइतका विवेक आम्हा भारतीयांमध्ये निर्माण होणे ही फुल्यांना खरी श्रद्धांजली ठरेल.

■

# २. हिंदू समाजाची रचना

## स्वधर्मद्रोही?

डॉ. बाळ गांगल यांनी अलीकडेच म. फुल्यांचे विशिष्ट पद्धतीने मूल्यमापन करण्याचा प्रयत्न केला आहे. त्यांनी फुल्यांचे वर्णन अव्वल दर्जाचा स्वधर्मद्रोही, हिंदू धर्माबद्दल आत्यंतिक द्वेष बाळगणारा, स्वजनद्रोही, देशद्रोही इत्यादी शब्दांत केले आहे. याचा अर्थ फुल्यांनी हिंदूंच्या धर्माशी, समाजाशी आणि देशाशी द्रोह केला, असा होतो. द्रोह कशाला म्हणावे याविषयी डॉ. गांगलांची जी काही कल्पना असेल, ती असो. या बाबतीत मी असे म्हणेन की समाजाच्या हिताची निकोप मूल्ये मानणाऱ्या स्वतःच्या धर्माशी, समाजाशी वा देशाशी व्यक्तिगत व जातिगत स्वार्थ वगैरेंसाठी कोणी बेइमानी केली, तर तो द्रोह होय. फुल्यांनी अशा पद्धतीचा द्रोह जर खरोखरच केलेला असेल, तर डॉ. गांगलांची टीका रास्त म्हणता येईल. आता, त्यांनी असा द्रोह केला आहे की नाही, हे व्यक्तिगत अथवा जातिगत रागलोभ बाजूला ठेवून आणि निःपक्षपाती निकषांच्या आधारे त्यांचे चरित्र, कार्य वगैरेंची चिकित्सा करून ठरविता येईल. ही चिकित्सा नीट करता यावी, म्हणून हिंदू धर्म मानणाऱ्या समाजाची रचना कशी झालेली होती, हे समजून घेणे आवश्यक आहे.

## दोन वर्ण

धर्मशास्त्रानुसार हिंदू धर्म हा वर्णाश्रमधर्म म्हटला जात असे. वर्ण आणि आश्रम या दोहोंपैकी 'वर्णा'ची संकल्पना समाजरचनेच्या दृष्टीने अधिक महत्त्वाची आहे. हिंदू समाज ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य व शूद्र या चार वर्णांत विभागला होता. हे चातुर्वर्ण्य ईश्वराने निर्माण केल्याच्या असंख्य कथा आढळतात. कलीयुगात मात्र ब्राह्मण व शूद्र असे दोनच वर्ण उरले आहेत, असे धर्मशास्त्रे सांगतात. याचा अर्थ क्षत्रिय व वैश्य यांचा शूद्र वर्णातच अंतर्भाव झाला आहे. त्यामुळे सध्याच्या हिंदू समाजात एका बाजूला ब्राह्मण आणि दुसऱ्या बाजूला शूद्र असे एकमेकांपासून वेगळे असलेले दोन वर्ण आहेत.

या विभागणीमागची धर्मशास्त्रांची उच्चनीचतेची भूमिका फुल्यांना मान्य नसली तरी समाजाचे असे दोन विभाग अस्तित्वात असल्याची वस्तुस्थिती त्यांना मान्य आहे. त्यांनी दुसऱ्या विभागाल 'शूद्र' म्हणण्याऐवजी 'शूद्रादी-अतिशूद्र' म्हटले आहे इतकचे. यांपैकी ब्राह्मणांची संख्या एकदशांश आणि इतरांची नऊदशांश असे त्यांनी म्हटले असून त्यांचे हे मत स्थूलमानाने मान्य होण्यासारखे आहे.

केवळ संख्येच्या दृष्टीने विचार करायचा, तर हिंदू समाजात नऊदशांश इतकी संख्या असलेला विभाग हा खऱ्या अर्थाने हिंदू समाज असे कोणी म्हटले, तर ती फारशी अतिशयोक्ती नव्हे. 'प्रजा म्हणजे शूद्रादी-अतिशूद्र लोक' असे फुले म्हणतातच. याउलट, हिंदू समाजाचा धर्म मात्र या दोन वर्णांपैकी ब्राह्मण वर्णाच्या हाती होता. धर्माचे नियम तयार करणे, धर्मग्रंथ लिहिणे, त्यांत बदल करणे, त्यांचा अर्थ लावणे, त्या धर्माचे नियम आचरणात येण्यासाठी आवश्यक ते उपाय योजणे, धर्मकृत्यांचे पौरोहित करणे इत्यादी बाबी ब्राह्मणांच्या हाती होत्या. या सगळ्याचा परिणाम म्हणून त्यांना समाजधारणेच्या सर्व घटकांवर सर्वोच्च प्रभाव प्राप्त झालेला होता. अशा प्रभावी ब्राह्मणांनी ज्या धर्माचे नियम केले, तोच तथाकथित 'हिंदू' धर्म होय.

फुले मात्र हिंदू धर्म असा निर्देश फार कमी वेळा करतात. ज्या धर्माचे स्वरूप ब्राह्मणांनी निश्चित केले, त्याला ब्राह्मणांचा धर्म म्हणणे हेच त्यांना योग्य वाटते. अनेकदा आर्यभट्ट ब्राह्मणाचा धर्म असेही ते म्हणतात. ब्राह्मणांना आपल्या आर्यत्वाचा अभिमान असून 'भट्ट' हे पद 'कुमारिलभट्ट' वगैरेंप्रमाणे आदर व्यक्त करण्यासाठी वापरले जाते. फुले हे शब्द काही वेळा वस्तुनिष्ठ वर्णन म्हणून व काही वेळा उपहासाने वापरतात. त्यांचा तो उपहास सकारण असल्याचे पुढे स्पष्ट होईलच.

## अन्यायाने धनी

ब्राह्मणांनी वरील प्रकारचे प्रभावी स्थान कसे प्राप्त केले, याची विविध कारणे फुल्यांनी पुन:पुन्हा दाखवून दिली आहेत. 'मूळ पूर्वजांनी या देशात येऊन येथील मूळ पूर्वजांचा मोड करून त्यांस आपले दास केले', असे त्यांचे मत आहे. त्यांनी 'दंगेखोरीचा धर्म बराच गाजविला' असे ते म्हणतात. एकदा त्यांना दास बनविल्यावर नाना प्रकारच्या युक्त्या करून त्यांनी त्या दासांवर आपली मजबूत पकड बसविली. त्यासाठी धर्मग्रंथ वगैरेंना विशिष्ट स्वरूप दिले. क्रूरपणा, कडक, नियमांचा कडकडीत अंमल, फसवणूक, बुद्धिभेद, आपल्या विद्येची धास्ती बसविणे, इतरांना शिकण्यास बंदी घालणे इत्यादींचा वापर केला. "ब्राह्मण शूद्रादी-अतिशूद्रांचे अन्यायाने धनी झाले" किंवा ते "पूर्वी तरवारीच्या आणि सांप्रत ठकबाजीच्या जोराने धनी झाले" या शब्दांत फुल्यांनी ही प्रतिक्रिया स्पष्ट केली आहे.

## एक अज्ञानी, दुसरा धूर्त

वर्षानुवर्षे हे दास्य अबाधितपणे चालू राहिले, याचे कारण फुल्यांनी एका वेगळ्या संदर्भात अचूकपणे पुढील शब्दांत सांगितले आहे, "मूढ शूद्रादी-अतिशूद्रांचे अज्ञान व त्यांचा मतलबीपणा व धूर्तपणा." एकीकडे ब्राह्मणांनी मतलबीपणाने व धूर्तपणाने 'आपल्या पूर्वजांच्या दांडगाव्यास ईश्वरदत्त धर्माचे रूप देऊन' एक कृत्रिम धर्म तयार केला; तर दुसरीकडे शूद्रातिशूद्र अज्ञानामुळे ब्राह्मण सांगतील तो धर्म असे मानत राहिले. आताच्या सुधारलेल्या काळातही एखादा मनुष्य शहाण्या गृहस्थालाही लबाडीने फसवू शकतो, तर पूर्वी ब्राह्मणांच्या तडाख्यात सापडलेल्या व ब्राह्मणांनी अज्ञानी करून सोडलेल्या इतरांना ब्राह्मण फसवू शकले, यात फुल्यांच्या मते आश्चर्य वाटण्यासारखे काही नाही. आपल्या दसपट संख्या असलेल्या लोकांना ब्राह्मणांनी धुळीस कसे मिळवले अशी शंका घेतली जाईल, हे ध्यानात घेऊन त्यांनी पुढील प्रतिप्रश्न विचारला आहे, "तुम्हा हिंदुस्थानातील आर्य ब्राह्मणांसहित तुमचे दासानुदास शूद्रादी-अतिशूद्र वीस कोटी असून मूठभर महंमदी व इंग्रज लोक तुमचे भूपती कसे झाले?" दुसरीकडे त्यांनी दिलेले स्पष्टीकरण असे आहे, "एक शहाणा मनुष्य दहा अज्ञानी मनुष्यांस ताब्यात ठेवू शकतो. ती दहा अज्ञानी माणसे एकाच मताची असली तर कदाचित ते त्या शहाण्या मनुष्याचे चालू देणार नाहीत; परंतु ते दहा मतांचे असल्यास त्यांस फसविण्यास शहाण्या मनुष्यास काहीच अडचण पडत नाही." शूद्रादी-अतिशूद्रांची मने एकमेकांशी मिळू नयेत, म्हणून ब्राह्मणांनी केलेल्या युक्त्याही फुल्यांनी पुन:पुन्हा उघड करून दाखविल्या आहेत.

# बुद्धिभेद

## माणसांची कणसे

धूर्त लोक धर्माच्या आधारे अज्ञानी लोकांवर वजन टाकून त्यांचा बुद्धिभेद कसा करतात ते फुल्यांनी वारंवार स्पष्ट केले आहे. या बुद्धिभेदामागे किती दुष्टावा असतो, ते अचूकपणे व्यक्त करताना ते म्हणतात, "विषारी ते वेद अज्ञान्या डसती बिळात पळती ।। सर्पावत ।।" देव आपल्याशी बोलतो, त्याने आपल्याला दर्शन दिले इत्यादी खोट्या गोष्टी सांगून ते धूर्त लोक देवभोळ्या, धर्मभोळ्या लोकांना फसवितात. त्यांच्या मनावर कृत्रिम ठसा उमटवितात. त्यामुळे त्यांच्या ठिकाणी सारासार विचार करण्याची शक्ती राहत नाही. त्यांना आपल्या मानवी अधिकारांचा विसर पडतो. 'धर्माच्या थापीने अशी माणसांची कणसे करून टाकली आहेत,' या अत्यंत मार्मिक शब्दांत फुल्यांनी धर्माचा हा दुष्परिणाम स्पष्ट केला आहे.

शूद्रातिशूद्रांना हा दुष्परिणाम गेली किमान तीन-चार हजार वर्षे भोगावा लागला आहे. सामान्य शूद्रातिशूद्रांचे सोडा, ज्यांनी प्रस्थापित धर्मव्यवस्थेचा धूर्तपणा ओळखून तिच्यावर जबरदस्त घाव घालण्यात आपले कळतेपणीचे अवघे आयुष्य खर्ची घातले, त्या स्वत: फुल्यांवरही लहानपणी बुद्धिभेदाचा हा प्रयोग करण्यात आला होता. स्वत: त्यांनीच त्याबद्दलची हकिकत सांगितली आहे. ब्राह्मण विद्वानांच्या मसलतीवरून आपण तसले वेडेचार काही दिवस आपल्या लहानपणी करीत होतो, परंतु बारीक विचार करून लागल्यावर त्यांच्या मतलबी मसलतीचा खरा अर्थ आपल्या ध्यानात आला, असे त्यांनी म्हटले आहे.

हा दुष्परिणाम इतका मूलगामी होता, की दगलबाज्या करणे हा ब्राम्हणांचा अधिकार आहे, असे शूद्र मानू लागले. त्यांच्या 'दगलबाज्यांविषयी शूद्रांनी शंकासुद्धा घेऊ नये, हाच काय तो शूद्रांचा धर्म, अशी स्वत: शूद्रांमध्येच वहिवाट पडली. हे सगळे ज्या धारदार शस्त्रांच्या मदतीने घडवून आणले गेले, त्यांमध्ये धर्मग्रंथ, पुराणकथा, विशिष्ट तत्त्वज्ञान इत्यादींचा अंतर्भाव होता. फुल्यांनी दिलेली त्यांची काही उदाहरणे आता पाहूया.

## ही धारदार शस्त्रे

धर्मग्रंथांचे उदाहरण असे : त्यांनी मन मानेल तसे मनुसंहितेसारखे सर्वथैव स्वत:च्या हिताचे कायदे केले. त्या कायद्यांना 'विशेष वजनदारी आणण्याकरिता धर्माचे पूट' दिले. या मुक्तीद्वारे अज्ञानाच्या महासागरात गटांगळ्या खाणाऱ्या लोकांमध्ये त्या कायद्यांचा प्रसार करण्यात यश मिळविले. पुराणकथेचे उदाहरण फुल्यांच्याच शब्दांत असे : "भृगू नामक ऋषीने विष्णूच्या छातीवर लाथ मारली, तेव्हा विष्णू (त्यांच्या म्हणण्याप्रमाणे आदिनारायण) ऋषीच्या पायास श्रम झाले असतील याकरिता ते चोळू लागला, असे पुराणात घातले आहे. आता यातील भावार्थ शुद्ध आपमतलबी आहे. साक्षात आदिनारायण जो विष्णू त्याने ब्राह्मणाची लाथ सहन करून त्याचे पाय दाबिले, त्याअर्थी ब्राह्मण लाथाबुक्क्या देऊन प्राण जरी घेऊ लागले, तरी आम्ही जे शूद्र (क्षुद्र प्राणी) त्यांनी हूं-चूं करू नये, असे आमच्या मनात ठसावे, हाच या लबाडीचा उद्देश आहे." फुल्यांनी भृगूच्या कथेचा हा जो अन्वयार्थ लावला आहे, त्यात एका अक्षराचीही अतिशयोक्ती नाही.

विशिष्ट तत्त्वज्ञानाचे उदाहरण असे : 'जगी सर्व सुखी असा कोण आहे', या रामदासांच्या वचनावर फुल्यांनी अत्यंत तिखट टीका केली आहे.[१] तिचा आशय असा : निर्मिकाने निर्माण केलेले जग व संसार या गोष्टी पवित्र आहेत. परंतु रामदासांनी उपर्युक्त वचनाद्वारे शूद्रादी-अतिशूद्रांच्या मनात या गोष्टींबद्दल वीट निर्माण करण्याचा

प्रयत्न केला आहे. या लोकांनी या गोष्टी व्यर्थ मानून आणि त्यांच्याविषयी निरिच्छ होऊन त्यांचा त्याग करावा आणि त्यानंतर ब्राह्मणांनी त्यांच्यावर झोड उठवावी, म्हणून रामदासांनी तो श्लोक बुद्ध्या केला असावा. रामदासांना आपल्या जातीचा मतलब साधायचा होता. त्यामुळे त्यांना सत्य कशाला म्हणावे, ते कळले नाही. ही टीका अनुदार आहे, असे प्रथमदर्शनी कोणाला वाटेल. परंतु वस्तुस्थिती नीट समजून घेतली, तर फुल्यांच्या टीकेतील तथ्य आपल्या ध्यानात येईल. ब्राह्मण भ्रष्ट झाला तरी तिन्ही लोकी श्रेष्ठ असतो, यासारखे संकुचित व पक्षपाती विचार रामदासांनी मांडलेले असले आणि त्यामुळे फुल्यांची त्यांच्यावरील टीका पूर्णांशाने गैरलागू नसली, तरी वरील वचन लिहिताना रामदासांना व्यक्तिगत स्वार्थ साधायचा नव्हता आणि त्या वाक्यातून प्रस्तुत संदर्भात त्यांना अभिप्रेत असलेला अर्थ काही वेगळा असण्याची शक्यता आहे, असे चर्चेसाठी गृहीत धरून आपण विवेचन करूया. तथापि 'मनुस्मृती'सारख्या ग्रंथातील विचारसरणीला फुल्यांची टीका लागू पडते, हेही ध्यानात ठेवूया.

फुल्यांच्या मते हे जग व हा संसार पवित्र आहे. 'जगामाजी सुख सारे' असे ते म्हणतात. याउलट, हिंदू धर्मातील अनेक संप्रदायांनी लोकांच्या मनात जगाविषयी तिटकारा निर्माण करून परलोकातील काल्पनिक सुखांचे स्तोम माजविले आहे. मायावादासारख्या दर्शनांनी तर वास्तव जग हे मिथ्या मानले असून काल्पनिक ब्रह्म हेच अंतिम आणि एकमेव सत्य असे मानले आहे. या दर्शनाविषयी पूज्यभाव असलेला ब्राह्मण लोक स्वर्ग, मोक्ष इत्यादी पारलौकिक सुखांचा गौरव करतात आणि जग दु:खांनी भरले आहे, असे म्हणतात. परंतु स्वत: मात्र जगातील सर्व ऐहिक सुख उपभोगत राहतात. त्यासाठी सात्त्विक नीतिमत्ता धाब्यावर बसवितात. स्वत: श्रम करून सुखोपभोग मिळविण्याऐवजी इतरांचा संपत्तीवरचा अधिकार उडवून ते सुखोपभोग मिळवितात. मनुस्मृतीमधला केवळ एक सिद्धान्त पाहिला तरी हे स्पष्ट होईल. तो सिद्धान्त[१०] असा : "या जगात जे काही आहे, ते सर्व ब्राह्मणांचे स्वत:चे आहे. श्रेष्ठत्वामुळे व कुलीनतेमुळे ब्राह्मण ते सर्व घेण्यास पात्र असतो. ब्राह्मण स्वत:चेच खातो. स्वत:चेच परिधान करतो. स्वत:चे दान करतो. (त्याने इतरांचे अन्न खाल्ले तरी ते त्याचे स्वत:चेच असते. इतरांचे वस्त्र परिधान केले तरी ते त्याचे स्वत:चेच असते. इतरांचे घेऊन दुसऱ्यांना दिले, तरी ते त्याच्या स्वत:च्या पदार्थांचेच दान असते.) इतर लोक ब्राह्मणाच्या दयेमुळे या सगळ्याचा उपभोग घेतात. (इतरांनी स्वकष्टार्जित वस्तूंचा उपभोग घेतला, तरी तो ब्राह्मणाच्या वस्तूंचा उपभोगच ठरतो. त्याने त्या वस्तू दयाबुद्धीने न वापरल्यामुळे इतरांना त्यांचा उपभोग घेता येतो.)

जगात दु:ख आहे असे ब्राह्मणांना खरोखरच वाटत असते, तर त्यांनी इतरांचा कष्टपूर्वक मिळविलेल्या संपत्तीवरचा हक्क उडवून तो स्वत: बळकविण्याचा असला

सिद्धान्त का बरे मांडला असता? या सिद्धान्ताचा अर्थच असा की, या जगात सुख आहे हे त्यांना माहीत होते आणि ते इतरांनी न भोगता फक्त आपणालाच जास्तीतजास्त मिळावे, अशी त्यांची धडपड होती. स्वाभाविकच फुल्यांची टीका पूर्णपणे रास्त आहे. अर्थात, 'मनुस्मृती'सारख्या ग्रंथाचे समर्थन करण्याचा जो एक चमत्कारिक प्रकार हल्ली चालू आहे, तो स्वीकारला तर फुल्यांची टीका चुकीची ठरविण्यासाठी पुढील युक्तिवाद करता येईल : या जगात दु:ख आहे. परलोकात सुख आहे. सर्व लोकांचे दु:ख नष्ट होऊन त्यांना सुख मिळावे, अशी ब्राह्मणांना तळमळ लागलेली असते. म्हणून या जगातील सर्व वस्तू ते स्वत:कडे घेतात. त्यांनी त्यांचा उपभोग घेतला, तरी तो सुखाचा नसतो. उलट दु:खकारक असतो. अशा रीतीने लोकांची दु:खातून सुटका होते आणि ते दु:ख ब्राह्मण लोक परोपकारी भावनेने स्वत: सोसत राहतात, असा युक्तिवाद केला जाईल, हे माझे मत मुळीच अतिशयोक्तीचे नाही. बुद्धिभेद करू पाहणारे लोक आपले युक्तिवाद नैतिक वा तर्कशुद्ध आहेत का, हे पाहत नसतात. अडाण्यांची दिशाभूल करण्याचा हेतू सफल होत असेल, तर कितीही हास्यास्पद व अविश्वसनीय वाटणारे युक्तिवाद करायला ते कचरत नाहीत, असा अनुभव आहे आणि त्यांचा हा हेतू हजारो वर्षे सफल झालाही आहे!

## मानसिक दास

शूद्रातिशूद्रांनी आपली मुले शाळेत पाठवू नयेत म्हणून त्यांना चिथावणी दिली जाई. मुले शिकल्यास धर्म बुडेल, अशी भीती त्यांना घातली जाई. स्वत: फुल्यांच्या वडिलांनाही अशी चिथावणी देण्यात आली होती. 'भाकड पुराणांची पारायणे करून शेतकऱ्यांच्या सुनाबाळांस नादी लावून शेतकऱ्यांना लुबाडले जाते. या सगळ्याचा परिणाम म्हणून ब्राह्मण हे ज्ञानसंपन्न, धर्मनिष्ठ, नीतिमान वगैरे आहेत', अशी आत्यंतिक पूज्यबुद्धी शूद्रातिशूद्र बाळगू लागतात. तात्पर्य, त्यांची स्वतंत्रपणे विचार करण्याची क्षमता पूर्णपणे नष्ट होते. त्यांना 'मानसिक दास बनविले जाते.'

या दासांना आपल्या हितसंबंधांच्या रक्षणासाठी वापरले जाते. ब्राह्मण सांगतील ते आपले शत्रू वा मित्र अशी त्यांची भावना बनते. उदाहरणार्थ, त्यांची मने मुसलमान, ख्रिस्ती वगैरेंविषयी कलुषित केली जातात. त्यांना त्यांच्याशी तुंबळ लढाया लढायाला प्रवृत्त केले जाते. स्वत: मात्र 'स्वस्थ बिनघोर लटकेच जप अनुष्ठान' करण्याचा मार्ग स्वीकारला जातो. जे आपल्याशी अन्यायाने वागत असतील, त्यांच्याशी स्वत:च्या बुद्धीने वैर करणे वेगळे आणि बुद्धिभ्रष्ट होऊन दुसऱ्याच कोणाच्या तरी हितसंबंधांचे रक्षण करण्यासाठी लढत राहणे वेगळे. स्वत: फुल्यांनी जे वेडेचार केल्याचा पूर्वी उल्लेख केला आहे, ते वेडेचार त्यांचे मन ब्राह्मणांनी इंग्रज सरकारविषयी कलुषित केल्यामुळे त्यांच्याकडून झाले होते.

ब्राह्मणांचे रक्षण करण्यासाठी प्राण अर्पण करणे हा आपला धर्म असल्याचे धर्मशास्त्र्यांनी शूद्रातिशूद्रांच्या मनावर पक्के बिंबवले असल्यामुळे ते आपला जीव धोक्यात घालून त्यांना वाचवितात. फुले म्हणतात,[११] "भटब्राह्मणांनी आपल्या कृत्रिम धर्माची शूद्र शेतकऱ्यांवर इतकी छाप बसविली आहे, की ब्राह्मणांच्या सांगण्यावरून त्यांनी केलेले खून अथवा गुन्हे इन्साफ होतेवेळी ते ब्राह्मणांस पुढे न करता आपल्या माथ्यावर घेऊन त्याबद्दल शिक्षा भोगण्यामध्ये पुण्य मानितात."

## नारदशाही

शूद्रातिशूद्रांना इतरांशी लढायला प्रवृत्त तर केले जातेच, पण धर्माच्या वा अन्य गोष्टींच्या आधारे त्यांच्यात आपापसातही भांडणे लावली जातात. फुले म्हणतात, "शेते, बांध वगैरेसंबंधी, पोळा-शिराळशेट यांच्या डावी-उजवीसंबंधी आणि होळीची पोळी आधी लावण्यासंबंधी सर्व तंटे अज्ञानी शूद्रांत उपस्थित" केले जातात. या तंत्राला फुल्यांनी 'नारदशाही' हा अत्यंत अन्वर्थक शब्द वापरला आहे.

## उपकारकर्त्याशी तंटा

बुद्धिभेदाचा कहर कसा होतो, ते सांगताना फुले म्हणतात,[१२] "त्यांच्या उपदेशाचा बहुतेक अज्ञानी शूद्र लोकांच्या मनावर इतका दृढ परिणाम झाला आहे, की अमेरिकेतील गुलामांसारखे, ज्या दुष्ट लोकांनी त्यांस दास केले, त्यापासून सोडवून स्वतंत्रता देणाऱ्या लोकांविरुद्ध उलट्या कंबरा बांधून ते लढण्यास तयार झाले. आम्हांवर उपकार करू नका, आमची जी हल्लीची स्थिती आहे तीच बरी आहे, असे आपल्या उपकर्त्यांस सांगून तृप्त न होता त्यांजबरोबर तंटा करण्यासदेखील हे मूर्ख प्रवृत्त होतात, ही मोठी आश्चर्याची गोष्ट आहे." वस्तुत: "मनुष्याला स्वतंत्रता असणे ही जरुरीची गोष्ट आहे व ज्यास ती नाही त्यांना ती मिळवून देण्यास झटणे हे प्रत्येक सज्जनाचे कर्तव्य आहे", या भावनेने फुले शूद्रातिशूद्रांसाठी झटत होते. परंतु ब्राह्मणांनी कावेबाजी करून अज्ञानी शूद्रादीअतिशूद्रांस उलट त्यांचीच निंदा करावयास लाविले.

# एकी

## जाळ तुझी फुकी एकी

मुसलमान, ख्रिस्ती इत्यादी लोकांबरोबर संघर्ष करायचा असेल किंवा आणखी काही स्वार्थ साधायचा असेल, तेव्हा आपण सगळे हिंदू एक आहोत, असा पवित्रा ब्राह्मण लोक घेतात. इतरांची दिशाभूल करण्यासाठी एकीचे उदात्त तत्त्वज्ञान पुढे करतात. तुमचा आमचा धर्मही एक म्हणतात. परंतु अंतर्गत संबंधाचा प्रश्न येतो, तेव्हा इतर हिंदूंना ते नीच मानतात.

अशा स्थितीत ब्राह्मणांची आणि इतरांची खरीखुरी एकी होऊ शकत नाही, असे फुल्यांनी पुन:पुन्हा बजावले आहे. दिखाऊ आणि आपमतलबी एकीचा बुरखा फाडताना 'जाळ तुझी फुकी एकी' असे त्यांनी ठणकावले आहे.

## धर्मामुळे राज्य गेले

आपल्याला अनादिसिद्ध धर्माचे ज्ञान नसल्यामुळे आपली एकी नाहीशी होऊन आपले राज्य इंग्रजांच्या हाती गेले. इंग्रज लोक धर्मभोळ्या लोकांचा देशाभिमान नष्ट करीत आहेत आणि एकी केल्याशिवाय इंग्रजांना हाकलून देता येणार नाही, असे काही सुधारलेले ब्राह्मण म्हणत असत. परंतु त्यांच्या पूर्वजांना देशाभिमान ठाऊक असता, तर त्यांनी आपल्याच देशबांधवांना पशूंपेक्षा नीच मानणारे नियम केले नसते, असे फुल्यांनी सुनावले आहे. राज्य जाण्याचे खरे कारण वेगळेच आहे, हेही त्यांनी स्पष्ट केले आहे. आधी मुसलमानांनी हा देश कब्जात घेतला आणि मग इंग्रजांनी तो सहज बगलेत मारला. परंतु त्यात त्यांनी काही पुरुषार्थ केला, असे नव्हे. ब्राह्मणांच्या चुकीच्या धार्मिक कल्पनांमुळे त्यांना सहजपणे असे करता आले. याचा अर्थ राज्य गेले, याची जबाबदारी त्यांच्या धर्मावरच येते. हे स्पष्ट करताना फुले म्हणतात,[१३] "कारण, येथील एकंदर सर्व प्रजेपैकी एकदशांश ब्राह्मणांनी आपल्या कृत्रिम धर्माच्या आडून लेखणींच्या जोराने धर्म व राजकीय प्रकरणी बाकीच्या नऊदशांश लोकांस विद्या, ज्ञान, शौर्य, चातुर्य व बल याही करून हीन करून ठेविले होते."

## मोघम नाव हिंदूंचे

आपल्या देशातील उच्च-नीच भेदभावाविषयी कुरकुरण्याऐवजी एकचित्त होऊन एकी केल्याशिवाय आपल्या देशाची उन्नती होणार नाही. असे देशाभिमानाचे सोंग आणून ब्राह्मण लोक म्हणत असत. परंतु एकी होण्यामध्ये धर्माची कशी अडचण येते, हे फुल्यांनी स्पष्ट केले आहे. मांगा-महारांकडे ढुंकून पाहिले जात नाही. शेतकऱ्यांच्या मुलांना विद्या शिकण्याची बंदी आहे. गोमूत्राला तीर्थ मानले जाते, पण माणसांना नीच मानले जाते. देवळातील मूर्तीला शेतकऱ्यांला स्पर्शही करू दिला जात नाही. रोटी-बेटी व्यवहार होत नाही. आपल्याच लोकांना भेदभावाची वागणूक देणाऱ्या ब्राह्मणांपेक्षा 'परधर्मी युरोपियन खासे म्लेच्छ लाख वाट्याने दयाळू' मानले पाहिजेत. कारण त्यांनी ब्राह्मणांना आणि शूद्रांच्या अनाथ मुलांनाही इंग्रजी शिकविल्यामुळे ते गोऱ्या कामगारांच्या बरोबरीने "सरकारी हुद्यावर डुरक्या फोडीत आहेत." याउलट ब्राह्मणांची एकीची भाषा मात्र स्वार्थावर आधारित आहे. फुले म्हणतात,[१४] "नाही तर आर्य भटब्राह्मणांची कामापुरती एकी आणि काम सरल्यावर तू तिकडे आणि मी इकडे.

कारण 'ये गे कोयी तुझी डोयी भाजून खाई आणि माझी डोयी ब्याला ठेवी' या जगप्रसिद्ध म्हणीप्रमाणे भटब्राह्मणांचे अघळपघळ कल्याण होणार आहे.'' दिखाऊ एकीमागे लपलेले स्वार्थ उघड करताना एका जळजळीत वाक्यात फुले म्हणतात,[१५] ''मोघम नाव हिंदूंचे आणि उपभोग घेणारे एकटे ब्राह्मण!''

## एकीच बीज - न्याय दृष्टी

फुल्यांना एकी नको होती, असा याचा अर्थ नाही. एकी केव्हा होईल, याविषयी त्यांची काही धारणा होती. न्या. रानडे यांच्यामार्फत मराठी ग्रंथकार सभेस लिहिलेल्या पत्रात ते म्हणतात,[१६] ''अहो, त्या दादांना जर सर्वांची एकी करणे असेल, तर त्यांनी एकंदर सर्व मानवी प्राण्यांत परस्पर अक्षय बंधुप्रीती काय केल्याने वाढेल, त्याचे बीज शोधून काढावे व ते पुस्तकाद्वारे प्रसिद्ध करावे. अशा वेळी डोळे झोकणे उपयोगाचे नाही. या उपर त्या सर्वांची मर्जी.'' 'गुलामगिरी' या पुस्तकाच्या प्रस्तावनेत त्यांनी हे बीज सूचित[१७] केले आहे, ''मात्र त्यांनी स्वहिताकडेच लक्ष न देता केवळ न्यायावर दृष्टी ठेवून विचार केला पाहिजे.''

ब्राह्मणांकडून केली जाणारी न्याय्य दृष्टीची ही अपेक्षा भविष्यकाळात कितपत पूर्ण होईल, याविषयी फुल्यांनी दोन्ही बाजूंनी काही अंदाज व्यक्त केले आहेत. शाळा चालविण्यासाठी त्यांनी काही ब्राह्मणांचे सहकार्य घेतले होते; परंतु कृत्रिम पुस्तकातील लबाड्या उघड करू लागल्यावर त्यांच्यात व आपल्यात शूद्रांना कितपत विद्या द्यावी यावरून बेबनाव होऊ लागल्याचा स्वानुभावही त्यांनी मांडला आहे. हजारो वर्षांचे त्यांचे वर्तन पाहता त्यांच्यात बदल होणे कठीण आहे, हे स्पष्ट करताना फुले म्हणतात, ''एकंदर सर्व मनुष्यांच्या मानवी हक्काविषयी वास्तविक विचार केला जाऊन ज्यांचे त्यांस ते हक्क त्यांच्याने खुशीने व उघडपणे देववत नाहीत, व चालू वर्तनावरून पुढेही देवविणार नाहीत.'' ते आणखी म्हणतात, ''हल्लीचे विद्वान आर्य ब्राह्मण शुद्धीवर येऊन त्याविषयी त्यांचे कधीच डोळे उघडणार नाहीत. ते आपल्यावरील पुढे येणारी अरिष्टे टाळण्याकरिता धर्म व राजकीयसंबंधी अनेक प्रकारचे थोतांडी समाज उपस्थित करून, त्यांमध्ये अज्ञानी जनांच्या व सरकारच्या डोळ्यांत माती टाकण्याकरिता नाना प्रकारच्या युक्त्या लढवितील.'' परंतु फुले निराशवादी नसल्यामुळे ''त्या त्यांच्या कल्पित युक्त्या शेवटी फूस होतील,''[१८] अशी द्रष्टेपणाची भविष्यवाणी करतात. जोपर्यंत त्यांना पश्चात्ताप होत नाही तोपर्यंत इतरांनी त्यांची सावलीसुद्धा घेऊ नये आणि त्यांच्याशी कोणत्याही प्रकारचा व्यवहार करू नये, असा अत्यंत जहाल मार्गही त्यांनी सुचविला आहे. वरवर पाहता धर्ममार्तंडांच्या हाती असलेल्या बहिष्काराच्या शस्त्रासारखाच हा मार्ग आहे. हे शस्त्र तर स्पृहणीय मानले

जात नाही. कारण आपली अधिकारशाही गाजविण्यासाठी ते त्याचा उपयोग करतात. परंतु बारकाईने पाहिले असता आपल्याला नीच मानणाऱ्या लोकांची आपल्यावर सावलीही पडू देऊ नका असे सांगणे, हे बहिष्काराच्या त्या शस्त्रापेक्षा फार वेगळे असल्याचे स्पष्ट होईल.

## सूड नाही

ब्राह्मण लोक स्वत:हून बदलेले नाहीत आणि इतरांना दास करणारे आपले ग्रंथ त्यांनी समूळ नष्ट केले नाहीत, तर परमन्यायी ईश्वर "थोड्या दिवसांत शूद्रादी-अतिशूद्रांच्या हातून परस्पर धूर्त आर्यभट्टांचा व त्यांच्या पाखंडी ग्रंथाचा धिक्कार करवील," असे भविष्य त्यांनी वर्तवले आहे. याउलट, त्यांना पश्चात्ताप झाला तर मात्र त्यांना आपलेसे केले जाईल, हे सांगताना त्यांनी म्हटले आहे,[१९] "...त्यांस पश्चात्ताप होऊन ते सर्व सत्य, शोधून सत्य वर्तणारे झाल्याबरोबर एकंदर सर्व शूद्रादी-अतिशूद्र, भिल्ल, कोळी, खोंड वगैरे लोक त्यांच्या मागील व हल्लीच्या नीच कर्माबद्दल सूड न घेता त्यांस नि:संशय क्षमा करतील... ब्राह्मण आपले थोतांडी ग्रंथ एके बाजूला फेकून एकंदर सर्व मानव-स्त्री प्राण्यांबरोबर सत्य वर्तन जेव्हा करू लागलीत, तेव्हा जगातील एकंदर सर्व मानव स्त्री-पुरुष आर्यांचे कल्याण व्हावे, म्हणून आपण सर्वांच्या निर्मिकाच्या पदापाशी लीन होऊन त्यांजविषयी मन:पूर्वक प्रार्थना करतील, यात काही संशय नाही."

## भाऊ म्हणून हवेत

जे ब्राह्मण अशा रीतीने आपल्या थोतांडी धर्माचा त्याग करायला तयार होते, त्यांना उराशी कवटाळण्याची त्यांची तयारी होती. या दृष्टीने त्यांची पुढील काही वचने पाहण्यासारखी आहेत :

*ख्रिस्त महंमद मांग ब्राह्मणासी ।*
*धरावे पोटाशी । बंधूपरी ।।*
*मानव भावंडे सर्व एकसहा ।।*
*त्यांजमध्ये आहा । तुम्ही सर्व ।।*[२०]

फुल्यांनी एकीकडे ब्राह्मणांवर अत्यंत कठोर टीका केली आहे, परंतु दुसरीकडे मानव भावंडांमध्ये त्यांचा अंतर्भाव करून भावाप्रमाणे त्यांना पोटाशी कवटाळण्याची भाषा केली आहे. ब्राह्मण शोषक म्हणून नको असले, तरी भाऊ म्हणून हवे आहेत, असा याचा अर्थ होतो. आणखी एके ठिकाणी भट्ट-भिक्षुकांस सहस्र भोजने व दक्षिणा देऊ नये काय, असा प्रश्न उपस्थित करून ते म्हणतात,[२१] "तसे नव्हे, कोणत्याही

प्रकारचा भेदाभेद न करिता एकंदर सर्व मानवांपैकी जो कोणी आपल्या कुटुंबाचे पोषण करून जगाच्या कल्याणासाठी सतत रात्रंदिवस झटत आहे, तो आर्यभट्ट भिक्षूक असो अथवा अमेरिकेतील इंडियन असो अथवा ज्याला तुम्ही नीच मानीत असा एखादा मृतप असो, तो मात्र अन्नदान घेण्यास पात्र आहे आणि तशालाच अन्नदान केल्याने निर्मिकास अर्पिले जाणार आहे.'' इतरांपेक्षा श्रेष्ठ असल्याचे समजून दक्षिणा व अन्नदान मागणाऱ्या ब्राह्मणांवर जहरी टीका करणारे फुले श्रेष्ठत्वाची भूमिका न घेणाऱ्या ब्राह्मणाला दिलेले अन्न ईश्वराला समर्पित होते, असे सांगत आहेत. अशा ब्राह्मणाला पंक्तीला घेण्याचा विचार मांडताना ते म्हणतात,

*मांगभटा ऐक्य करू बसवू पंक्तींनी ॥*[२२]

समतेने वागणारा ब्राह्मण हा इतरांप्रमाणे मानव्याची शोभा आहे हे सांगताना ते म्हणतात,

*मांग आर्य दोघे शोभा मानवांत ॥*[२३]

सत्कर्मी ब्राह्मण अत्यंत दुर्मीळ असला, तरी असा कोणी ब्राह्मण असला तर त्याच्याविषयीची आत्मीयता व्यक्त करण्यासाठी फुले म्हणतात,

*असा जगी दाव संसारी ब्राह्मण ।*
*त्याचेच चुंबन । आम्ही घेऊ ॥*[२४]

आणखी एके ठिकाणी ते म्हणतात,

*सुखे वागवावे । आर्यभट्टा ॥*[२५]

फुल्यांचे हे नुसते बोलणे नव्हते, तर तशी कृती होती. ज्या चिपळूणकरांनी आयुष्यभर फुल्यांवर वेडीवाकडी टीका केली, त्यांच्या अंत्यसंस्कारात अडचण येऊ लागली, तेव्हा ती दूर करण्यासाठी फुल्यांनीच त्यांच्या मृत्यूचे वैद्यकीय प्रमाणपत्र मिळवून दिले. अक्षरश: कडवे शत्रू म्हणता येतील अशा चिपळूणकरांबद्दल त्यांनी इतकी सद्भावना व्यक्त केली, तेथे सांस्कृतिक अहंकार सोडून इतरांत मिसळणाऱ्या ब्राह्मणांविषयी त्यांची कृती काय असेल, हे सांगण्याचीही आवश्यकता नाही. शिवाय, ब्राह्मणांच्या स्त्रियांशी फुल्यांचे वैर सोडाच, पण त्यांना माणूस म्हणून जगता यावे, यासाठी त्यांनी अपार यातना सोसल्या आहेत. हा इतिहास येथे तपशिलाने सांगण्याची गरज नाही. ब्राह्मण विधवेच्या मुलाला त्यांनी दत्तक घेतले, ही एक घटना सांगणे पुरेसे आहे.

## कोणाचा धर्म

या सगळ्याचा अर्थ असा, की हिंदू समाजामध्ये ९० टक्के असलेल्या शूद्रादी-अतिशूद्र स्त्री-पुरुषांना आणि ५ टक्के असलेल्या ब्राह्मण स्त्रियांना फुल्यांचा विरोध नव्हता. उरले ५ टक्के ब्राह्मण पुरुष. 'मनुस्मृती'सारखे ग्रंथ या ५ टक्के हिंदूंच्याच

हिताचा प्रामुख्याने विचार करतात. एवढेच नव्हे, तर या ५ टक्के हिंदूंच्या हितासाठी उरलेल्या ९५ टक्के हिंदूंच्या हिताचा बळी देणारे नियमही त्यांनी केले आहेत. याउलट फुले ९५ टक्के हिंदूंच्या बाजूने उभे राहिले. शिवाय ५ टक्के ब्राह्मणांपैकी ज्यांनी न्याय्य भूमिका स्वीकारली त्यांनाही त्यांनी आपले मानले. याचा अर्थ ९७-९८ टक्के हिंदूंच्या कल्याणासाठी फुले तळमळत होते, आयुष्य झिजवत होते आणि दोन-तीन टक्के हिंदूंवर टीका करीत होते. ती टीका ते ब्राह्मण असल्याबद्दल नव्हती, तर ते शोषण वा शोषणाचे समर्थन करणारे आहेत म्हणून होती, हेही एव्हाना स्पष्ट झाले आहे.

या टक्केवारीत थोडेबहुत इकडे तिकडे होऊ शकेल, पण त्यामुळे मुख्य प्रतिपादनात फरक पडत नाही. त्या प्रतिपादनानुसार फुल्यांचे वर्तन हा स्वजनद्रोह तर नाहीच, उलट ते स्वजनकल्याणच आहे. आणि धर्माच्या बाबतीत म्हणायचे, तर शूद्रादी-अतिशूद्रांचे शोषण करणारा धर्म हा मोजक्या शोषकांना 'स्वधर्म' वाटला तरी इतरांना तो 'स्वधर्म' का वाटावा? हिंदू धर्म ३ टक्के हिंदूंना ९७ टक्के हिंदूंचे शोषण करण्याची धर्मशास्त्रोक्त परवानगी देणारा असेल, तर त्या शोषणाला बळी पडणारांनी "आपल्यास हिंदू तरी कशाकरिता म्हणून घ्यावे" असे फुल्यांनी विचारले आहे[२६] ते उगाच नव्हे. स्वत:ला हिंदू म्हणवून घेऊ नये असे वाटायला लावण्यासारखी मूल्ये हिंदू धर्मात होती की नाही, याचे थोडे विवेचन आता करायचे आहे.

■

# ३. हे सर्व नाकारले

## श्रुती व स्मृती

एखाद्या धर्माचा संस्थापक काळाच्या उदारात विलीन झाल्यावर त्या धर्माचे स्वरूप समजून घेण्याच्या दृष्टीने धर्मग्रंथ हे बहुधा सर्वात अधिक महत्त्वाचे साधन म्हणता येईल. रूढी, शिष्टाचार इत्यादींनाही बहुधा धर्मशास्त्राचा आधार असतोच. साठ-सत्तर वर्षांच्या जरठ विधुराचा अज्ञान मुलीबरोबर विवाह करायचा, परंतु बालविधवेने मात्र पुनर्विवाह करायचा नाही, अशी दुष्ट चाल धर्मशास्त्रांना बळकट आधार मिळाल्यामुळे चालू राहिली, असे फुल्यांनी म्हटले आहे. धर्मशास्त्र व रूढी यांत विरोध आला, तर शास्त्रापेक्षा रूढी अधिक बलवान म्हटली जाते, हे खरे आहे. परंतु अशा रूढीचे ज्ञान देणारी त्या रूढीची आधीची शास्त्रे नसली, तरी नंतरची शास्त्रे बहुधा असतातच. हिंदू धर्मशास्त्रांचा विचार करायचा, तर त्यांचे श्रुती आणि स्मृती असे दोन प्रमुख गट पडतात. या दोहोंपैकी श्रुती या तत्त्वत: अधिक महत्त्वाच्या असून त्या स्वत:प्रमाणे मानल्या जातात. स्मृती मात्र श्रुतींना अनुसरून असतील तरच प्रमाण ठरतात. व्यवहारात मात्र अनेकदा वेदांपेक्षाही स्मृती, पुराणे इत्यादींना अधिक महत्त्व प्राप्त झाल्याचे आढळते. श्रुतींनाच 'वेद' म्हणतात.

## चिकित्सा नाही?

'ऋग्वेद', 'यजुर्वेद', 'सामवेद' आणि 'अथर्ववेद' या चार ग्रंथांच्या संहितांना वेद म्हटले जाते. 'वेद' या संज्ञेचा यापेक्षाही अधिक व्यापक असा अर्थ घेऊन चार संहिता, 'ब्राह्मण' नावाचे ग्रंथ, 'आरण्यक' नावाचे ग्रंथ आणि उपनिषदे या सर्वांना वेद म्हणण्याची पद्धतही रूढ आहे. धर्मग्रंथ या नात्याने हे ग्रंथ अत्यंत पवित्र मानले जातात. म्हणूनच ज्ञानाची जी विविध प्रमाणे म्हणजेच साधने मानली जातात, त्यांमध्ये वेदांचे स्थान सर्वश्रेष्ठ मानले जाते. सूर्य जसा स्वयंप्रकाशी असतो तसे वेद स्वयंप्रमाण आहेत. त्यांच्या प्रामाण्याची चिकित्सा प्रत्यक्ष वा अनुमान या प्रमाणांनी करायची नाही, असेही मानले जाते. हिंदूंच्या दृष्टीने वेदांचे माहात्म्य असे अनन्यसाधारण मानण्याची परंपरा

असल्यामुळे लो. टिळकांनी 'हिंदू' या शब्दाची व्याख्या करताना "वेद हे एकमेव प्रमाण होय अशी ज्याची बुद्धी तो हिंदू", असे म्हटले आहे.

वेदांचे अलौकिकत्व सिद्ध करण्यासाठी ते अपौरुषेय आहेत म्हणजेच मानवनिर्मित नाहीत, असे सांगितले जाते. मानव अपूर्ण असल्यामुळे त्याच्या कृतीमध्ये कोणता ना कोणता दोष असतो. परंतु वेद हे अपौरुषेय असल्यामुळे अशा प्रकारचे दोष त्यांना चिकटत नाहीत. वेद हे स्वयंभू, अनादी, ईश्वरकृत वा ब्रह्मदेवाच्या मुखातून निघालेले आहेत, या वर्णनातूनही हेच सूचित करायचे असते. वेदांचे मंत्र ज्या ऋषींच्या नावावर दर्शविले जातात, ते ऋषी हे त्या मंत्रांचे कवी वा कर्ते मानले जात नाहीत, तर द्रष्टे मानले जातात. 'ऋषी' या शब्दाचा अर्थही द्रष्टा असाच केला जातो. याचा अर्थ वैदिक ऋषींनी वेदांचे मंत्र लिहिले नाहीत, तर आधीपासून अस्तित्वात असलेले मंत्र त्यांनी फक्त पाहिले. ते मंत्र त्यांनी ऐकले या श्रद्धेमुळे 'ऐकलेले' या अर्थाने वेदांना श्रुती म्हटले जाते. या सर्व धारणा वेदांना अलौकिक ठरविणाऱ्या आहेत. स्मृतिग्रंथ वगैरेंना इतके पवित्र मानले जात नसले, तरी त्यांची निर्मितीदेखील एखाद्या देवतेने केल्याच्या कथा सांगितल्या जातात. अशा श्रद्धेय ग्रंथांची तर्काच्या आधारे चिकित्सा करायची नसते आणि जो कोणी असे दु:साहस करील त्याला नास्तिक मानून समाजातून बहिष्कृत करावे, असे 'मनुस्मृती'सारख्या धर्मग्रंथांनी आवर्जून सांगितले आहे.

फुल्यांनी मात्र चिकित्सा करण्याचे हे 'दु:साहस' अत्यंत जाणीवपूर्वक केले. अर्थात, त्यांनी केवळ हिंदूंच्याच नव्हे, तर जगातील सर्वच धर्मग्रंथांच्या स्वरूपावर कमी-अधिक भाष्य केले आहे.

### ईश्वरनिर्मित नाहीत

जगातील कोणतेच धर्मग्रंथ ईश्वराने निर्माण केलेले नाहीत, असे त्यांनी नि:संदिग्ध शब्दांत सांगितले आहे. ते म्हणतात[२७] "त्याने स्वत: एखादे धर्मपुस्तक जर केले असते, तर त्याने तेथील स्त्री-पुरुषांची आवडनिवड न करिता या उभयतांच्या मानवी अधिकाराविषयी नि:पक्षपाताने लिहिले असते व त्याचप्रमाणे त्याने ते धर्मपुस्तक एकंदर सर्व जगातील निरनिराळ्या भाषांत समजण्याजोगते केले असते." जगातील मानवकृत अशा सर्वच धर्मग्रंथांच्या मर्यादा दाखविताना ते म्हणतात,[२८] "या पृथ्वीच्या पृष्ठभागावर जेवढी म्हणून मानवांनी धर्मपुस्तके केली आहेत, त्यांपैकी एकाही ग्रंथात आरंभापासून शेवटापर्यंत सारखे सार्वजनिक सत्य नाही. कारण प्रत्येक धर्मपुस्तकामध्ये काहीएक व्यक्तींनी त्या वेळच्या प्रसंगांस अनुसरून हेकडपणा केल्यामुळे, ते धर्म एकंदर सर्व मानवी प्राण्यास सारखे हितकारक न होता, सहजच त्यामध्ये अनेक फळ्या होऊन त्या एकमेकांचा मनापासून हेवा व द्वेष करू लागतात."



INSTITUT ... 124306

जगातील विविध धर्मग्रंथांकडे पाहता जेथे काही चांगले आढळले त्या ग्रंथांचे कर्ते 'कनवाळू परोपकारी सत्पुरुष' असल्याचे फुल्यांनी मान्य केले आहे. 'या भूमंडळावर महासत्पुरुषांनी जेवढी म्हणून धर्मपुस्तके केली आहेत, त्या सर्वांत त्या वेळेस अनुसरून त्यांच्या समजुतीप्रमाणे काही ना काही सत्य आहे,' असेही त्यांनी मान्य केले आहे. अगदी वेदातील 'तत्सवितुर्वरेण्यं' हा मंत्र अस्सल बीजमंत्र असल्याचा गौरव त्यांनी केला आहे. परंतु धर्मग्रंथांतील चांगल्या लेखनाला मर्यादा होत्या. उदाहरणार्थ, हे सर्व ग्रंथकार पुरुष असल्यामुळे त्यांनी फक्त पुरुषांच्या हक्कांविषयी प्रतिपादन केले. हे ग्रंथ जर एखाद्या सत्स्त्रीने केले असते, तर तिने स्त्रियांच्या हक्कांविषयी हयगय आणि पुरुषांच्या हक्कांविषयी वाचाळपणा केला नसता; तसेच स्त्रिया ग्रंथ लिहिण्याजोग्या विद्वान असत्या तर पुरुषांनी असा करून उघड गोमा पक्षपात केला नसता, असे फुल्यांनी म्हटले आहे.

अशा रीतीने जगातील सर्वच धर्मग्रंथांच्या स्वरूपाची थोडीबहुत चिकित्सा फुल्यांनी केली असली, तरी हिंदूंखेरीज इतरांच्या धर्मग्रंथांची चिकित्सा करणे फुल्यांचे प्रमुख उदिष्ट नव्हते. कारण या देशातील शूद्रादी-अतिशूद्रांना प्रत्यक्षरीत्या दुष्परिणाम भोगावे लागत होते, ते 'वेद', 'मनुस्मृती' इत्यादी ग्रंथांचे. फुल्यांना हे दुष्परिणाम नुसते दाखवून देऊन बौद्धिक समाधान मिळवायचे नव्हते, तर शूद्रादी-अतिशूद्रांची त्या दुष्परिणामांतून सुटका करायची होती. स्वाभाविकच त्यांनी त्या ग्रंथाची पुढीलप्रमाणे सविस्तर चिकित्सा केली.

हे ग्रंथ ईश्वरकृत वगैरे आहेत, अशी मोठी शेखी ब्राह्मण मिरवीत असले तरी 'हे सर्व खोटे आहे' असे त्यांनी निक्षून सांगितले. हे ग्रंथ मानवनिर्मित असताना ईश्वरनिर्मित आहेत असे म्हटले जात असल्यामुळे त्यांनी या ग्रंथांचे वर्णन कृत्रिम, बनावट, कल्पित, कपोलकल्पित, हवेखोर, थोतांड, भाकडकथा, दंतकथा, बखरी, कादंबऱ्या, आंधळे गारूड इत्यादी शब्दांनी केले आहे. हे बनावट ग्रंथ रचताना इतिहासातील गैरसोयीचा बराचसा भाग गाळला जात असे, सोयीचा ठरेल असा भाग संधी पाहून मागाहून घुसडला जात असे आणि असे करीत करीत 'भारेच्या भारे' नवीन ग्रंथ रचले जात असत. ईश्वराच्या नावाने अशी बनावट धर्मपुस्तके करून आणि अज्ञानी शूद्र वगैरेंना लुटून आपल्या पोरालेकरांची पोटे जाळणे, हे खोटी कागदपत्रे करून लबाड बोलण्यापेक्षाही जास्त दोषास्पद आहे, अशी टीका फुल्यांनी केली आहे. ईश्वराच्या नावावर धर्मपुस्तक करून धार्मिकपणाचा डौल घालून आपल्या जातबांधवांना नाडून खात नसल्यामुळे पशुपक्षीही या ग्रंथकर्त्या लोभी मानवांपेक्षा फार श्रेष्ठ होत, असे विचार त्यांनी मांडले आहेत.

फुल्यांनी या ग्रंथकारांचे वर्णन करण्यासाठी लबाड, गप्पाडे, धूर्त, कावेबाज, हेकड, हेकेखोर इत्यादी शब्द वापरले आहेत. चार्वाक दर्शनाचा संस्थापक बृहस्पती याचा निर्देश 'महाविद्वान शोधक सज्जन' असा करून वेदांचे कर्ते हे भंड (विदूषक), धूर्त व निशाचर असल्याचे वचन त्यांनी उद्धृत केले आहे. हे ग्रंथकार समंजस असते, तर त्यांनी आपण पराजित केलेल्या मानवांच्या मुलाबाळांना दास केले नसते; ते सत्पुरुष असते तर त्या दासांकडून सेवाचाकरी करून घेण्याचा अधिकार काही जणांना आहे, असे त्यांनी धर्मपुस्तकात लिहून ठेवले नसते; याचा अर्थ ते हट्टी स्वभावाचे व दुसऱ्यांचा सूट घेणारे होते, असे त्यांनी म्हटले आहे. माणसांची कर्तव्ये कोणती आहेत, त्यांनी शेजाऱ्याशी कसे वागावे इत्यादी गोष्टींविषयी वेदकर्त्यांना मुळीच ज्ञान नव्हते, असेही त्यांचे मत होते. या ग्रंथकारांच्या ग्रंथांतील दोष पाहून त्यांनी हे ग्रंथ मतलबी, पक्षपाती, कठोर, खोडसाळ आणि अपवित्र असल्याचे सोदाहरण आणि पुन:पुन्हा दाखवून दिले आहे. हे ग्रंथ 'ईश्वराच्या नावाला नीचपणा' आणणारे आहेत, हे त्यांचे मत मनुस्मृतीसारख्या धर्मग्रंथाच्या मूळ स्वरूपाशी परिचित असणाऱ्या कोणालाही अतिशयोक्तीचे वाटणार नाही.

## घ्यायचे-द्यायचे माप वेगळे

पोट जाळण्यासाठी रचलेल्या वा वापरल्या जाणाऱ्या या 'एकतर्फी' ग्रंथांमधून विषमता, शोषण, पक्षपात इत्यादींचे समर्थन आहे. ब्राह्मण कधीही चूक करू शकत नाही; त्याने कोणताही गुन्हा केला तरी राजाने त्याला दंड करता कामा नये; ब्राह्मणाचे प्राण वाचविण्यासाठी कोणत्याही प्रकारे खोटे बोलले तरी पाप लागत नाही; ब्राह्मणाच्या उजव्या पायात सर्व तीर्थे असतात; ब्राह्मण शूद्राला कोणतेही काम करण्याची सक्ती करू शकतो; शूद्राला धर्मोपदेश करता कामा नये इत्यादी अर्थाची वचने फुल्यांनी निदर्शनाला आणली आहेत. कित्येक वचने तर उद्धृत करण्यास लाज वाटावी, अशी असल्याचे त्यांनी म्हटले आहे आणि ती वस्तुस्थितीही आहे. या सर्व दोषांपैकी अगदी मूलभूत दोष त्यांनी दिलेल्या पुढील दोन उदाहरणांवरून स्पष्ट होतील. ते म्हणतात [२९], "आर्यभट्ट ब्राह्मणांच्या ग्रंथामध्ये ब्राह्मणांचे शूद्रापासून घ्यावयाचे माप एक आणि ब्राह्मणांनी शूद्रादी-अतिशूद्रांस द्यावयाचे माप एक." शूद्रांप्रमाणे स्त्रियांच्या बाबतीतील नियमांवर टीका करताना ते म्हणतात [३०], "... काही निर्दय जातीचे लोक आपल्यातील प्रेतासह जिवंत असलेल्या भार्येस जाळून टाकितात आणि त्याविषयी त्यांच्या शास्त्रांत लेख दाखवितात. परंतु त्याचप्रमाणे त्यांच्यातील महापतिव्रतेच्या प्रेतासह जिवंत असलेल्या भ्रतारास जाळून टाकावे, म्हणून त्यांच्या शास्त्रात अजिबाद मुळीच लेख नाही, यावरून त्यांच्यातील शास्त्रकर्ते पहिल्या प्रतीचेच अधम होते, असे सिद्ध होते."

## नैतिक विचारांच्या मर्यादा

आमच्याही धर्मग्रंथातून बंधुत्वाचा उपदेश करण्यात आला आहे, असे वैदिक अनुयायी अनेकदा सांगतात. उदाहरण म्हणून पुढील आशयाचा 'सहृदयं' इत्यादी मंत्र उद्‌धृत केला जातो : ''एक मनाने व एक अंत:करणाने तुम्ही राहावे, कोणी कोणाचा द्वेष करू नये. नुकतेच जन्मलेले आपले वत्स पाहून ज्याप्रमाणे गायीस आनंद होतो, त्याप्रमाणे तुम्ही परस्परांवर प्रेम करा.'' आता असा श्लोक 'अथर्ववेदा'त जर होता, तर 'शूद्रादींना तुच्छ मानून त्यांचा छळ करण्याची वहिवाट आपले आपण पडली काय,' हा फुल्यांनी विचारलेला मार्मिक प्रश्न त्या ग्रंथातील तथाकथित बंधुत्वाचे पितळ उघडे पाडणारा आहे. ''वेदामध्ये नीती वगैऱ्यांविषयी जे प्रतिपादन केले आहे, ते सर्व आपल्या जातीच्या आप्पलपोट्या धूर्त आर्यभटांच्या हिताकरिता मात्र योजिले आहे.'' त्याच्यापासून इतर शूद्रादी-अतिशूद्र, भिल्ल, कोळी इत्यादी सर्वांचे हित होण्यासारखे नाही, असे जे फुल्यांनी म्हटले आहे, ते या ग्रंथातील तथाकथित नैतिक विचारांच्याही मर्यादा दाखविणारे आहे.

## शिकायला बंदी

तसे पाहिले, तर 'वेद' हा शब्द संस्कृत भाषेतील 'जाणणे' या अर्थाच्या 'विद' या धातूपासून बनलेला असून त्याचा मूळ अर्थ 'ज्ञान' असा आहे. एखाद्या धर्माने आपल्या अत्यंत पवित्र अशा ग्रंथाला ज्ञान या अर्थाचे नाव देणे, ही बाब खरोखरच अत्यंत आनंदाची आहे. असे नाव देणाऱ्यांचे अभिनंदनच केले पाहिजे. आता या वेदस्वरूप ज्ञानाचा हिंदू धर्माच्या सर्व अनुयायांना लाभ मिळणे योग्य होय. परंतु हे ''ग्रंथ स्वत: वाचून पाहून त्याविषयी तुम्ही पक्का शोध केला आहे काय,'' असे फुल्यांनी यशवंताला विचारले असता त्याने ते ग्रंथ आमच्या दृष्टीससुद्धा पडू देत नाहीत किंवा ऐकूसुद्धा देत नाहीत, असे उत्तर दिले. त्याचे हे उत्तर वस्तुस्थितीला धरूनच आहे. एखाद्याला स्वत:च्या आईवडिलांच्या घरात प्रवेश करायला बंदी करावी किंवा त्याच्या प्रवेशामुळे त्याच्या आईवडिलांचे घर भ्रष्ट व अपवित्र होते असे मानावे, असा हा प्रकार आहे. वेदरूपी स्वयंप्रकाशी सूर्य शूद्रादी-अतिशूद्रांपर्यंत आणि स्त्रियांपर्यंत ज्ञानाचा प्रकाश जाऊ देत नाही. अपवित्र सोवळ्यात लपवून ठेवलेले वेद, बिळात लपवलेले वेद, लपवून ठेवलेल्या वेदरूपी बखरी इत्यादी जळजळीत शब्दांत हे सत्य फुल्यांनी पुन:पुन्हा मांडले आहे. ते म्हणतात, ''झाकल्या वेदाचा आधार दाविती'' किंवा ''पाण्यात वेदरूपी म्हैस आणि तिचे मोल धूर्त आर्यभट्ट कसे करितात?'' वेद ज्या भाषेत आहेत ती संस्कृत भाषा शिकायला आणि एकूणच विद्या प्राप्त करायलाही बंदी असल्याची वस्तुस्थितीही त्यांनी अनेकदा मांडली आहे.

शूद्रादी-अतिशूद्रांना मानवी हक्क, ब्राह्मणांची कावेबाजी, वास्तविक इतिहास इत्यादी कळू नये, अशा आपमतलबी धोरणाने अशी बंदी घालण्यात आल्याचे फुल्यांनी स्पष्ट केले आहे. त्यांना हे सर्व कळले, तर ते कधी तरी आपल्या उरावर नाचण्यास कमी करणार नाहीत, अशी भीती यामागे होती. तसेच, ग्रंथात हवे तसे फेरफार करता यावेत, असाही हेतू होता. ब्राह्मणांनी आपले ग्रंथ "स्वार्थी चुलीच्या भानवसीमागे सोवळ्यात लपवून ठेविले" असे यावर फुल्यांनी उपहासाने म्हटले आहे.

## फुरसत नाही

धर्मग्रंथांच्या आधारे केले जाणारे शोषण सर्वसामान्य माणसांना इतका दीर्घ काळपर्यंत का ओळखता आले नाही, यामागची वस्तुस्थिती स्पष्ट करताना ते म्हणतात, "तथापि त्या बापड्या दुर्दैवी हतभाग्यांस या ढोंगी गारुड्यांचे कपट शोधून काढण्यास फुरसतच होत नाही. कारण सर्व दिवसभर शेतात खपून आपल्या मुलाबाळांचे पोषण करून सरकारची पट्टी पुरी करता करता नाकास नऊ येतात." परंतु आता काळ बदलत असून आजपर्यंत शोषणाला बळी पडलेली माणसे आता या धर्मग्रंथांच्या चिंध्या चिंध्या करतील, या अर्थाचे विचार फुल्यांनी अनेकदा मांडले आहेत. हे अन्याय यज्ञांतील गायी-मेंढ्यांनाही सहन होण्यासारखे नाहीत, हे त्यांनी अत्यंत प्रभावी भाषेत पुढीलप्रमाणे मांडले आहे, "तथापि हल्लीच्या सत्ययुगात जर गायी-मेंढ्यांस ईश्वरकृपेने वाचा फुटली असती, तर त्यांनी धूर्त आर्यांतील ग्रंथकारांची नाके ठेचण्यास कधीही मागेपुढे घेतले नसते."

## फटफजिती

आतापर्यंत संस्कृत शिकण्याची बंदी असल्यामुळे आपणास त्यांच्या वेदांतील गोम शोधून काढण्यास मार्ग नव्हता; परंतु आता पाश्चात्त्य विद्वानांनी 'वेदांसह स्मृत्या, संहिताचे आंडे' फोडल्यामुळे आपले सर्वांचे डोळे उघडल्याचे त्यांनी म्हटले आहे. सामान्य माणसे विद्वान झाल्यावर त्या मतलबी ग्रंथांतील सर्व दुष्कर्मे उघडकीस येताच त्या कोणी हातीसुद्धा धरणार नाहीत, असा इशाराही त्यांनी दिला आहे. एके ठिकाणी ते म्हणतात,[३१] "धूर्त आर्यभट ब्राह्मणांनी वेद लपवून ठेविल्याकारणामुळे वेदांची अज्ञानी शूद्रादी-अतिशूद्रांत पोकळ पत्राज वाढली आहे खरी, परंतु यापुढे त्यांनी ख्रिस्ती लोकांच्या बायबलासारखे, आपल्या वेदास बाहेर काढून त्याचे प्राकृत करून जगजाहीर केल्याबरोबर, धूर्त आर्यभटांसह त्याच्या वेदांची बाजारच्या कोल्हाटणीसुद्धा फटफजिती करण्यास भिणार नाहीत, अशी मी प्रतिज्ञा करून सांगतो."

## काळी चिंधी नको

अशा रीतीने जे फटफजिती करण्याच्या लायकीचे आहेत, ते आता इंग्रज राजवटीत वेगळ्या स्वार्थापोटी कोणी आम्हाला देऊ केले, तरी ते आम्हाला नकोत, असे फुल्यांनी निश्चयाने सांगितले आहे. ते म्हणतात,[३२] "पूर्वी धूर्त आर्यभट्ट ब्राह्मणांच्या कारकिर्दीत दासानुदास केलेल्या शूद्रादी-अतिशूद्रांस त्यांच्या वेदांतील एक शब्दसुद्धा ऐकू देत नसत आणि या नि:पक्षपाती इंग्रज बहाद्दरांच्या राज्यात वेदांतील वाक्ये बापुड्या लोटन खबुत्रासारखी तुच्छ मानलेल्या शूद्रादी-अतिशूद्रांचे चरणाजवळ गडबडा लोळावयास धूर्त आर्यांनी लावली आहेत. आता त्यांची वेदरूपी काळी चिंधी आम्हा शूद्रादी-अतिशूद्रांमध्ये नको." "पुरे वेदकावा", असे म्हणणारे फुले एवढेच म्हणून थांबले नाहीत. 'मनुस्मृती'सारख्या ग्रंथांना हद्दपार करण्याची भाषा त्यांनी केली आहे. "मनुमत कापा," "मनू धि:क्कारुनी एकीकडे फेका," "जाळून टाकावा मनुग्रंथ"[३३] इत्यादी प्रकारे त्यांनी 'मनुस्मृती'चा धिक्कार केला आहे.

## एकच माप

घ्यायचे माप आणि द्यायचे माप एकच असावे, ही नीतीविषयीची त्यांची मूलभूत धारणा होती. या धारणेपोटीच त्यांनी या धर्मग्रंथांच्या अनुयायांपुढे पुढील प्रकारचे प्रश्न ठेवले आहेत. काही हेकड पुरुषांनी केलेल्या धर्मग्रंथांचा आधार दाखवून एका घरात दोन-दोन, तीन-तीन बायका करणाऱ्या लोकांना त्यांनी विचारले आहे,[३४] "स्त्रियांनी आपल्या मन:कामना तृप्त करण्याकरिता दोन-दोन, तीन-तीन लग्नाचे नवरे करून एका घरात नांदू लागल्यास आपणा सर्व पुरुषांस याविषयी काही विधिनिषेध वाटणार नाही काय?" याच पद्धतीने शूद्रांच्या संदर्भातही त्यांनी दोन प्रश्न विचारले आहेत.[३५] शूद्रादी-अतिशूद्रांनी ब्राह्मणांसारखे आपल्या मनास वाटेल तसे ईश्वराच्या नावाने कल्पित ग्रंथ रचून त्या ग्रंथातील एक शब्दसुद्धा ब्राह्मणांना ऐकू न देता त्यांना पिढीजात दास बनवून आपली सेवाचाकरी करायला लावले, तर त्यांना ते आवडेल काय? तसेच त्यांनी आपल्या पायाचे स्वच्छ निर्मळ तीर्थ ब्राह्मणांना पाजले, तर ते त्यांना बरे वाटेल काय?

## ईश्वर मान्य, पण –

फुल्यांनी ईश्वराचे अस्तित्व नाकारलेले नाही. परंतु परंपरागत हिंदू धर्मातील ईश्वराविषयीच्या अनेक धारणा त्यांनी नाकारल्या आहेत. हिंदू धर्मातील अनेक देवदेवता कल्पित वा अनैतिक म्हणून त्यांनी नाकारल्या. शेषशायी विष्णूचे ईश्वरत्व नाकारले. ब्रह्मदेवाने चार वर्ण निर्माण केले, वगैरे सिद्धान्तांवर कठोर टीका करून त्याचे देवत्वही

नाकारले. मत्स्य, कच्छप, वराह, नरसिंह यांचे ईश्वरत्व तर त्यांनी नाकारलेच, पण इतर अवतारांचे ईश्वरत्व नाकारताना त्यांनी व्यक्त केलेले विचारही महत्त्वाचे आहेत. वामनाने अत्यंत गुणी अशा बळीराजाला फसवून नष्ट केले. परशुरामाने अत्यंत क्रूरपणाने क्षत्रियांचा वध केला. एवढेच नव्हे, तर आपली जन्मदात्री रेणुका हिचाही उचित कारण नसता वध केला. राम आणि कृष्ण यांचे अवतारत्वही फुल्यांनी नाकारले. त्यांच्या चरित्रातील अनेक घटनांवर त्यांनी टीका केली. अर्थात, या घटना या दोघांच्या चरित्रात नंतरच्या ग्रंथकारांनी घुसडल्या असल्यामुळे त्या दोघांचे चरित्र भ्रष्ट स्वरूपात लोकांपुढे आले आहे. उदाहरणार्थ, कृष्णाने नदीत स्नान करणाऱ्या गोपींची वस्त्रे पळवली वा गोपपत्नी राधेशी प्रणय केला, या गोष्टी कृष्णाच्या मूळ चरित्रात अस्तित्वातच नव्हत्या. फुल्यांनी त्यांच्यासमोर कृष्णाचे जे चरित्र आले होते, त्याच्या आधारे त्याचे मूल्यमापन केले. गोपींची वस्त्रे पळवून कृष्ण हौसेने मजा पाहत बसला, याविषयी फुले विचारतात, "आता हा निर्लज्जपणा आपल्या परम पवित्र निर्मिकाच्या नावाला शोभेल काय?" कृष्णाचे चरित्र भ्रष्ट करणाऱ्यांच्या वैचारिक वारसदारांनी या प्रश्नाचे उत्तर द्यायला हवे.

ईश्वराचे दर्शन, साक्षात्कार, त्याच्याशी संभाषण इत्यादी विषयींच्या कथा खोट्या असल्याचे त्यांनी सांगितले. त्यांच्या मते ईश्वर साकार नाही. "हजारो वर्षांच्या रस्त्यावर पलीकडे गेल्यावर तेथे एका महालामध्ये सर्वांचा निर्माणकर्ता अनेक विश्वातील प्राणिमात्रांच्या सुखदु:खाची व्यवस्था करीत बसला आहे, असे आपल्या दृष्टीस पडेल, अशी जर आपण कल्पना केली, तर ती चुकीची आहे,"[३६] असे त्यांनी म्हटले. ईश्वर धातू, दगड, इत्यादींच्या मूर्तीत वा मंदिरात असतो, हे त्यांना मान्य नाही. अन्यायाने जमविलेल्या पैशातून मंदिरे बांधणे, हा तर सद्‌गतीचा मार्ग नसून अधोगतीचा मार्ग आहे, असे त्यांनी नि:संदिग्धपणे सांगितले. उदाहरणार्थ, ते म्हणतात,

*जतिमारवाडी गरिबा नाडिती । देऊळे बांधिती । कीर्तीसाठी ।।*
*देवाजीच्या नावे जगाला पीडिती । अधोगती जाती । निश्चयाने ।।*[३७]

जनतेकडून घेतलेल्या करातून मंदिरे बांधण्याला विरोध करताना ते म्हणतात,[३८] "आपल्या अज्ञानी शूद्रादी-अतिशूद्रांच्या मुलांस सुशिक्षण देण्याकरिता शाळा बांधण्याच्या कामी खर्च न करिता वाई, बनारस, प्रयाग, नाशिक वगैरे ठिकाणी रामकृष्णांची देवालये बांधण्यात अतोनात खर्च करितात. याला कोणी तरी नीती म्हणेल काय? शूद्रांपासून व अतिशूद्रांपासून कराचा पैसा घेत असत व तो पैसा लोकहिताकडे खर्च करण्याच्या ऐवजी आपल्या कामाकडे व रामकृष्णांची देवालये बांधण्याकडे खर्च करीत असत."

## उपासना बदला

फुले वाहून पूजा करणे, नैवेद्य करणे इत्यादी प्रकारच्या परंपरागत धर्मातील ईश्वरोपासनेच्या पद्धती फुल्यांनी नाकारल्या. एक तर पृथ्वीवरील सर्व पदार्थ ईश्वराने मानवाच्या उपभोगासाठी उत्पन्न केले असल्यामुळे त्यांपैकी कोणताही पदार्थ उलटा त्याला वाहण्याची आवश्यकता नाही; दुसरे म्हणजे सर्व पदार्थ त्यानेच उत्पन्न केलेले असतील, तर जे वाहून त्याची पूजा करावी, असे आपल्याजवळ आपले स्वत:चे काहीही नाही, असे त्यांचे मत आहे. निर्मिकाच्या नावाचा सतत व्यर्थ जप वा नामघोष केल्यामुळेही त्याला संतोष होणार नाही; उलट एखाद्या अट्टल धूर्त बहुरूपी गारुड्याने ढोंगीपणाने केलेले नामस्मरण पाहून त्याचा संतापच होईल असे त्यांना वाटते. आपले पालनपोषण केलेले आईवडील वृद्धपणी पंगू झाल्यास त्यांचे व आपल्या भावंडांचे पालनपोषण करण्याकरिता काही खटपट करण्याऐवजी माझी माता, माझा पिता असे पोकळ नामस्मरण केले, तर आईवडिलांसह भावंडांना उपाशी मरावे लागेल त्याच पद्धतीने ईश्वराच्या बाबतीतही असे पोकळ नामस्मरण व्यर्थ होय, असे त्यांनी म्हटले आहे. अनुष्ठानाने पर्जन्य, अपत्य इत्यादींची प्राप्ती होते, हा परंपरागत कार्यकारणसंबंध नाकारताना त्यांनी पुढील प्रश्न उपस्थित केले आहेत.[३९]

*जप अनुष्ठाने पाऊस पाडिती । आर्य का मरती । जळावीण? ॥*
*जप अनुष्ठाने स्त्रिया मुले होती । दुजा का करिती । मुलासाठी? ॥*
*भट ब्राह्मणांत बहु स्त्रिया वांज । अनुष्ठानी बीज । नाही का रे? ॥*
*अनुष्ठानावीण विध्वा मुले देती । मारुनी टाकिती । सांदी कोनी ॥*

## कुडीवीण आत्मा नाही

प्राण्यांचा आत्मा जन्ममरणाच्या फेऱ्यातून फिरतो, ही हिंदू धर्मातील एक अत्यंत मूलभूत अशी संकल्पना आहे. फुल्यांनी ती नाकारली. शरीराच्या आधाराविना राहू शकणारा आत्मा असतो, असे सांगणाऱ्या गुरूंवर त्यांनी टीका केली आहे. एका अखंडात ते म्हणतात.

*गुरु म्हणे आत्मा आहे निराधार । सांगे बडीवार । त्याचा फार ॥*
*कुडीवीण आत्मे दावीना मजला । धिक्कार गुरुला । जोती म्हणे ॥*[४०]

शरीराच्या आधाराने राहणारे चैतन्य म्हणजे आत्मा, असे म्हणण्यास मात्र त्यांची हरकत नाही. त्याच अखंडात ते म्हणतात,

*शरीराचे पोटी आत्मा जन्मे बेटा । दिमाखाचा ताठा । व्यर्थ करी ॥*
*घडामोड सर्व स्मरणात ठेवी । तुलना करवी । सर्व कामी ॥*

शरीराबरोबर जन्माला येणारा आणि स्मरण, चिंतन, तुलना इत्यादी करणारा आत्मा

मान्य असला तरी आत्मा अनादी, अनंत वा अलौकिक असल्याचा दिमाख मात्र त्यांना मान्य नाही. आणखी एके ठिकाणी ते म्हणतात,

*मांग आर्यामध्ये पाहू जाता खूण । एक आत्मा जाण । दोघांमध्ये ।।*[४१]

येथेही शरीराबरोबर जन्माला आलेला वरील आत्माच त्यांना अभिप्रेत आहे. 'सर्व ज्ञानामध्ये आत्मज्ञान श्रेष्ठ' या वचनात त्यांना आत्मज्ञान म्हणजे स्वत:विषयीचे ज्ञान, इतका साधा अर्थ अभिप्रेत आहे. त्यांनी वापरलेल्या 'आत्मपरीक्षण' या शब्दात आत्म्याचा जो अर्थ आहे, तोच 'आत्मज्ञान' या शब्दातही आहे, हे स्पष्ट आहे. भारताच्या घटनेचे प्रमुख शिल्पकार म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा जो गौरव झाला, त्यामुळे म. फुल्यांच्या आत्म्याला अतीव आनंद झाला असेल, हे धनंजय कीरांचे विधान[४२] स्वत: फुल्यांच्या सिद्धान्ताला छेद देणारे आहे आणि कीरांसारख्या चोखंदळ चरित्रकारांवरही कळत-नकळत परंपरागत विचारांचा कसा प्रभाव होता, हे यावरून दिसून येते.

## परलोक नाही

आधीच्या जन्मातील कर्मांची फळे नंतरच्या कोणत्यातरी जन्मात किंवा स्वर्ग, नरक इत्यादी प्रकारच्या परलोकात भोगावी लागतात. यासारखे सिद्धान्त त्यांनी स्वाभाविकच नाकारले. 'स्वर्ग' व 'नरक' या संकल्पनांना परंपरागत धर्मशास्त्रांमध्ये बरेच महत्त्वाचे स्थान असते. इहलोकीच्या जीवनात पुण्य केले तर मृत्यूनंतर स्वर्ग प्राप्त होतो आणि पाप केले तर नरक प्राप्त होतो, अशा धार्मिक समजुतीमुळे पापपुण्यांच्या संकल्पनेलाही खूप महत्त्व दिले जाते. अर्थात, विवेकातून घडलेले नैतिक कृत्य म्हणजे पुण्य व त्याविरुद्ध ते पाप, अशी व्याख्या करण्याऐवजी धर्मशास्त्रे, पुरोहित वगैरे म्हणतील ते पुण्य वा पाप अशा व्याख्या केल्या जातात. धार्मिक क्षेत्रात उच्च स्थानी असणाऱ्यांना या विचारसरणींमुळे शोषणाची संधीही उपलब्ध होते. फुल्यांनी 'स्वर्ग-नरक', 'पाप-पुण्य' इत्यादी प्रकारच्या या परंपरागत संकल्पनाही अर्थातच नाकारल्या. "स्वर्ग नाही म्हणून तुम्हांस वाटते काय?" असा प्रश्न विचारल्यावर "यात काय संशय?" असा प्रतिप्रश्न विचारूनच त्यांनी नि:संदिग्धपणे स्वर्गाचे अस्तित्व नाकारले आहे. त्याआधी ते म्हणतात,[४३] "अति प्राचीन काळी म्हणजे ज्या वेळेस जिकडे तिकडे सुधारणूक हा पदार्थ काय आहे, हे ज्यांना माहीत नव्हते, अशा लोकांनी स्वर्ग हा कोणीएक पशुपक्ष्यादिकांस भेडसावण्याकरिता माळ्याच्या जितरापातील हडकाला शेंदूर लावून थेट बाहुल्यासारखा बागुलबुवा अथवा बुजगावणे करून ठेवला होता. पुढे कित्येक कामांत कालेकरून सुधारणा होत गेल्या; परंतु स्वर्गाविषयी कोणीच विचार करून त्याचा खरा थांग लाविला नाही." येथे स्वर्ग व नरक यांचे विवेचन स्वतंत्रपणे वेगवेगळे करण्याऐवजी दोहोंचे वर्णन परस्परांत मिसळून केले असल्यामुळे नरकाच्या वर्णनाला

साजेसे 'बागुलबुवा' व 'बुजगावणे' हे शब्द फुल्यांनी स्वर्गाच्या वर्णनाला लावले आहेत. अर्थात, आपली मांडणी सुसूत्र शब्दांत करण्याची फिकीर न बाळगता आपला आशय व्यक्त करण्याची फुल्यांची ही खास शैली आहे. स्वर्ग कोणी पाहिला आहे काय आणि पाहावयास गेलेला परत आला काय, असे प्रश्‍न त्यांनी या संदर्भात विचारले आहेत.

मृत पितरांसाठी केल्या जाणाऱ्या श्राद्धासारख्या विधींच्या बाबतीतही शूद्रादी-अतिशूद्रांनी वास्तव दृष्टिकोन घ्यावा, असे फुल्यांना वाटते. आईवडील जिवंत असताना त्यांना अन्नान्न वा वस्त्र वस्त्र करायला लावायचे, उन्हात तळपळायला वा अनवाणी चालायला भाग पाडायचे आणि मरणानंतर ब्राह्मणांना त्यांच्या नावाने सुवर्ण, शय्या, छत्री, जोडे इत्यादी दान करायचे, अशाने ते सुखी होतील का, याचा स्वत:च विचार करावा, असे त्यांनी सांगितले आहे.

## पोकळ दैव

कर्मसिद्धान्ताशी निगडित असे दैव 'पोकळ' म्हणून त्यांनी नाकारले. दैवालाच नशीब, प्रारब्ध, प्राक्तन, संचित, ललाट रेषा, ब्रह्मलिखित इत्यादी शब्द वापरल्याचे त्यांनी दर्शविले आहे. त्यांनी एका प्रवाशाचे काही कैद्यांबरोबर संभाषण झाल्याचा प्रसंग रेखाटला असून त्यामध्ये मनुष्य जी फळे भोगतो, त्यांचा संबंध दैवाशी नसून आपल्या कृत्यांशीच असल्याचे दाखवून दिले आहे. त्या दृष्टीने त्यांची पुढील वाक्ये लक्षणीय आहेत[४४] : "वास्तविक विचार करता येथे कैचे लल्लाट आणि येथे कैचे फल्लाट आले आहे." "ब्रह्मलिखित होते म्हणून दोष देता येत नाही. ही मी माझ्या दुष्कर्माची फळे भोगीत आहे." "इथं दैव कैचं आणि इथं फैव कैचं?" दैवाच्या स्वरूपाविषयी त्यांनी पुढील विवेचन केले आहे : "दैव हे कल्पित धोरणाने मानलेले कर्म आहे. त्यास मुळीच कर्ता नसतो. नशीब, प्रारब्ध आणि संचित या सर्वांचा कर्ता अनुमानाने आपणा सर्वांचा निर्माणकर्ता मानिला आहे. रती, सुकृत ही पूर्वजन्मी आपण केलेल्या कर्मांची फळे होत अशी कल्पना आहे. लल्लाटरेषा व ब्रह्मलिखित हे आमच्या पूर्वजन्मीच्या पाप-पुण्यावरून जन्मास घालतेवेळी बह्माजीने आपल्या कपाळावर सर्व लिहून ठेवले असते, त्याप्रमाणे ते सर्व घडून येते. या सर्वांवरून असे सिद्ध होते की उद्योग आणि आळस यांविषयी परिणामाचे अनुमान सर्व लोकांस कळत नाही, यास्तव ते त्यास अनुमानाने दैव म्हणतात. दैव हे एक भाकड दंतकथेसारखेच कल्पिले आहे; ते सर्व मिथ्या होय."

ज्योतिषशास्त्र हे धर्माच्या आधारावर आणि दैववादी माणसाच्या विश्वासावर जगणारे एक तथाकथित शास्त्र होय. विज्ञानाच्या निकषांवर टिकत नसल्यामुळे ज्योतिषशास्त्र हे शास्त्र नव्हे, असे आज डॉ. जयंत नारळीकरांसारखे विख्यात शास्त्रज्ञ

नि:संदिग्धपणे सांगत आहेत.[४५] शंभर वर्षांपूर्वी फुले हेच थोड्या वेगळ्या भाषेत सांगत होते. शनी वगैरेंच्या गतीचा पृथ्वीवरील एकंदर सर्व प्राणिमात्रांवर एक तऱ्हेचा हितकारक वा अहितकारक परिणाम होण्याची शक्यता मान्य केली, तरी ते ग्रह एखाद्या विशिष्ट व्यक्तीला पीडा देऊ शकणार नाहीत आणि दिली तरी अज्ञानी लोकांनी कोणाला भक्कम दक्षिणा दिल्यामुळे ती पीडा दूरही होणार नाही, असे ते सांगत होते. जन्मपत्रिकेच्या बाबतीत ते म्हणतात,[४६] "मानव स्त्रीपुरुषांचा जन्म होतेवेळी घंगाळाच्या पाण्यात वाटी टाकून घटका पाहणारे फारच थोडे; परंतु वाव अथवा कासऱ्याने सूर्य अथवा एखादा रात्रीचा तारा मोजणारे बहुत सापडतील." याचा अर्थ मुळात जन्मपत्रिकाच अचूक नसतात, तर त्यांच्या आधारे सांगितले जाणारे भविष्य ही एक ठकबाजी ठरते.

## अंधश्रद्धा

ज्ञानहीन लोकांच्या इतर अंधश्रद्धांविषयी फुले म्हणतात,[४७] "ते भुताखेतांवर भरवंसा ठेवून मन मानेल त्या वीरांची वारी अंगात घुमवून पोरासोरांसह आपल्या अंगावरील साधणी (उतारे) टाकून आपले द्रव्य खराब करितात. त्यांचा औषध उपचारांवर भरवंसा नसल्यामुळे ते लुच्चड देवऋषींचे नादी लागून आपल्या जिवास मुकतात."

## मध्यस्थ नको

ईश्वराच्या उपासनेच्या परंपरागत पद्धती नाकारल्यामुळे अशा उपासनेचे पौरोहित्य वगैरे करणाऱ्या मध्यस्थांची गरज नव्हती. फुले म्हणतात,

*सर्वसाक्ष जगत्पती । त्याला नकोच मध्यस्थी ।।*[४८]

*किंवा*

*नलगे वकील देवदरबारी ।।*[४९]

मध्यस्थी नाकारण्यामागे आणखी एक महत्त्वाचे कारण होते. हिंदू धर्मामध्ये मध्यस्थीचे हे काम ब्राह्मणांकडे होते आणि हे काम करताना त्यांनी आपल्या स्थानाचा दुरुपयोग केल्यामुळे त्यांना बाजूला करणे आवश्यक आहे, असे फुल्यांना तीव्रतेने जाणवत होते. त्यांनी ब्राह्मण पुरोहितांविना विवाह घडवून आणल्याबद्दल त्या काळात न्यायालयात गुदरण्यात आलेले खटले गाजले होते. त्यांच्या वर्तनातील ज्या विविध दोषांवर फुल्यांनी टीका केली, त्यांपैकी काहींचे विवेचन येथे करायचे आहे.

खऱ्याखुऱ्या धर्माचे पालन करू पाहणाऱ्या पुरोहितांनी ईश्वर आणि भक्त यांच्यातील दुवा म्हणूनचं काम केले असते. परंतु ब्राह्मण "आपल्या सर्वांच्या निर्मिकाची कुकूचकू करून आपणच स्वत: भूदेव आणि अहंब्रह्म" बनले. त्यांनी स्वत:ला केवळ

औपचारिकरीत्या भूदेव म्हणवून घेतले असे नाही, तर स्वत:ला देव बनविणारे धार्मिक विधी त्यांनी तयार केले. स्वत:च्या पायाच्या अंगठ्याचे तीर्थ शूद्रादी-अतिशूद्रांना पाजणे, हा त्यांपैकी एक विधी होय. अशा रीतीने परमेश्वराची जागा स्वत: घेऊन "सर्वांच्या निर्मिकास पालथा घालण्यास" ते भ्याले नाहीत. त्यांचे हे वागणे म्हणजे एकीकडून ईश्वराचा अपमान आणि दुसरीकडून भक्ताशी द्रोह होय. याविषयी फुले म्हणतात, "ईश्वरालाच जो सन्मान योग्य तो आपणांस देण्यास भटांनी शूद्रांस लाविले आहे, हा काही लहान-सहान अन्याय नव्हे."

ब्राह्मणांनी ईश्वराशी केवळ बरोबरी केली असे नव्हे, तर त्यांनी स्वत:ला "ईश्वरापेक्षादेखील श्रेष्ठ मानिले." हे दर्शविणारी भृगूने विष्णूच्या छातीवर लाथ मारल्याची कथा अन्यत्र आली आहेच. फुल्यांनी ब्राह्मणी धर्माला व ब्राह्मणांना अनेकदा नास्तिक व पाखंडी असे का म्हटले, त्याचाही उलगडा यामुळे होतो. परंपरावाद्यांना हे चमत्कारिक व अनैतिहासिक वाटण्याची शक्यता आहे. कारण भारतात चार्वाक वगैरेंना ही विशेषणे लावण्याची प्रथा असून वेदान्त वगैरेंना आस्तिक म्हटले जाते. परंतु या तथाकथित आस्तिक दर्शनांच्या अनुयायी ब्राह्मणांना नास्तिक म्हणण्यामागचा फुल्यांचा दृष्टिकोन उचितच आहे. हे लोक "निर्लज्जपणे पोकळ सोवळे बनून लटकाच आस्तिकपणाचा डौल" मिरवीत असले तरी ते "निर्माणकर्त्याची उचलबांगडी करून" स्वत:च ईश्वर वा ईश्वरापेक्षा श्रेष्ठ बनल्यामुळे त्यांना नास्तिक म्हणणेच योग्य, हा तो दृष्टिकोन होय.

सिद्धान्तांपेक्षा, मूल्यांपेक्षा मतलबाला अधिक महत्त्व देणारे हे लोक "कोणत्या वेळी आपली पोटे जाळण्याकरिता काय करतील याचा नेम नाही. मोठा कावेबाज व जशी वेळ पडेल तसे वागून आपला मतलब साधणारा," अशा शब्दांतही फुल्यांनी त्यांचे वर्णन केले आहे. एका पिढीत ज्ञानेश्वरांसारख्यांचा छळ करायचा आणि नंतर त्यांना प्रतिष्ठा मिळाल्याचे दिसले की ते आमचेच आहेत असे म्हणायचे, असे त्यांनी शेकडो-हजारो व्यक्तींच्या बाबतीत केलेले आहे. अगदी फुल्यांच्या बाबतीतही एकीकडे मनात मळमळ ठेवून आणि आता तर ती ओकण्याचीही हिंमत दाखवून दुसरीकडे सोयीसाठी त्यांना प्रात:स्मरणीय म्हणण्याची चलाखी केली जाते, ही ताजी घटना आहे.

आचरण खऱ्याखुऱ्या नैतिकतेचे नसताना विशिष्ट प्रकारचे धार्मिक विधी, धर्मशास्त्रांच्या नियमांचे पालन इत्यादी द्वारे हे लोक आपली एक उजळ, पवित्र प्रतिमा उभी करतात. 'ब्राह्मणांचे कसब' या पुस्तकातील एका अखंडात फुल्यांनी अशा ढोंगांची अनेक उदाहरणे दिली आहेत[१०] :

*स्नानसंध्या नित्य टिळा टोपीवर । घेती मांडीवर जारिणीस ।।*
*श्रवण वेदाचे शूद्रा बंद केले । मुळी शिकविले इंग्लिशांना ।।*

*भूदेव होऊनी पाया पडविती । पायथी पडती रांडांच्या हो ॥*
*शूद्राला भोजन दुरुन वाढिती । मद्यपान घेती शाक्त मिषे ॥*
*पाय धुववणी शूद्रा तीर्थ देती । मुखरस पिती यवनीचा ॥*

## खरा धर्म बाजूला

अशा रीतीने धर्मामधील असंख्य संकल्पना फुल्यांनी नाकारल्या. त्याबरोबरच प्रत्यक्ष 'धर्म' हा शब्द वापरूनही त्यांनी अनेकदा धर्मावर टीका केली, त्याचे दोष दाखविले. अर्थात धर्माचे अनेक अर्थ होतात आणि धर्माच्या या अनेक अर्थांचा आपल्या सोयीनुसार लाभ उठविणे, हे त्यांना आक्षेपार्ह वाटते. म्हणूनच ते म्हणतात,[५१] " 'धर्म' शब्दाचे नाना प्रकारचे अर्थ होत असल्यामुळे, धूर्त भट्ट-ब्राह्मण आपली कार्ये साधून घेण्याकरिता जशी वेळ येईल, तसा त्याचा अर्थ करून आपले हित करून घेतात." 'धर्म' शब्दाच्या अर्थाची चिकित्सा करताना त्यांनी एक महत्त्वाचा मुद्दा मांडला आहे. उपजीविकेच्या साधनाला 'धर्म' न म्हणता धंदा म्हटले पाहिजे, हा तो मुद्दा असून अनेक उदाहरणे देऊन त्यांनी तो स्पष्ट केला आहे. अनेकदा ज्याला 'धर्म' म्हटले जाते, त्याचे स्वरूप द्वेष, धूर्तपणा, ठकबाजी, कावेबाजी, जातिकसब, अपवित्रता इत्यादी प्रकारचे असते, हेही त्यांनी दाखवून दिले आहे. उदाहरणार्थ, ते म्हणतात, "मेहनत न करता धर्म मिषाने अज्ञानी जनास लुटून आयते खावे, हा सुज्ञ सज्जन आर्यभट्टांचा धर्म नव्हे, परंतु ही त्यांची उघड ठकबाजी होय." अन्यत्र ते म्हणतात, "आळशी धर्माआड लपती."

धर्माचा संबंध पुरोहितांच्या उपजीविकेशी जोडल्यामुळे धर्मामध्ये अनेक अनिष्ट गोष्टींचा शिरकाव झाला. अशा अनिष्ट गोष्टींनी भरलेल्या धर्माचे वर्णन करताना त्यांनी खोडसाळ, जुलमी, मतलबी, कृत्रिम, बनावट, पोकळ इत्यादी प्रकारची विशेषणे वापरली आहेत. 'धर्म' हे एक लिगाड वा ओझे आहे, असे ते म्हणतात. धर्माच्या मिषाने, धर्माच्या नावाखाली वा धर्माच्या आडून लोकांना अनेक प्रकारची दुःखे दिली जातात, असेही त्यांनी वारंवार म्हटले आहे. धर्माच्या आधारे शूद्रादी-अतिशूद्रांचे आर्थिक शोषण कसे केले जाते, याचे हृदयद्रावक वर्णन त्यांनी पुनःपुन्हा केले आहे. अनुष्ठाने, पुत्रजन्म, श्राद्ध, सत्यनारायणाची पूजा इत्यादींची निमित्ते करून त्यांना कसे भोंदाडून खाल्ले जाते; नाडले जाते, याची चित्रे त्यांनी अत्यंत वस्तुनिष्ठपणे रंगविली आहेत. त्या शोषणालाच ते 'धर्मसंबंधी दरवडे' असे म्हणतात. शेतकऱ्याच्या दैन्यावस्थेला 'धर्म' कारणीभूत असल्याचे सांगताना ते म्हणतात,[५२] "शूद्र शेतकरी हल्ली इतक्या दैन्यवाण्या स्थितीस येऊन पोहोचण्याची धर्म व राज्यासंबंधी अनेक कारणे आहेत." धर्माच्या आधारे होणाऱ्या शोषणाचे वर्णन अत्यंत जहाल भाषेत

करताना ते म्हणतात,[५३] "आपल्या धर्मरूपी तरवारीने सर्व लोकांच्या ऐश्वर्याचे चरचरा गळे कापणाऱ्या शास्त्ररूप खड्गास सोवळ्याच्या वळकुट्यांनी लपवून..."

धर्माचा दुरुपयोग केल्यामुळे भारतीय समाजाचे व्यापार वगैरे बाबतीत कसे नुकसान झाले याचे एक महत्त्वाचे उदाहरण त्यांनी पुढीलप्रमाणे दिले आहे[५४]: "आटक नदीचे पलीकडेस हिंदू लोकांपैकी कोणी जाऊ नये, गेले असता तो भ्रष्ट होतो, अशी बाब ब्राह्मण लोकांनी हिंदू धर्मात घुसडली. यापासून ब्राह्मण लोकांचा इष्ट हेतू सिद्धीस गेला; परंतु इतर लोकांचे फारच नुकसान झाले. परकीय लोकांच्या चालचलणुकीचा त्यांस पडोसा न मिळाल्यामुळे ते खरोखर आपणांस मानवी प्राणी न समजता, केवळ जनावरे समजू लागले आहेत. इतर देशांतील लोकांशी व्यापारधंदा अगदी नाहीसा झाल्याने ते कंगाल होऊन बसले इतकेच नाही, परंतु "आपले देशांत सुधारणा करा, आपले देशात सुधारणा करा," अशी जी सुधारलेले ब्राह्मण लोक निदान बाह्यात्कारी हल्ली हाकाटी पिटीत आहेत, त्यांस कारण त्यांची ही वर जाणविलेली धर्माची बाब कारण झाली, हे अगदी निर्विवाद आहे."

अशा रीतीने अनेक दृष्टींनी जो धर्म भारतीयांच्या अध:पाताला कारणीभूत झाला, तो दूर सारला पाहिजे, असे त्यांना वाटले. तथापि, खरा धर्म आपण नाकारत नाही, हेही त्यांनी अनेकदा स्पष्ट केले आहे. समाजधारणा करतो तो 'धर्म' हा शब्दाच्या व्युत्पत्तीनुसार मिळणारा धर्माचा मूळ अर्थ घेतला तर त्यांना तो अमान्य नव्हता. परंतु ब्राह्मणांनी त्याला जे विकृत रूप दिले, ते त्यांना मान्य नव्हते. उदाहरणार्थ, यशवंताबरोबर संवाद चाललेला असताना ब्राह्मण भूदेवांची सेवाचाकरी करणे हाच काय तो शूद्रांचा 'धर्म' या ब्राह्मणांच्या ग्रंथातील मतावर तुमचे म्हणणे काय, असे यशवंताने विचारल्यावर ते म्हणाले,[५५] "त्या ग्रंथांचे कर्ते तुमचे पूर्वज नसल्यामुळे आर्य धूर्त ब्राह्मणांतील ग्रंथकारांनी 'धर्म' शब्दाचे अनेक अर्थ होत असल्यामुळे त्यांनी (आर्यांनी) मूळ 'धर्म' शब्दाचे अर्थात जो काही खुबीदार अनर्थ केला तो मोठमोठ्या धर्मसंस्थापकांच्या ध्यानातसुद्धा आला नाही. तेथे अज्ञानी शूद्रांच्या लक्षात तो सहज कोठून येणार?... चोरी करणे हा चोराचा धर्म. लबाडी करणे लबाडाचा धर्म... अज्ञान्यास फसवून खाणे हा धूर्त ठकाचा 'धर्म'. याशिवाय धर्म या शब्दाचे अनेक अर्थ होत असून आर्य ब्राह्मणांनी 'धर्म' या शब्दाचा मूळचा खरा अर्थ येथे बाजूला ठेवून त्याच शब्दावर असे आंधळे गारूड रचून, एकंदर सर्व अज्ञानी शूद्रादी-अतिशूद्र जनांस फसवून (आपला धर्म) काढिला आहे." त्यांनी स्वत: खरा धर्म सत्यधर्माच्या स्वरूपात स्वीकारल्याचे विवेचन पुढे येईलच. पण वरील पद्धतीच्या विकृत धर्माविषयी मात्र ते त्वेषाने म्हणतात, "जाळ ह्या खोट्या धर्मास."

■

# ४. धक्कादायक मतांचे विश्लेषण

## शिवाजी महाराजांविषयी

फुल्यांनी धर्मचिकित्सा करताना मांडलेल्या काही धक्कादायक विचारांचे थोडे विवेचन येथे करायचे आहे. त्यांपैकी एक विचार शिवाजी महाराजांबद्दलचा आहे. फुल्यांचा हा विचार लोकांच्या श्रद्धेला धक्का देणारा आहे, असे म्हणून तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी तो पुढीलप्रमाणे उद्धृत केला आहे[५६], "शिवाजी राजाने मुसलमानी राज्य हाणून पाडले व नवीन हिंदू राज्य स्थापिले, याची काही गरज नव्हती; मुसलमानी राज्य काही वाईट नव्हते. मुसलमानी राज्यात जातिभेदाचे प्रस्थ कमी होत चालले होते. जातिनिष्ठ पक्षपात नाहीसा होत चालला होता." फुल्यांचे हे विचार उद्धृत करून ते चुकीचे असल्याचे स्पष्ट करताना तर्कतीर्थ म्हणतात, "जोतीरावांचे हे म्हणणे ऐतिहासिकदृष्ट्या बरोबर दिसत नाही. कारण दक्षिणेतील बहामनी राज्य शिवाजीच्या काळात डबघाईस येऊन प्रजेचा संसार नीट चालेनासा झाला व बेबंदशाही माजली. त्याकरिता शिवाजी राजाने नवीन राज्यस्थापना केली, हे यथायोग्यच झाले. कार्यक्षम नसलेले राज्य नष्ट करणे हे एक थोर ऐतिहासिक कर्तव्यच ठरते."

डॉ. गांगल यांनी तर्कतीर्थांचे वरील विवेचन अंशत: उद्धृत करून फुल्यांविषयीचा स्वत:चा निष्कर्ष पुढीलप्रमाणे मांडला आहे, "शिवाजी महाराजांच्या जीवितकार्याचे मूल्यमापन एखादा माणूस इतक्या अधम पातळीला जाऊन करू शकतो म्हणून संतापावे, की अशा माणसाला आपण 'महात्मा' पदवी देऊन गौरविले म्हणून शरमेने मान खाली घालावी?" शिवाजी महाराजांचा हिंदू-धर्माभिमान हिंदू-धर्मद्वेष्ट्या फुल्यांना सहन न झाल्यामुळे त्यांनी त्यांच्यावर टीका केली, असा गांगलांनी फुल्यांच्या टीकेचा अन्वयार्थ लावला आहे. शिवाजी महाराजांविषयी आदर असलेल्या लोकांच्या मनात फुल्यांविषयी तिटकारा निर्माण करण्याच्या दुष्ट हेतूने गांगलांनी अत्यंत धूर्तपणे हे विवेचन उपस्थित केले आहे, हे अगदी उघड आहे. तरीही त्यांनी सत्यसंशोधनाच्या शुद्ध हेतूनेच हे विवेचन केले आहे, असे वादासाठी गृहीत धरून मी या बाबतीत माझी भूमिका मांडणार आहे.

अधिकृत फुले वाङ्मयातील एकाही ग्रंथात फुल्यांनी लिहिलेले असे विधान नाही. आणि १९४० साली तर्कतीर्थांनी उद्धृत केलेले हे अवतरण १९६९ च्या विवेचनात गाळले आहे, असे श्री. हरी नरके यांनी या संदर्भात दाखवून दिले आहे.[५७] फुल्यांनी अशा प्रकारचे विधान केलेच नसल्यामुळे ते या बाबतीत निर्दोष आहेत, असे सुचविण्याचा श्री. नरके यांचा प्रयत्न आहे. शब्दांचा काटेकोर विचार करायचा, तर त्यांचा हा प्रयत्न रास्तच आहे. तरीही या मुद्द्याचे थोडे अधिक विवेचन हवे.

फुल्यांच्या वाङ्मयात अगदी असेच्या असे विधान आढळत नसले, तरी अंशत: याच्याशी सादृश्य असलेले पुढील विधान आढळते[५८], "आणि तशा बुद्धिमान मानवजातींपैकी शूद्र शिवाजी शेतकऱ्याने एका देवास भजणाऱ्या मुसलमानी बादशहास जरजर करून गाईब्राह्मणांसह त्यांच्या मतबली धर्माचा प्रतिपाळ केला." तर्कतीर्थांनी याच विधानाचा आशय अधिक स्पष्ट करून विवेचन केले असण्याची शक्यता आहे. फुल्यांच्या प्रस्तुत विधानातून गांगल म्हणतात इतका कुत्सित अर्थ निघाला नाही, तरी शिवाजी महाराजांनी मुसलमान राजाला जर्जर केल्याबद्दल फुल्यांनी त्यांचे कौतुक करण्याऐवजी नापसंती व्यक्त करणे; हे आपल्याला खटकल्याखेरीज राहत नाही. स्वाभाविकच, फुल्यांचे हे कृत्य हिंदू धर्माच्या द्वेषाचे व मुस्लीमधार्जिण्या वृत्तीचे द्योतक आहे का, हे जाणून घेतले पाहिजे.

फुल्यांनी आत्यंतिक आदराने शिवाजींचा पोवाडा लिहिला. शिवाजींच्या समाधीवरील पालापाचोळा दूर करून ती स्वच्छ करण्याचे काम त्यांनीच सर्वप्रथम केले. समाधीच्या जीर्णोद्धारासाठी निधी जमविण्याकरिता सभा घेतल्या. एवढेच नव्हे, तर मुसलमान हिंदूंना पीडा देत आहेत, हे आईकडून ऐकून शिवाजी लढण्यास सज्ज झाले आणि तोरणा जिंकून त्यांनी हिंदूंचा झेंडा लावला, हे पोवाड्यात सांगताना फुल्यांनी त्याबद्दल कोणत्याही प्रकारे नापसंती दाखविली नसून हे उल्लेख गौरवानेच केले आहेत. मुसलमान बादशहांची क्रूर राजवट व त्यांची लंपटता यांवर त्यांनी जबरदस्त टीका केली आहे. मग आपल्या या सर्व आचरणांशी विसंगत व दोषास्पद वाटणारे उपर्युक्त विधान त्यांनी का केले, हा प्रश्न आपल्यापुढे सहजच उभा राहतो. प्रथमदर्शनी वाटते तितके या प्रश्नाचे उत्तर अवघड मात्र नाही.

धर्माच्या नावावर शोषण करणाऱ्यांनी बनावट ग्रंथ केले आहेत, असे फुले आयुष्यभर पोटतिडकीने सांगत आले होते. त्यांचे हे मत भारतीय इतिहासाच्या विकृतीकरणावर तत्त्वत: अचूक बोट ठेवणारे होते. चिपळूणकरांच्या भाषेत सांगायचे तर 'ज्यांच्या कंबरेला ज्ञानाच्या किल्ल्या होत्या' त्यांनी भारतीय इतिहासातील असंख्य महापुरुषांची चरित्रे स्वत:ला अनुकूल ठरतील अशा पद्धतीने विकृत केली आहेत. प्रल्हाद, बुद्ध, राम, कृष्ण, ज्ञानेश्वर, शिवाजी आणि इतर असंख्य व्यक्ती या मालिकेत

आहेत. यांपैकी काही व्यक्तींच्या चरित्रावर इतर इतकी पुटे चढविण्यात आली आहेत, की त्यांचे मूळ रूप शोधून त्यांच्याविषयी बिनचूक मत बनविणे भल्या भल्या संशोधकांनाही कठीण जाते.

अशाच एका विकृतीकरणामुळे फुल्यांच्या मनात शिवाजी महाराजांविषयी किंचितसे किल्मिष निर्माण झाले होते. स्वाभाविकच, त्यांनी उपर्युक्त विधानात महाराजांच्या वर्तनाविषयी काहीसा नापसंतीचा सूर काढला. हे विकृतीकरण म्हणजे शिवाजी महाराजांना विशिष्ट लोकांकडून लावले जाणारे 'गोब्राह्मणप्रतिपालक' हे विशेषण होय. वस्तुत: शिवाजी महाराजांनी हे विशेषण स्वत:ला कधीही लावून घेतले नव्हते. परंतु हे विशेषण बनावट आहे हे स्पष्ट करणारे संशोधन फुल्यांच्या काळात उपलब्ध झालेले नसल्यामुळे त्यांना ते खरे वाटले.

वरील वस्तुस्थिती ध्यानात घेतली, तर बऱ्याच गोष्टी उलगडू लागतात. शिवाजी महाराजांचे कार्य फुल्यांच्या दृष्टीने एरव्ही अत्यंत आदरणीय असूनही त्यांनी स्वत:ला 'गोब्राह्मणप्रतिपालक' म्हणवून घेणे, हे फुल्यांना खटकणे अगदी स्वाभाविक होते. त्यांनी स्वत:ला फक्त 'गोरक्षक' म्हणवून घेतले असते, तर फुल्यांना काहीच वाईट वाटले नसते. कारण धार्मिक कारणाने नसले, तरी शेतीच्या उत्कर्षासाठी गोहत्येवर बंदी घालावी, इंग्रज व मुसलमान यांना गायी मारू देऊ नये, असे त्यांनी आग्रहाने सांगितले आहे. पण 'ब्राह्मणप्रतिपालक' हा काय प्रकार आहे? शिवाजीसारख्या विवेकी राजाने खरे तर स्वत:ला सर्व प्रजेचा आणि किमान सर्व हिंदू प्रजेचा तरी प्रतिपालक म्हणवून घ्यायला नको कोय? केवळ ब्राह्मणांचेच प्रतिपालन करण्याची बांधिलकी मानणाऱ्या राजाविषयी फुल्यांनाच काय, कोणाही समंजस माणसाला नाराजी वाटेल. आता, प्रत्यक्षात शिवाजी महाराजांनी हे विशेषण स्वत:ला लावून घेतलेलेच नसल्यामुळे त्यांच्यावर काही दोष येतच नाही. फुल्यांची चूक इतकीच की हे विशेषण खोटे असल्याचे संशोधन त्यांना उपलब्ध नव्हते.

स्वत:च्या वैचारिक पूर्वजांनी घुसडलेले हे बनावट विशेषण इतिहासज्ज्ञ गांगलांनी एकाहून अधिक वेळा वापरले असून त्यांपैकी एके ठिकाणी ते म्हणतात, ''महात्मा फुल्यांप्रमाणे गोब्राह्मणप्रतिपालक शिवाजी महाराज जात्यंध नसल्यामुळे...'' याचा अर्थ महाराज गोब्राह्मणप्रतिपालक होते, अशीच डॉ. गांगलांचीही धारणा आहे. त्यांना नवे संशोधन उपलब्ध असले, तरी ते स्वीकारण्याची त्यांची इच्छा नाही. कारण शिवाजी महाराजांचे चरित्र आपल्याला अनुकूल असेच रंगविले जावे, अशी त्यांचीही इच्छा आहे. याचा अन्वयार्थ स्पष्ट आहे. फुल्यांच्या विधानातून महाराजांना किंचितसा दोष दिल्यासारखे जे दिसते, त्याची संपूर्ण जबाबदारी आपल्या हितसंबंधांसाठी महाराजांना 'गोब्राह्मणप्रतिपालक' म्हणून त्यांचे चरित्र संकुचित करणाऱ्यांवर आहे.

फुल्यांच्या मनात मुस्लीमधार्जिण्या वृत्तीमुळे महाराजांविषयी अनादर होता काय आणि महाराजांना गोब्राह्मणप्रतिपालक म्हणणाऱ्यांच्या मनात त्यांच्याविषयी आदर होता काय, हे स्पष्ट करणारी माहिती माधवराव बागलांनी म. फुले गौरवग्रंथात पुढीलप्रमाणे दिली आहे[५९] : शिवस्मारकाची कल्पना फुल्यांची, पण हे कितीजणांना माहीत आहे. फुलेच स्वत: लिहितात, "पुण्यास आलो व शिवछत्रपतींच्या समाधीचे दर्शन घेण्यासाठी रायगडी जाण्यास निघालो. समाधीची जागा शोधण्यात २-३ दिवस गेले. घाणेरी व इतर जंगली झुडपे कुऱ्हाडीने तोडीत रस्ता काढावा लागला... शिवजन्म उत्सव साजरा करावा, म्हणून समाधीवरील सर्व कचरा धुवून काढून त्यावर फुले वाहिली. ही सर्व हकिकत येथील ग्रामभटास कळताच तो वर आला. 'कुणबट शिवाजीच्या थडग्याचा देव केला. मी ग्रामजोशी असता दक्षिणा, शिधा देण्याचे राहिले बाजूला. केवढा माझा अपमान!' असे म्हणून त्याने लाथेने समाधीवरील फुले उधळून दिली. 'अरे कुणबटा! तुझा शिवाजी काय देव होता, म्हणून त्याची पूजा केलीत! तो शूद्रांचा राजा, त्याची मुंजसुद्धा झाली नव्हती.'

मी रागाने वेडा झालो. ज्यांच्या जिवावर पेशव्यांना राज्य मिळाले, त्या शिवप्रभूंची पूजासामग्री ह्या भटाभिक्षुकांनी पायातील पादत्राणाने लाथाडावी काय? मी संतापवायूने वेडा होऊन गेलो. त्यांचे स्मारक म्हणून मी अल्प काव्य केले आहे, ते त्यांना समर्पण करतो."

बागलांनी दिलेल्या या माहितीवर अधिक भाष्य करण्याची गरज नाही. महाराजांविषयीचे फुल्यांचे मत प्रथमदर्शनी धक्कादायक वाटले, तरी प्रत्यक्षात ते तसे नाही आणि महाराजांच्या हिंदुधर्माभिमानामुळे फुले त्यांचा द्वेष करीत होते, अशी हूल उठवून त्यांच्या सामाजिक कार्याविषयी सर्वसामान्य लोकांच्या भावना कलुषित करण्याचे प्रयत्न यशस्वी होणार नाहीत, एवढे यावरून आपोआपच स्पष्ट होईल.

## ज्ञानेश्वरांविषयी

फुल्यांनी ज्ञानेश्वरांवर केलेली टीका अशीच प्रथमदर्शनी अन्यायकारक वाटली, तरी प्राप्त परिस्थितीत त्यांनी घेतलेली भूमिका योग्य होती, असाच निर्वाळा याही बाबतीत द्यावा लागतो.

मुकुंदराज, ज्ञानेश्वर इत्यादींनी मराठी भाषेत ग्रंथ लिहिले, या घटनेवर भाष्य करताना फुले म्हणतात, "मुसलमान लोक या देशात येण्याच्या संधीस धूर्त आर्य मुकुंदराजास शूद्रादी-अतिशूद्रांची दया येऊन त्याने त्याजकरिता प्राकृत 'विवेकसिंधू' त्याचवेळी का केला? यातील कावेबाजी अशी आहे की, अज्ञानी शूद्रादी-अतिशूद्रांनी मुसलमान होऊन धूर्त आर्य-भट्टांच्या मतलबी धर्माची फटफजिती करू नये."

फुल्यांच्या या टीकेच्या संदर्भात पुढील बाबी ध्यानात घेणे आवश्यक आहे. मुसलमानांचे राज्य आल्यावर येथील संस्कृत पंडित, शास्त्रकार इत्यादींवर राजसत्तेचा दबाव आला. तसेच काही ब्राह्मणांसह अनेक शूद्रातिशूद्र मुसलमान होण्याचा धोकाही निर्माण झाला. अशी परिस्थिती नसती, तर त्या पंडित वगैरेंनी आणखी बराच काळपर्यंत मराठीत ग्रंथरचना होऊ दिली नसती, हे खरेच आहे. संतांनी आपल्या कार्याने हिंदूंना मुसलमान होण्यापासून परावृत्त केले, असे श्रेय संतांना दिले जातेच. याचा अर्थ हिंदूंनी मुसलमान होऊ नये, हा अनेक संतांच्या मराठी ग्रंथरचनेमागचा एक हेतू होता, असे मानण्यात ऐतिहासिकदृष्ट्या चुकीचे काहीच नाही. या दृष्टीने रामदासांचे पुढील विचार उदाहरण म्हणून घेता येतील[६०] :

*ब्राह्मण बुद्धीपासून चेवले । आचारापासून भ्रष्टले ।*
*गुरुत्व सांडून जाले । शिष्य शिष्यांचे ॥*
*कित्येक दावलमतकास जाती । कित्येक पीरास भजती ।*
*कित्येक तुरुक होती । आपले इच्छेने ॥*

हिंदूंनी मुसलमान होऊ नये, ही तीव्र इच्छा या विचारांतून व्यक्त झाली आहे.

आता संतांनी केलेले हे कार्य कावेबाजीचे होते, हा फुल्यांचा विचार योग्य आहे का, असा प्रश्न निर्माण होतो. ज्ञानेश्वरांनी शूद्रांच्या दासत्वाविरुद्ध बंड केले नाही, ही त्यांची मर्यादा मान्य केली, तरी त्यांच्या ग्रंथरचनेमागे कावेबाजी होती, असे म्हणता येणार नाही. इतर काही जणांच्या लेखनात मात्र तशी कावेबाजी होती असे जरूर म्हणता येते. शूद्रातिशूद्रांना मुसलमान तर होऊ द्यायचे नाही आणि हिंदू धर्मात बरोबरीचे स्थानही द्यायचे नाही, हे वर्तन नि:संशय कावेबाजीचे म्हटले पाहिजे. आणि जे ग्रंथकार या उद्देशाने मराठीत ग्रंथरचना करू लागले, त्यांच्यावर फुल्यांनी कावेबाजीचा आरोप केला, तर सदैव शूद्रातिशूद्रांचे हित पाहण्याच्या त्यांच्या दृष्टिकोनाशी तो अगदी सुसंगत म्हटला पाहिजे. कारण हिंदू धर्मात अस्पृश्य वगैरे अवस्थेत राहून कुजण्यापेक्षा मुसलमान होणे बरे, असे फुल्यांना वाटत असे. त्यांना इस्लाम धर्म परिपूर्ण वाटत होता, असा याचा अर्थ नव्हे. परंतु हिंदू धर्मात जीव गुदमरत होता आणि जीव असा गुदमरून टाकणाऱ्याच्या मेंदूला झिणझिण्या याव्यात, त्यांचा विवेक जागा व्हावा, म्हणून फुले असे वैचारिक फटके मारत असत. उदाहरणार्थ, मुसलमानांनी शूद्रातिशूद्रांना बाटवून त्यांच्याशी रोटी-बेटी व्यवहार सुरू केला. आणि त्यांच्या तोंडाकडे आर्यभटांस टकमटा पाहावयास लावले, असे फुले म्हणतात.

आता कावेबाजी करणाऱ्या ग्रंथकारांमध्ये फुल्यांनी सर्वसामान्यांच्या श्रद्धेचा विषय असलेल्या ज्ञानेश्वरांचा अंतर्भाव का केला, हे पाहायचे आहे. हे पाहताना

फुल्यांच्या ज्ञानेश्वरांवरील टीकेतही 'ज्ञानाच्या किल्ल्या कंबरेला बांधणारांनी' केलेले इतिहासाचे विकृतीकरणच कारणीभूत झाले आहे, हे पुढील विवेचनावरून स्पष्ट होईल.

शूद्रातिशूद्रांना विद्येपा ़न वंचित केल्याबद्दल फुल्यांनी ब्राह्मणांवर कठोर टीका केली आहे. आता ज्ञानेश्वर हे शूद्रातिशूद्रांमध्ये अंतर्भूत असल्यामुळे आणि त्यांनाही ब्राह्मणांनी संस्कृत विद्येपासून वंचित केले असल्यामुळे खरे तर फुल्यांना ज्ञानेश्वरांविषयी आत्मीयताच वाटायला हवी होती. तुम्हाला देव मानू, पण ब्राह्मण मानणार नाही, असे तत्कालीन ब्राह्मणांनी ज्ञानेश्वरांना सुनावले होते. यात देवापेक्षाही ब्राह्मणाला श्रेष्ठ मानले आहे, हे तर खरेच; पण ज्ञानेश्वरांविषयीचा तिरस्कारही स्पष्ट आहे. धर्मशास्त्रानुसार ज्ञानेश्वर हे नुसते शूद्र नव्हे, तर चांडाळ होते. कारण त्यांचे वडील संन्यासानंतर गृहस्थ झाले. त्यामुळे ते शूद्र बनले. आई मात्र ब्राह्मणच राहिली. शूद्र पुरुष व ब्राह्मण स्त्री यांच्या संबंधातून निर्माण होणारे अपत्य चांडाळ मानले जाई. ज्ञानेश्वरांनी आपल्या भावंडांसह हे सर्व विष पचविले होते.

हे सर्व ध्यानात न घेता फुले त्यांच्यावर जी टीका करतात, तिचे कारण मात्र स्पष्ट आहे. ज्ञानेश्वरांचा असा अपमान झाला, तरी खेड्यापाड्यांतील लोकांनी त्यांना आपल्या हृदयात विराजमान केल्यामुळे त्यांना खूप प्रतिष्ठा प्राप्त झाली. त्यांच्या श्रेष्ठ प्रतिमेनेही लोकांचे डोळे दिपले. त्यामुळे एकवेळ अशी आली की ते आमचेच आहेत, असे म्हणावयास सनातन्यांनी प्रारंभ केला. आता त्यांना ब्राह्मण म्हटल्यामुळे एकूण ब्राह्मण जातीला कमीपणा येण्याऐवजी तिचा गौरव होणार आहे, हे ध्यानात आल्यावर त्यांना ब्राह्मण म्हणून मान्यता दिली गेली. आपले हितसंबंध जपण्यासाठी प्रतिष्ठितांना आपलेसे करण्याची ही प्रक्रिया भारतात असंख्य व्यक्तींच्या बाबतीत घडली आहे. परंतु या प्रक्रियेचे स्वरूप स्पष्ट करणारे संशोधन फुल्यांना उपलब्ध नसल्यामुळे त्यांनी ज्ञानेश्वरांना परंपराप्रेमी ब्राह्मण ग्रंथकार मानून टीका केली. अर्थात, ही टीका ते ब्राह्मण होते, एवढ्याच समजुतीवरून करण्यात आलेली नव्हती. तसे असते तर ब्राह्मण बृहस्पतीचा त्यांनी अत्यंत गौरवाने उल्लेख केला नसता. 'ज्ञानेश्वरी'मध्ये आढळणारे चातुर्वर्ण्याचे समर्थन, हे फुल्यांच्या टीकेचे मूळ कारण होते.

खरे तर येथे आणखी एक महत्त्वाचा प्रश्न निर्माण होतो. ज्ञानेश्वरांनी एवढा अपमान झाल्यावरही चातुर्वर्ण्याचे समर्थन करणारे लेखन कसे केले, हा तो प्रश्न होय. असे लेखन करणाऱ्या व्यक्तीवर फुले टीका करणार, यात काही शंकाच नाही. उदाहरणार्थ, ते म्हणतात[६१], "मुकुंदराज, ज्ञानेश्वर, रामदास वगैरे अनेक 'पायलीचे पंधरा आणि अधोलीचे सोळा' ब्राह्मण ग्रंथकार होऊन वाया गेले. परंतु त्यातून एकानेही शूद्रांच्या

गळ्यातील दासत्वाच्या पट्ट्याला बोटसुद्धा लावून दाखवले नाही. कारण ब्राह्मणांचा दुष्ट कर्माचा उघड रीतीने त्याग करण्याचे धैर्य त्यांना होईना... त्यांनी अनेक भारेचे भारे पोकळ प्राकृत ग्रंथ करून आपल्या मतलबी जातीला, अज्ञानी शूद्रास तुटून खाऊं दिले.'' फुल्यांच्या या टीकेत अनुचित असे काहीच नाही. ज्ञानेश्वरांनी केलेल्या समर्थनाचे स्वरूप समजण्यासाठी मात्र प्रतिष्ठातांना आत्मसात करण्याची उपर्युक्त प्रक्रिया कशी घडते, ते ध्यानात घेतले पाहिजे.

ज्ञानेश्वरांसारख्यांचे चरित्र व विचार मान्य नसल्यामुळेच प्रस्थापितांनी त्यांना प्रथम दूर ढकलले असते परंतु कालांतराने नाइलाजाने त्यांना स्वीकारण्याची वेळ आल्यावर त्यांना जसेच्या तसे स्वीकारले जात नाही. त्यांच्या चरित्रात व विचारात आपल्याला अनुकूल असे बदल करून मगच त्यांना स्वीकारले जाते. प्रचाराची सर्व साधने हातात असल्यामुळे हे त्यांना सहजपणे शक्य होते. हे बदल केलेली ती व्यक्ती आता एका वेगळ्याच रूपात लोकांसमोर येते. त्यांना तिचे हे नवे रूप खरे वाटते. ज्ञानेश्वरांच्या बाबतीत हे असे घडले आहे, याचा अत्यंत स्पष्ट पुरावा उपलब्ध आहे.

ज्ञानेश्वरांनी सांगितलेली 'ज्ञानेश्वरी' जशीच्या तशी आपल्यापुढे आलेली नाही. एकनाथांच्या काळापर्यंतच म्हणजे तीन-चारशे वर्षांतच 'ज्ञानेश्वरी' अशुद्ध झाली; याचा अर्थ मूळच्या पेक्षा भिन्न झाली आणि एकनाथांना ती शुद्ध करावी लागली; मग ज्ञानेश्वरांनी एकनाथांना दृष्टान्त देऊन समाधीच्या जागी आपल्या गळ्याला टोचणारी अजान वृक्षाची मुळी काढण्यास सांगितले, अशी कथा आहे. ही मुळी हे 'ज्ञानेश्वरी'तील अशुद्धांचे प्रतीकच होय. यातील काही अशुद्धे हस्तलिखिते तयार करताना वा अशाच निर्हेतुक कारणांनीही झाली असतील. परंतु काही अशुद्धे आपल्या हितसंबंधांना अनुकूल असे रूप 'ज्ञानेश्वरी'ला देण्याच्या प्रयत्नातून झाली असतील, यात मुळीच शंका नाही. ही अशुद्धे स्वत: ज्ञानेश्वरांना कासावीस करून टाकण्याइतकी विकृत असली पाहिजेत. एकनाथांच्या शुद्धीकरणानंतरदेखील अनेक अशुद्ध 'ज्ञानेश्वरी'त राहिली असतील आणि ज्ञानेश्वरांना व्यथित करण्याइतकी ती क्लेशकारक असतील, यात मुळीच शंका नाही. 'ज्ञानेश्वरी'चे स्वरूप अशा पद्धतीने बदलण्याच्या प्रक्रियेचा अन्ववार्थ फुल्यांपुढे असण्याची शक्यता नव्हती, याची आपण नोंद घेतली पाहिजे.

ज्ञानेश्वरांना आपलेसे करण्याचा प्रयत्न जाणीवपूर्वक कसा केला जातो याचे एक अगदी ताजे उदाहरण येथे देतो. मे १९९१ मध्ये पुण्यात 'संतसाहित्यावरील आक्षेप आणि उत्तरे-प्रत्युत्तरे' या विषयावरील एका जाहीर परिसंवादात मी सहभागी झालो होतो. या परिसंवादात संत साहित्याचे अभ्यासक म्हणून प्रसिद्ध असलेले डॉ. हे. वि. इनामदार म्हणाले, ''ज्ञानेश्वर व गोळवलकर गुरुजी यांचे विचार एकच आहेत.'' त्यांच्या विधानाविषयी संभ्रम राहू नये म्हणून ते वाक्य पुन्हा उच्चारून आपणाला असेच

म्हणायचे आहे ना, असे मी सर्व श्रोत्यांदेखत त्यांना विचारले. त्यांनी होकार दिल्यावर मी त्यांना म्हणालो, "ज्ञानेश्वरांना ज्यांनी छळले त्यांची मूल्ये पवित्र होती असेही म्हणायचे आणि ज्ञानेश्वर व गोळवलकर यांचे विचार एकच आहेत असेही म्हणायचे. हे चालणार नाही. आधी ज्ञानेश्वरांचा छळ करणाऱ्यांची मूल्ये चुकीची होती, हे मान्य करा. मग तुमच्या या मताचा विचार करता येईल." सांगण्याचा हेतू हा की, ज्या समाजाने ज्ञानेश्वरांना अपार यातना दिल्या तोच समाज आज ज्ञानेश्वरांना कट्टर हिंदुत्ववाद्यांच्या गोटामध्ये प्रस्थापित करीत आहे. फुल्यांच्या काळातही ज्ञानेश्वरांच्या बाबतीत ही प्रक्रिया घडलेली होतीच. चातुर्वर्ण्याचे समर्थन 'ज्ञानेश्वरी'त घुसडून मगच ज्ञानेश्वरांना आपलेसे करण्याची प्रक्रिया पूर्ण झाली असण्याची शक्यता आहे. आता 'ज्ञानेश्वरी'मध्ये काही भाग घुसडला गेल्यामुळे स्वत: ज्ञानेश्वरांनी चातुर्वर्ण्याविषयी नेमके काय म्हटले होते, हे स्पष्ट बनले आहे. परंतु त्यांनी खरोखरच समर्थन केलेले असेल, तर त्याही दृष्टीने फुल्यांची टीका योग्य ठरते. फुले टीका करताना त्या टीकेचा विषय होणाऱ्या व्यक्ती किती प्रतिष्ठित वा विख्यात आहेत हे पाहत नसत. त्या व्यक्तींची विशिष्ट कृती न्यायाची आहे की नाही, हे पाहत असत, हे यावरून स्पष्ट होते. ही भूमिका गैर आहे, असेही म्हणता येत नाही.

■

# ५. परधर्माविषयी भूमिका

## इस्लाम-स्वागत

हिंदू धर्मातील विविध घटकांवर कठोर हल्ले चढवीत असतानाच दुसरीकडे फुल्यांनी मुसलमान धर्माशी संबंधित अशा अनेक गोष्टींचे स्वागत केले आहे, स्तुती केली आहे. शूद्रादी-अतिशूद्रांच्या मुक्ततेसाठी ईश्वराने मुसलमानांना भारतात पाठवले; त्यांना जबरदस्तीने बाटवून मुसलमान करण्यात आले असले, तरी ते त्यांच्या मुक्ततेतच कृत्य होते इत्यादी प्रकारची मते त्यांनी मांडली आहेत. महंमदी धर्म स्वीकारण्याचा विचारही त्यांनी एकदा व्यक्त केला आहे. मुसलमानांनी हिंदूंच्या सुंता केल्या, सोरटी सोमनाथासारख्या मूर्ती फोडल्या इत्यादी कृत्यांबद्दल नापसंती तर नाहीच, उलट काहीसे समाधानच प्रकट केले आहे. मुसलमानांमध्ये नीतीने वागणारे बहुतेक आहेत, असे म्हटले आहे. मुसलमानांनी सर्व हिंदूंना मुसलमान केले नाही, याविषयी त्यांनी काही वेळा खंत व्यक्त केली आहे. महंमद पैगंबरांवर पोवाडा लिहिला आहे. कुराण, कलमा, मुसलमान धर्म, मुसलमान राज्य इत्यादींचा 'पवित्र' असा निर्देश करून त्यांनी त्यांचा गौरव केला आहे. मुसलमानांचा उल्लेख 'जहाँमर्द' (पराक्रमी) असा करून मुसलमानांच्या धर्मग्रंथाशी तुमच्या गमज्या चालणार नाहीत, असे त्यांनी ब्राह्मो व प्रार्थनासमाजाच्या सभासदांना सुनावले आहे. फुल्यांनी इस्लामविषयी व्यक्त केलेली ही मते त्यांच्या स्वधर्मद्रोही व मुस्लीमधार्जिण्या वृत्तीची द्योतक आहेत काय, हे काळजीपूर्वक तपासून पाहिले पाहिजे. यासाठी त्यांनी केलेल्या इस्लामच्या स्वागताचे स्वरूप व मर्यादा, त्याची हिंदू व इस्लाम धर्मांमध्ये आढळणारी कारणे, त्यांनी मुसलमानांवर केलेली टीका इत्यादी बाबी नीट समजून घेतल्या पाहिजेत.

## स्वागताच्या मर्यादा

या संदर्भात महत्त्वाची गोष्ट म्हणजे फुल्यांनी इस्लामचे जसे आणि जेवढे स्वागत केले आहे, तसे आणि तेवढेच ते असल्याचे आपण मानले पाहिजे. आपल्या

पूर्वग्रहांच्या रंगामध्ये रंगवून त्या स्वागताचे स्वरूप बदलता कामा नये. ही कसोटी लावायची, तर या स्वागताला असलेल्या पुढील मर्यादा आपल्याला ध्यानात घ्याव्या लागतील. स्वागताच्या कारणांचे विवेचन मात्र मर्यादांच्या बरोबर न करता पुढे स्वतंत्रपणे करणे योग्य ठरेल.

निर्मिकाने मुसलमानांना भारतात पाठविले, असे फुल्यांनी म्हटले, हे खरे आहे. परंतु सर्वांना पवित्र मानवी अधिकार देण्यासाठी पाठविले असताना त्यांनी ते कार्य केले नाही म्हणून तो संतापला आणि त्यांना तोंडघशी पाडून त्याने त्यांचे सर्व वैभव नष्ट केले, असेही त्यांनी म्हटले आहे.[६२] त्यांनी केलेल्या स्वागतातून विशिष्ट अपेक्षा सूचित होत होती, परंतु अपेक्षाभंग झाल्यामुळे ते स्वागत व्यर्थ ठरले, असे स्वतः त्यांनीच अशा रीतीने स्पष्ट केले आहे. मुसलमानांनी हिंदूंना बाटविल्याबद्दल त्यांनी समाधान व्यक्त केले, हेही खरे आहे. परंतु 'इस्लाम' हा धर्म परिपूर्ण व परमकल्याणकारक असल्यामुळे स्वीकार्य आहे, अशी काही यामागची भावना नव्हती. म्हणूनच त्यांनी स्वतः धर्मांतर करून इस्लामचा स्वीकार केला नाही वा दुसऱ्या कोणी तो स्वीकारावा, असा प्रचारही केला नाही. महंमदी धर्माचा स्वीकार करण्याचा विचार मांडताना त्यांनी त्याच्या जोडीने ख्रिस्ती धर्माच्या स्वीकाराचाही विचार मांडला आहे. शिवाय[६३], ''नाही तर आपण सर्वांचा निर्माणकर्ता आहे, त्यापाशी उत्तम धर्म मागून घेऊ. तुम्ही आता आमची पोकळ काळजी करू नका'' असेही त्याच ठिकाणी म्हटले आहे. नुसते म्हटलेच नाही, तर प्रत्यक्षात त्यांनी महंमदी व ख्रिस्ती धर्मांऐवजी सत्यधर्माचा पुरस्कारही केला. सत्यधर्माची 'जहामर्दी' जगामध्ये असल्यामुळे मुसलमानांनाही 'सत्यधर्म' स्वीकारावयास लावावे, असेही त्यांनी म्हटले आहे.[६४]

*सुन्नी-शिया सर्व करा सत्यवादी । त्याची जहामर्दी । जगाठायी ।।*
*जगामाजी एक सत्यधर्म खास । सांगा सर्वत्रांस । जोमाती म्हणे ।।*

तात्पर्य, भूतकाळात मुसलमानांनी हिंदूंना बाटविले, या घटनेबद्दल फुल्यांनी समाधान व्यक्त केले असले, तरी नव्या युगात हिंदूंनी मुसलमान व्हावे, असे त्यांना वाटत नव्हते, हे स्पष्ट आहे. सर्व हिंदूंना मुसलमान न केल्याबद्दलची त्याची खंतही वास्तविकरीत्या मुसलमान न केल्याबद्दलची नसून त्यांना पवित्र मानवी अधिकार न मिळाल्याबद्दलची आहे. त्यांनी महंमद पैगंबरांवर पोवाडा लिहिला, परंतु त्याला शीर्षकच 'मानव महंमद' असे दिले.[६५] महंमदांविषयी त्यांना अत्यंत आदर वाटत होता. परंतु ते एक श्रेष्ठ मानव आहेत, या भावनेतून हा आदर निर्माण झाला होता. मुसलमान लोक त्यांना ईश्वराचा प्रेषित मानतात, हे ठाऊक असूनही पोवाड्याच्या शीर्षकातच 'मानव' हा शब्द वापरणे, याचा अर्थ इस्लामचा एक मूलभूत सिद्धान्त जाणीवपूर्वक

नाकारणे असाच होतो. कुराण वगैरेंचा उल्लेख त्यांनी 'पवित्र' आणि एके ठिकाणी तर 'ईश्वराकडून आलेले म्हणण्यालायक' असा केला आहे. परंतु कुराण 'ईश्वरनिर्मित आहे', असा या विधानांचा अर्थ होत नाही. महंमदाने निर्मिकाच्या अधिकाऱ्यांविषयी बरेच पवित्र कुराण लिहून ठेवले आहे,' किंवा 'जगहितासाठी लिहिले कुराण', असे त्यांनी म्हटले असून महमदांना 'मानव' असे विशेषण लावून कुराण मानवनिर्मित असल्याचे त्यांनी नि:संदिग्ध स्वरूपात स्पष्ट केले आहे. आणखी एका वेगळ्या स्वरूपात त्यांनी हे दाखवून दिले आहे. आपण निर्मिक दाखवू, असे सर्व धर्मांचे गुरू म्हणतात. मुसलमान धर्मगुरूने आम्हाला निर्मिक दाखविला तर आम्ही त्याला पुढील प्रश्न विचारू, असे ते म्हणतात[६६], कुराण हद्दीस यवनास देशी । व्यर्थ लढवीशी। सुन्नी शिया ।। कुराण ईश्वराने निर्माण केले असते, तर ते फक्त यवनांनाच का दिले असते, असे त्यांना विचारायचे आहे. मुसलमानांच्या ग्रंथांशी तुमच्या गमज्या चालणार नाहीत, असे त्यांनी म्हटले असले तरी मुसलमानांचे राज्य नष्ट करण्याइतका निर्मिक न्यायी, दयाळू व समर्थ असल्याचे त्यांनी पुन:पुन्हा स्पष्ट केले आहे.

## स्वागताची कारणे

फुल्यांनी वरील मर्यादेत का होईना इस्लामचे स्वागत केले, याला हिंदू आणि इस्लाम या दोन्ही धर्मांतील जे घटक कारणीभूत झाले, त्यांपैकी काहींची चर्चा आता करायची आहे. 'इस्लाम' वा 'हिंदू' या धर्मांचेच नव्हे, तर कोणत्याही मूल्याचे स्वागत करण्यामागे वा न करण्यामागे फुल्यांचा एक निकष होता, एक मध्यवर्ती सूत्र होते, ते असे : तेथील स्त्रिया, शूद्रातिशूद्र इत्यादी सर्वसामान्य प्रजेच्या हिताचे कार्य जो कोणी करील त्याचे स्वागत त्याविरुद्ध जाईल त्याच्यावर टीका. ज्या काळात हिताचे करील त्या काळात स्वागत. इतर काळात विरोध. ज्या प्रमाणात व ज्या अंशाने हिताचे करील त्या प्रमाणात व त्या अंशाने स्वागत. इतरत्र विरोध.

या निकषाचा एक अत्यंत प्रबळ पुरावा आपण यापूर्वीच पाहिला आहे. शिवाजी महाराज हे फुल्यांचे एक स्फूर्तिस्थान होते. जॉर्ज वॉशिंग्टन, शिवाजी वगैरेंची चरित्रे अनेक वेळा वाचल्यामुळे त्यांनी केलेल्या अप्रतिम शौर्याचा ठसा फुल्यांच्या मनावर ठसला होता. आणि अन्यायाविरुद्ध लढण्याची प्रेरणा त्यांना त्यांच्याकडून मिळाली होती, असे त्यांचा दत्तक मुलगा यशवंत यानेच त्यांच्या चरित्रात नोंदवून ठेवले आहे.[६७] परंतु अशा महापुरुषाच्या चरित्रावर तथाकथित गोब्राह्मणप्रतिपालकत्वाची मर्यादा पडत आहे, अशी समजूत झाल्यावर फुल्यांनी आपल्या या स्फूर्तिस्थानाच्या वर्तनाविषयी नापसंती दर्शविण्यासही कमी केले नाही, हे आपण पाहिले आहे. राजाने फक्त एका जातीच्या प्रतिपालकत्वाची जबाबदारी घेतल्यास शूद्रातिशूद्रांच्या हितांना बाध येणार,

या जाणिवेने त्यांनी ही नापसंती व्यक्त केली. अशा स्थितीत इतरांच्या बाबतीत त्यांनी ही कसोटी किती कठोरपणे लावली असेल, हे सांगण्याचीही आवश्यकता नाही.

आर्य ब्राह्मणांची सेवाचाकरी करणे हाच आम्हा शूद्रांचा धर्म आहे, असे मानून जगण्यापेक्षा प्रसंगी आमच्या सोयीप्रमाणे महंमदी, ख्रिस्ती वा नवा उत्तम धर्मही स्वीकारू, असे त्यांनी एकदा म्हटले, ते या दृष्टिकोनामुळे होय. शूद्रादी-अतिशूद्र मुसलमान झाल्यामुळे फुल्यांना झालेले समाधान हे त्या लोकांची एका कोंडवाड्यातून सुटका झाल्याचे समाधान आहे. 'शूद्रादी-अतिशूद्रांचे कळपच्या कळप' ब्राह्मणांच्या तावडीतून सोडविले; आपमतलबी व बनावट धर्माच्या पाशातून, ब्रह्मकपटातून वा आर्यधर्माच्या पेचातून मुक्त केले, इत्यादी अर्थाची त्यांची विधाने हेच दाखवून देतात.

जहाँमर्द म्हणून मुसलमानांचा गौरव करण्यामागे फुल्यांचा काही खास दृष्टिकोन होता. ख्रिस्ती आणि फुल्यांचा सत्यधर्म हे पर्याय उपलब्ध झाले नव्हते, त्या काळात ब्राह्मणी विळख्यातून सुटका होण्याचा कोणताही मार्ग अज्ञानी व दुबळ्या लोकांपुढे नव्हता. अशा वेळी तलवार गाजविणारे मुसलमान ब्राह्मणांच्या पुढे उभे राहिले. त्यांचा पराक्रम हे त्या दीनदुबळ्यांचे एक आशास्थान होते, हे फुल्यांना सुचवायचे आहे. त्यांच्या ग्रंथांशी तुमच्या गमज्या चालणार नाहीत, असे म्हणतानाही फुल्यांचा हाच दृष्टिकोन होता. शूद्रादी-अतिशूद्रांना छळणाऱ्या लोकांना ख्रिस्ती लोकांकडून खरे प्रत्युत्तर मिळणार नाही. त्यांना दणका देण्यासाठी मुसलमानांप्रमाणे कठोरपणे वागणारेच हवेत. मुसलमानांचा क्रूरपणा इष्ट वाटल्यामुळे नव्हे, पण जे दुबळ्यांच्या पाठीशी लागतात, त्यांनी प्रबळ, कठोर अशा लोकांच्या वाटेला जाऊन दाखवावे, असे आव्हान देणे फुल्यांना अभिप्रेत आहे.

## धक्कातंत्र

ब्राह्मणांच्या मेंदूला झिणझिण्या आणण्यासाठी, त्यांचा विवेक जागा करण्यासाठी धक्कातंत्राचा (shock-treatment) प्रयोग करणे, हाही इस्लामच्या स्वागतामागचा फुल्यांच्या मनातील एक हेतू होता. आपल्या धर्मातील लोक दुसऱ्या धर्मात जाऊ लागल्याचे पाहून तरी ब्राह्मणांनी शहाणे व्हावे, असे त्यांना वाटत होते. मुसलमानांनी शूद्रादी-अतिशूद्रांना मुसलमानी धर्मांत सामील करून त्यांच्या तोंडाकडे आर्यभटांस टकामका पाहावयास लाविले, असे त्यांनी म्हटले आहे, ते त्यासाठीच होय. हिंदू बाटून मुसलमान बनल्यामुळे मुसलमानांचा प्रभाव वाढतो, हे पाहून ब्राह्मणांनी सर्व हिंदूंबरोबर अंत:करणपूर्वक एकी करावयास हवी होती. पण त्यांना तेवढे शहाणपण आले नाही, हे सांगताना फुले म्हणतात[६८], "अखेरीस कित्येक खुदापास्त मुसलमान सरदारांनी हजारो भटब्राह्मणांच्या कानाला धरून आपल्या मानवी धर्मात आढीत नेऊन

त्यांच्या चटचटा सुंता केल्या. तथापि त्यांनी हा काळपावेतो आपल्या संस्कृत पाठशाळांनी शूद्र शेतकऱ्यांचे मुलांस विद्या शिकविण्याची बंदी कायम ठेविली आहेच. यावरून शेतकऱ्यांबरोबर अशा ब्राह्मणांची एकी कशी होऊ शकेल?''

## समता नमाजापुरती!

हिंदू धर्माच्या कोंडवाड्यातून बाहेर पडून ज्या इस्लाम धर्मामध्ये जायचे, त्या धर्मामध्येही समता नव्हती, असा एक आक्षेप घेतला जातो. इस्लाम खऱ्याखुऱ्या अर्थाने समता मानत नाही. इस्लाममध्ये गुलामगिरी व बहुपत्नीकत्व आहे, निर्मिकाने भारतात समता निर्माण करण्यासाठी जर मुसलमानांना पाठविलेले असेल तर तो निर्मिळ भोळा असला पाहिजे, इस्लाममधील समता ही एक मिथ आहे, समता फक्त नमाज पढताना इत्यादी प्रकारची टीका काही जणांनी केली आहे. या मतांची सर्वांगीण चिकित्सा करण्याचे हे स्थान नव्हे. तथापि, इस्लाम पूर्णांशाने समता मानत नाही, हे अगदी उघड आहे. इस्लाममध्येही समता नाही हे मान्य केले तरी त्यामुळे हिंदू धर्मातील विषमता समर्थनीय ठरत नाही वा शूद्रांतिशूद्रांनी ती सहन केली पाहिजे, असा त्याचा अर्थ होत नाही, हा मुद्दा तूर्त बाजूला ठेवू. इस्लाममध्ये समता नसताना समतावादी फुल्यांनी इस्लामचे स्वागत कसे केले, याचे थोडे विवेचन आधी करू.

या बाबतीत पहिली गोष्ट म्हणजे आजच्या टीकाकारांना इतर अनेक क्षेत्रांप्रमाणेच इस्लाममधील गुलामगिरी, स्त्री-पुरुष संबंध इत्यादी बाबतीत जे नवे संशोधन उपलब्ध आहे, ते फुल्यांसमोर अथवा तत्कालीन दुसऱ्या कोणासमोरही असण्याची शक्यता नव्हती. दुसरी गोष्ट अशी, की फुल्यांनी इस्लामचे स्वागत केले, ते तुलनात्मक दृष्टिकोनातून होय. दोन्ही धर्मांची तुलना करताना त्यांना अशा काही बाबी निःसंशयपणे आढळलेल्या की, ज्या बाबतीत हिंदू धर्मामध्ये समता नव्हती आणि इस्लाममध्ये होती. त्यांनी इस्लामचे स्वागत केले, ते या बाबी डोळ्यांपुढे ठेवूनच. आणखी एक बाब बादरायणाच्या ब्रह्मसूत्रांच्या आधारे मांडता येईल. तेथे 'स्वपक्षदोषाच्च'[६१] असे एक सूत्र आहे. जे दोष पूर्वपक्ष व उत्तरपक्ष या दोन्ही पक्षांवर येतात, त्या दोषांबद्दल कोणत्याही एका पक्षाला दोष देता येत नाही, हे शंकराचार्यांनी या सूत्रावरील भाष्यात स्पष्ट केले आहे. तोच नियम येथे गुलामगिरी व बहुपत्नीकत्व या दोषांनाही लावता येईल. इस्लामपेक्षा वेगळ्या रूपात का असेना, पण गुलामगिरी हिंदू धर्मातही होतीच आणि बहुपत्नीकत्वही होतेच. तेव्हा या दोषांकडे बोट दाखवून इस्लाममध्ये समता नाही असे म्हणण्यात काही अर्थ नाही. शिवाय फुल्यांनी काही इस्लाममधील गुलामगिरी व बहुपत्नीकत्व यांचे स्वागत केलेले नाही. बहुपत्नीकत्वाबद्दल तर त्यांनी हिंदूंबरोबरच मुसलमानांनाही अगदी तिखट भाषेत दोष दिल्याचे विवेचन पुढे येणार आहेच. आणखी एक गोष्ट म्हणजे फुल्यांच्या मताची चिकित्सा करताना आजचा हिंदू

समाज व आजचा मुसलमान समाज स्त्रियांच्या बाबतीत ज्या भूमिका घेतो, त्यांची तुलना करणे योग्य नाही. फुल्यांच्या काळातील या दोन धर्मांच्या स्त्रीविषयक भूमिकांची तुलना करूनच फुल्यांचे मत समजावून घेतले पाहिजे. त्या काळात विधवांचे केशवपन, सतीची चाल, विधवांची अन्य मार्गाने होणारी विटंबना, त्यांच्या पुनर्विवाहाला बंदी इत्यादी दुष्ट रूढी हिंदू धर्मात मोठ्या प्रमाणात प्रचलित होत्या. इस्लाममध्ये मात्र या रूढींचा अभाव आढळतो. त्यामुळे स्त्रियांच्या बाबतीतील इस्लामची भूमिका या दृष्टींनी अधिक उदारपणाची असल्याचे फुल्यांना वाटणे स्वाभाविक होते. बेटीव्यवहाराच्या बाबतीतही फुल्यांनी तुलना केली आहे. हा व्यवहार होताना मुसलमानांतही पंथ, प्रतिष्ठा,.आर्थिक स्थिती, रूप इत्यादींची बंधने नव्हती, असे नव्हे. परंतु जातिभेद व वर्णभेद यांच्यामुळे हिंदू धर्मात जितकी बंधने होती, तितकी इस्लाममध्ये नक्कीच नव्हती. हिंदूंमधून बाटलेल्या स्त्रिया आणि त्यांची मुले ही मुसलमानांत प्रतिष्ठित बनू शकत होती. परंतु मुसलमान स्त्री हिंदूंमध्ये येऊन अशा पद्धतीने प्रतिष्ठित होऊ शकत नव्हती, हे मस्तानीच्या उदाहरणावरून स्पष्ट होते.

इस्लाममधील समता नमाजापुरती आहे, असा एक आक्षेप फुल्यांनी केलेल्या स्वागतावर आहे. इस्लाममध्ये इतर बाबतीतही समता आहे, हा मुद्दा सध्या बाजूला ठेवला तरी नमाजाच्या बाबतीतील समतेलाही खूप महत्त्व आहे, हे विसरता कामा नये. सर्वांचा ईश्वर एकच मानणे, सर्वांना कुराण वाचायला मिळणे आणि सर्वांना मशिदीत जाऊन प्रार्थना करता येणे, ही समता फुल्यांनी अनेकदा दाखवून दिली आहे. 'मांगासह आर्या नेले मसिदीत'[७०], असे ते म्हणतात. या उलट हिंदू धर्मात शूद्रांना वेदांचा अधिकार तर नाहीच, पण ते अनधिकाराने ऐकले वा उच्चारले तर काना-तोंडात तापलेले तेल ओतण्याच्या शिक्षा 'मनुस्मृती'सारख्या धर्मशास्त्रांनी सांगितल्या आहेत.[७१] शूद्रांना मंदिरात प्रवेश वा पूजेचा अधिकारही नाही.

जातिभेद व अस्पृश्यता यांचा अभाव आणि बंधुत्वाचा द्योतक असा रोटी व्यवहार, ही इस्लाममध्ये हिंदू धर्मापेक्षा अधिक समता असल्याची आणखी काही उदाहरणे होत. मुसलमानांतही शिया, सुन्नी इत्यादी भेद आहेत. परंतु त्यांचे स्वरूप अस्पृश्यता वगैरे सारखे नाही. इस्लामची मुळे भारतभूमीमध्ये रुजण्याचे एक महत्त्वाचे कारण हिंदूंमधील जातिभेद हे होते. म्हणूनच फुले म्हणतात,

*जातिभेदी भेदी फायदा तो साचा ।*
*मुसलमानांचा । झाला मोठा ।।*[७२]

हिंदूंनी आपल्याच धर्मातील लोकांना दूर ठेवले होते. याउलट, मुसलमानांनी हिंदूंमधून बाटवून घेतलेल्या लोकांनाही दास बनविण्याऐवजी त्यांच्याशी रोटी-बेटी व्यवहार केला. फुले म्हणतात[७३],

*भेद सोडुनिया एका ताटी खाती ।*
*एकच बनती । म्हणोनीया ।।*

बाटलेल्या लोकांना इस्लाममध्ये अनेक अनुकूल गोष्टी मिळाल्या, असा याचा अर्थ होतो. आणि भारतातील मुसलमान हे काही सगळेच्या सगळे बाहेरून आलेले नाहीत. हिंदूंच्या चुकांमुळे बाटलेले असंख्य मुसलमान आहेत. याचा पुरावा फुल्यांनी पुढीलप्रमाणे दिला आहे[७४], "...त्यांपैकी कित्येक अज्ञानी मुसलमान मुल्लाने व बागवान आपल्या लग्नात येथील शूद्रादी-अतिशूद्रांसारखे संस्कार करितात, याविषयी वहिवाट सापडते."

मुसलमानांचा फायदा आणखी एका कारणाने झाल्याचे फुल्यांनी शिवाजी महाराजांच्या पोवाड्यात पुढीलप्रमाणे म्हटले आहे[७५],

*देश निःक्षत्रिय झाल्यामुळे यवना फावले ।*
*सर्वांस त्यांही पिडले ।।*
*निःक्षेत्री झाल्यावर, म्लेंच्छे केले डोके वर ।।*

परशुरामाने पृथ्वी निःक्षत्रिय करण्याचा जो प्रयत्न केला, त्याच्या दुष्परिणामांविषयी फुल्यांनी पुनःपुन्हा लिहिले आहे. पुढेही नंदांबरोबर क्षत्रिय कुल नष्ट झाल्याचा प्रचार करण्यात आला. कलीयुगात क्षत्रिय वर्ण अस्तित्वात नसल्याचे धर्मशास्त्रे सांगू लागली. ज्यांच्या अभावी सर्व हिंदूंची सुंता झाली असती असे सांगितले जाते, त्या शिवाजी महाराजांनाच शूद्र ठरवून त्यांचा राज्याभिषेक करण्यास नकार देण्यापर्यंत मजल गेली. अशा स्थितीत मुसलमानांना या देशात रान मोकळे मिळाले असेल, तर त्याची जबाबदारी समाजाला निःक्षत्रिय बनविणाऱ्यांवरही येते.

## स्वानुभव

फुल्यांनी इस्लाममधील समतेविषयी नुसते वाचले होते वा दुसऱ्यांच्या अनुभवावरून नुसते अनुमान केले होते, असे नाही. त्यांचा मनःपिंड घडविण्याच्या काळात त्यांना स्वतःला आलेले काही अनुभवही महत्त्वाचे होते.

जोतीराव चांगले शिकत असताना त्यांचे वडील गोविंदराव यांनी त्यांना शाळेतून काढले आणि नंतर तीन वर्षांनी त्यांना पुन्हा शाळेत घातले, या घटनेची येथे थोडी चिकित्सा करायला हवी. त्यांनी त्यांना शाळेतून का काढले? गोविंदरावांच्या दुकानातील ब्राह्मण कारकुनाने जोतीला शाळेतून काढण्याविषयी त्यांना कुसल्ला दिला; तुमच्या मुलाला शिक्षणाचा तसा काही उपयोग नसून शिक्षणामुळे तो शेतात काम करायला नालायक होईल, असे त्याने साळसूदपणे गोविंदरावांच्या मनावर ठसविण्याचा प्रयत्न केला, अशी माहिती धनंजय कीर यांनी दिली आहे.[७६] त्याचा

हा सल्ला कावेबाज आणि मतलबी स्वरूपाचा नव्हता, असे म्हणता येणार नाही, असेही त्यांनी म्हटले आहे. याउलट, जोतीला शिक्षण देण्याची आवश्यकता आहे, हे गोविंदरावांच्या मनावर ठसविण्याचे काम ज्या दोघांनी केले, त्यांपैकी एक गृहस्थ मुसलमान व दुसरे ख्रिस्ती होते. त्यांपैकी मुसलमान गृहस्थांचे नाव गफव्हार बेग मुनशी असे होते. जोतीरावांच्या स्वत:च्या धर्मातील माणसाने त्यांचे शिक्षण बंद पाडले आणि परधर्मातील व्यक्तींनी त्यांना शिक्षणाची संधी पुन्हा उपलब्ध करून दिली. या घटनेला जोडून पुढच्या काळातील आणखी एक घटनाही ध्यानात घ्यायला हवी. अस्पृश्यांच्या मुलांसाठी काढलेल्या एका शळेतील मुलांची संख्या वाढल्यावर जोतीबा शाळेसाठी मोठी जागा शोधत असताना कोणी हिंदू जागा देत नव्हता. अशा वेळी त्याच पेठेतील एका मुसलमानाने त्यांना जागा भाड्याने दिली.[७७]

या संदर्भात त्यांचा आणखी एक अनुभव लक्षणीय आहे. ते एका ब्राह्मण स्नेह्यांच्या लग्नाच्या मिरवणुकीत सामील झाले असता शूद्र असून ब्राह्मणांच्या बरोबरीने रस्त्यातून चालल्याबद्दल त्यांचा घोर अपमान करण्यात आला.[७८] याउलट, 'शेतकऱ्याचा असूड' या पुस्तकाच्या समारोपात फुल्यांनी स्वत:च कृतज्ञतापूर्वक नोंदविलेला अनुभव पुढीलप्रमाणे आहे,[७९] ''मी लहान असताना माझे आसपासचे शेजारी मुसलमान खेळगडी यांच्या संगतीने मतबली हिंदू धर्माविषयी व त्यातील जातिभेद वगैरे कित्येक खोट्या मतांविषयी माझ्या मनात खरे विचार येऊ लागले. त्याबद्दल त्यांचे उपकार स्मरतो.'' स्वधर्माचा मनुष्य त्याच्याबरोबर चालू लागताच जिव्हारी घाव घालून हाकलून देतो आणि परधर्माची माणसे मात्र नि:संकोचपणे आपले खेळगडी बनतात, याची तुलना कोणत्या संवेदनाशील मनात होणार नाही?

यावर कोणी म्हणतील आणि प्रत्यक्षात म्हणतातच, की अशा प्रकारच्या एखाद-दुसऱ्या उदाहरणावरून एखाद्या समग्र धर्माविषयी काही निष्कर्ष काढणे योग्य नव्हे. एखाद-दुसऱ्या उदाहरणावरून निष्कर्ष काढणे हे एरव्ही खरोखरच गैर ठरले असते. परंतु वस्तुस्थिती अशी आहे, की ही उदाहरणे सुटी, व्यक्तिगत स्वरूपाची वा अपवादात्मक नसून विशिष्ट धर्मसिद्धान्तांवर आधारलेली प्रातिनिधिक उदाहरणे आहेत. शूद्राला ज्ञान देऊ नये वा त्याला स्पर्श करू नये, या धर्मशास्त्रांच्या नियमांना अनुसरून एखाद्या प्रसंगातील व्यक्ती वागलेल्या असतील, तर ती अत्यंत व्यक्तिगत स्वरूपाची उदाहरणे ठरत नाहीत. ती त्या धर्माचे सैद्धान्तिक स्वरूप स्पष्ट करणारी प्रातिनिधिक उदाहरणेच असतात. त्यामुळे फुल्यांनी अशा प्रकारच्या उदाहरणांतील स्वानुभवावरून बनविलेली मते एकांतिक वा अविवेकी स्वरूपाची होती, असे मुळीच म्हणता येत नाही.

## मूर्तिपूजेचा अधिकार दिला असता?

बहुसंख्य हिंदूंना मूर्तिपूजा मान्य आहे. याउलट मुसलमानांना मात्र ती मान्य नाही. त्यांना ती मान्य नाही एवढेच नव्हे, तर त्यांनी हिंदूंच्या सोरटी सोमनाथासारख्या मूर्ती फोडल्या. स्वत: फुल्यांनाही मूर्तिपूजा मान्य नव्हती आणि मुसलमानांनी केलेल्या मूर्तिभंजनाविषयी त्यांनी नापसंती व्यक्त करण्याऐवजी अनुकूलतेचाच सूर काढला आहे. स्वाभाविकच, येथे काही प्रश्न निर्माण होतात. उदाहरणार्थ, मूर्तिभंजक मुसलमानांमध्ये आपल्याला मान्य नसलेल्या सिद्धान्ताविषयी जी असहिष्णुता होती, तीच फुल्यांमध्ये होती, असे समजायचे काय? मग विविध धर्मांच्या लोकांनी परस्परांशी समंजसपणाने वागावे, असे त्यांनी जे इतरत्र सांगितले आहे, त्याच्याशी हे वर्तन विसंगत होत नाही काय?

येथे पुन्हा एकदा फुल्यांचा नेहमीचा निकष ध्यानात घेतला पाहिजे. मुसलमानांनी सोरटी सोमनाथ वगैरेंच्या मूर्ती फोडल्या नसत्या, तर तेथील शूद्रांना त्या मूर्तींना स्पर्श करण्याचा, त्यांची पूजा करण्याचा अधिकार प्राप्त झाला असता काय? मुळीच नाही. आता कोणी असे म्हणेल, की आपल्याला अधिकार मिळत नाही म्हणून परधर्मीय लोकांचे स्वागत करणे हा स्वधर्मद्रोह झाला, ही स्वार्थांधता झाली; अशा फितुरीनेच आपला देश बुडाला. परंतु ही मीमांसा उथळ, एकांगी आणि पक्षपाती आहे. मूर्तींपासून शूद्रातिशूद्रांना जर वंचित करण्यात आले होते, तर त्या मूर्ती कोणी फोडल्या म्हणून त्यांना वा फुल्यांनाही शोक वाटण्याचे काहीही कारण नव्हते. आणि असे वागल्यामुळे काही द्रोह होत असेलच, तर त्याची संपूर्ण जबाबदारी शूद्रातिशूद्रांना वंचित करणाऱ्यांच्या माथी येते. शूद्रातिशूद्रांवर वा फुल्यांवर मुळीच येत नाही.

## मुंज केली असती?

मुसलमानांनी हिंदूंची सुंता केल्याबद्दल फुल्यांना जे समाधान वाटले, त्याचेही कारण असेच आहे. त्यांनी त्यांची सुंता केली नसती, तर ब्राह्मणांनी त्यांची मुंज केली असती का? त्यांनी त्यांना कुराणाच्या कलमा पढविल्या नसत्या, तर यांनी त्यांना वेदांच्या ऋचा पढविल्या असत्या काय? आणि हे ज्यांना मुंजीचा वा ऋचांचा अधिकार देत नाहीत, त्यांची सुंता केली जाते, त्यांना कलमा पढविल्या जातात की आणखी काय केले जाते, याच्याशी यांचा संबंधच कोठे येतो? शिवाय, तुम्ही मुसलमान आहात, पण तुम्हाला सुंता करून घेण्याचा अधिकार नाही, असे तर ते कोणाला म्हणत नाहीत ना? आणि यांनी नाकारलेल्या व्यक्तींना इतरांनी जबरदस्तीने बाटविले की ते स्वखुशीने बाटले, याच्याशी तरी यांचा संबंध कोठे येतो? आणि त्यांनी

जबरदस्तीने सुंता केली असेल, तर जबरदस्तीने वा निदान प्रेमाने त्यांची मुंज करण्यास वा त्यांना परत घेण्यास यांना कोणी अडविले होते? यांच्या धर्माच्या संकुचित सिद्धान्तांनीच ना? कोणावरही जबरदस्ती करणे हे गैरच, पण है गैर असे म्हणण्याचा नैतिक अधिकार यांना आहे काय? फुल्यांनी या घटनेचे स्वागत केले, तेव्हा या घटनांमागची जबरदस्ती वा असंस्कृतपणा त्यांना स्वागतार्ह वाटत होता असे नव्हे, तर यांच्या मेंदूला झिणझिण्या येऊन त्यांनी शुद्धीवर यावे, ही भावना त्यामागे होती. अशा रीतीने सुंता होऊ लागल्यावरही ते शहाणे झाले नाहीत, ही खंत त्यांनी अन्यत्र व्यक्त केली आहे, ती यासाठीच होय.

फुल्यांच्या शाळेत तीन वर्षे शिकलेल्या एका मुलीने आपल्या निबंधात म्हटले होते[८०], "ब्राह्मण लोक असे म्हणतात, की वेद तर आमचीच मत्ता आहे. आम्हीच त्याचे अवलोकन करावे. तर यावरून उघड दिसते की आम्हांस धर्मपुस्तक नाही. जर वेद ब्राह्मणांसाठी आहेत तर वेदाप्रमाणे वर्तन करणे हा ब्राह्मणांचा धर्म होय. जर आम्हास धर्मासंबंधी पुस्तक पाहाण्याची मोकळीक नाही, तर आम्ही धर्मरहित आहो असे साफ दिसते की नाही बरे? तर हे भगवान, तुजकडून आलेला कोणता धर्म तो आम्हांस कळीव, म्हणजे आम्ही सर्व त्याच्यासारिख्या रीतीने अनुभव घेऊ."

## संपत्ती कोणासाठी?

मुसलमान बादशहांनी येथील संपत्ती लुटून नेल्याबद्दल फुल्यांनी त्यांना लोभी म्हटले असले, तरी त्यापेक्षा अधिक नापसंती दर्शविलेली नाही. याचे कारणही उघड आहे. त्यांनी ती संपत्ती नेली नसती, तर ती शूद्रादी-अतिशूद्रांसाठी वापरली गेली असती काय? मुळीच नाही. चटणीभाकरी खाणाऱ्या लंगोट्या शेतकऱ्याकडून वसूल केलेला कर त्यांच्या कल्याणासाठी वापरला जात नव्हता. त्यांच्यातील 'अनाथ रांडमुंडीची व निराश्रित पोरक्या मुलीमुलांची सोय', केली जात नव्हती. फुले म्हणतात[८१], "त्यांच्या शेतीस पाण्याचा पुरवठा व्हावा म्हणून धरणे वगैरे बांधकामाकडे एक छदाम खर्च न घालता पर्वतीचे रमण्यात वीस-वीस, पंचवीस-पंचवीस हजार भटब्राह्मणांस मात्र शालजोड्या वगैरे बक्षिसे देण्याचा भडिमार उठविला व हमेशा पेंढाऱ्यांनी लुटून फस्त केलेल्या शेतकऱ्यांपासून सक्तीने वसूल केलेल्या जामदारखान्यातून अज्ञानी शेतकऱ्यांस निदान प्राकृत विद्या देण्याकरिताही दमडीच्या कवड्या खर्ची न घालता ब्राह्मणांची मतबली धर्मशास्त्रे शिकणाऱ्या भटब्राह्मणांस शेकडो रुपयांची वर्षासने देण्याची चंगळ उडवून पर्वतीचे रमण्यातील कोंडवाड्यात मात्र एकंदर ओगराळ्यांनी मोहरापुतळ्यांची खिचडी वाटण्याची बाजीराव पेशवेसाहेबांनी मोठी धूम उडविली." यावर अधिक भाष्य करण्याची आवश्यकता नाही!

## टीकाही केली

फुल्यांनी मुसलमानांचे केलेले स्वागत हे अशा रीतीने समर्थनीय असल्याचे स्पष्ट झाले. परंतु त्यांनी त्याचे नुसते स्वागतच केले, असे मात्र नाही. आवश्यक तेथे त्यांनी त्यांच्या वर्तनावर टीकाही केली आहे. आळशी लोक चोरीसारख्या गुन्ह्यांकडे कसे वळू लागले त्याचे वर्णन करताना 'हरहर महादेव' म्हणणाऱ्या हिंदूंबरोबरच 'दीनदीन' म्हणण्याच्या नादात श्रीमंतांच्या घरावर दरोडे घालून त्यांची घरे लुटून नेणाऱ्या मुसलमानांचेही वर्णन त्यांनी केले आहे. मोहरमच्या वाघांवर त्यांनी टीका केली आहे. सर्व धर्मातील गुरूंवर टीका करताना मुसलमान गुरूंवरही टीका केली आहे. जे कार्य करण्यासाठी ईश्वराने मुसलमानांना भारतात पाठविले, ते त्यांनी पार पाडले नाही; उलट ते सुखोपभोगामध्ये कसे लंपट झाले, ते सांगताना फुले म्हणतात[८२], ''मुसलमानी बादशहा दिवसा तानसेनी गाणी ऐकून रात्री जनानखान्यात लंपट झाले, इतक्यात...'' आणखी एके ठिकाणी ते म्हणतात[८३], ''मुसलमान लोकांनी त्याचे हेतूस धाब्यावर बसवून आपण सर्व प्रकारचे मिष्टान्न खाणे, ख्याली-खुशाली, गाणे बजावणे वगैरे ऐषआरामात लंपट झाले व ऐश्वर्याच्या भरात मदांध होऊन त्यांना दोन बोटे आकाश उरले होते.'' मुसलमान बादशहांच्या बहुपत्नीकत्वावर व लंपटतेवर त्यांनी यापेक्षाही कठोर असा हल्ला चढविला आहे. स्वैराचारी हिंदू पुरुषांवर टीका केल्यानंतर मुसलमान बादशहांच्या वर्तनाविषयी ते म्हणतात[८४], ''महंम्मदी लोकांतील कित्येक छांदिष्ट नबाब बादशहा पुरुषांचे उन्मत्तपणामुळे त्यांच्या खाजगत जनानखान्यातील शेपन्नास लालची स्त्रियांच्या मनकामना यथातृप्त न झाल्या, म्हणजे त्या अतिशय खवळून त्याच्या कोपाविष्ट झालेल्या मनाच्या कामविकाररूप महासागरात द्वेषरूप लाटा खडकावर कसकसा थडकून छिन्नभिन्न होतात, याविषयी शून्यवादी पुरुषांचे मनात कळवळ कोठून येणार! या नबाब अथवा बादशहासाहेबांनी जर आपल्या मोहपाशात सापडलेल्या पत्न्यांबरोबर इमानेइतबारे सत्य स्मरून नांदणूक केली, तर या साहेबांची महिन्यातून दर तिघी स्त्रियांचे घरी एक दिवस वस्तीस राहाण्याची पाळी येणार. तेथे त्यांच्या बायकांनी आपले पातिव्रत्य कसे व कोणत्या मार्गाने निष्कलंक ठेवावे, याचा विचार करणे आपण आपल्या वाचकांकडे सोपवूया.''

फुल्यांनी त्यांच्या क्रूरतेवर व अनैतिकतेवरही टीका केली आहे[८५] ''वर जे लोक सांगितले त्यांपैकी पहिले दोन म्हणजे आर्यब्राह्मण व मुसलमान यांपासून प्रजेस (येथे व पुढे 'प्रजा' शब्दाचा अर्थ शूद्रादी-अतिशूद्र लोक समजावा) फारच त्रास उत्पन्न झाला. ते स्वत: क्रूरता, आप्पलपोटेपणा वगैरे अवगुणांचे केवळ मूर्तिमंत पुतळेच होते यात काही संशय नाही. त्यांनी आपले अविचाराचे हेतू सिद्धीस जावे म्हणून हातांमध्ये अंमलरूपी अती तीव्र कोरडा घेऊन या देशातील हस्तगत झालेल्या दीन प्रजेच्या

अंगावर फडाफड उडवीत गेले. त्या वेळी ते प्रजेस ज्या हितकारक व सौख्यकारक गोष्टी त्याजमध्ये सुधारणा न करिता तिचा छळ करावा त्याजमध्ये मोठे प्रवीण होते. इतिहासावरून पाहिले असता असे समजते, की कित्येकांनी एखाद्या मिथ्या व क्षुल्लक कारणाकरिता प्रजेपैकी शेकडो मनुष्यांस त्रस्त करून शेवटी त्यांस मोठ्या दुष्ट रीतीने जिवानिशी मारावे. कित्येकांनी आपल्या दुष्ट वासना तृप्त करण्याकरिता कुलीन, पतिव्रता आणि सुंदर अशा दुसऱ्याच्या स्त्रियांचा जुलमाने अभिलाष धरावा आणि लहानसहान अपराधाकरिता मनुष्याचे हालहाल करून त्यास देहान्त शिक्षा द्यावी. या वेळेस मनुष्यास शिक्षा देण्याचाही मार्ग मोठा विलक्षण व भयंकर होता. त्याजविषयी केवळ ऐकिले असता हल्लीच्या काळातला कसाही मनुष्य असला तथापि त्याचे अंत:करण कळवळून येऊन भयाने सर्वांगास काटा आल्याशिवाय राहाणार नाही.'' क्रूरपणाचे हे वर्णन यापुढेही खूप विस्ताराने केलेले असून येथे फक्त त्याचा प्रारंभीचा भाग उद्धृत केला आहे.

## ठपका नाही

फुल्यांनी मुसलमानांवर केलेली टीका एकंदरीत सौम्य आहे, असा अनेक टीकाकारांचा सूर आहे. प्रस्तुत ठिकाणी अशा सर्व मतांचा परमर्श घ्यायचा नसला तरी या संदर्भातील काही मुद्दे येथे नोंदवायचे आहेत. एक तर मुसलमान राज्यकर्त्यांची क्रूरता व लंपटता यांवर त्यांनी केलेली टीका मुळीच सौम्य नाही. ती वारंवार केलेली नाही हे खरे. परंतु याचा अर्थ ती सौम्य आहे, असा नव्हे. दुसरी गोष्ट म्हणजे हिंदू धर्मामध्ये जातिभेदामुळे निर्माण झालेल्या शोषणाचे व विषमतेचे स्वरूपच इतके भयानक होते, की त्या मानाने इतर धर्मांतील आंशिक समतादेखील त्यांना स्वागतार्ह वाटली. उदाहरण घेऊनच बोलायचे झाले, तर 'मनुस्मृती'इतका अपवित्र ग्रंथ जगातील दुसऱ्या एखाद्या धर्मात आहे, असे दाखवून देणाऱ्या व्यक्तीलाच फुल्यांनी इतर धर्मांवरील टीका सौम्य आहे, असे म्हणण्याचा अधिकार प्राप्त होईल. याखेरीज आणखी एक महत्त्वाचा मुद्दा असा : फुल्यांचा जीव तडफडत होता, तो या देशातील शूद्रादी-अतिशूद्रांना शोषणातून मुक्त करण्यासाठी. या शोषणाला प्रत्यक्षरीत्या जे जबाबदार होते त्यांच्याबरोबर त्यांनी युद्ध पुकारले होते. याचा अर्थ असा नव्हे, की जगात अन्यत्र शोषण व विषमता नव्हती. परंतु आपल्या प्रत्यक्ष शत्रूबरोबर युद्ध चालू असताना जगातील इतरांचे शत्रुत्वही ओढवून घेण्याचे त्यांना काहीही कारण नव्हते. इतरांवरही प्रासंगिक टाका त्यांनी जरूर केली. परंतु यापुढे जाऊन त्यांची कुरापत काढण्याचे वा त्यांच्याशी भांडण उकरून काढण्याचे त्यांना काहीही कारण नव्हते. जगातील सर्व अन्यायांविरुद्ध एकाच वेळी लढण्याचा वेडा ध्येयवाद त्यांनी स्वीकारला असता, तर त्यांच्या स्वत:च्या लढाईचा आशयच ते गमावून बसले असते. येथील

सनातन्यांची ही चाल नेहमीचीच आहे. आपण करीत असलेल्या अन्यायाविरुद्ध लढणाऱ्यांच्या शस्त्रांचा रोख दुसऱ्या कोणाकडे तरी वळवावा आणि आपण सहीसलामत सुटावे, हा धूर्तपणा या चालीमध्ये असतो. अशा डावपेचांना न फसण्याचे शहाणपण फुल्यांजवळ नक्कीच होते. त्यामुळे फुल्यांनी केलेली ही टीका सौम्य आहे, असे म्हणणारे जरूर म्हणोत; त्यामुळे त्यांच्या विचारांवर व आचारांवर कोणताही आणि किंचितही ठपका येत नाही.

## स्वागत

ख्रिस्ती धर्माच्या संदर्भातील बहुतेक बाबींचे विवेचन इस्लामच्या संदर्भात केलेल्या विवेचनाच्या दिशेनेच करता येत असल्यामुळे पुनरुक्ती टाळण्यासाठी फुल्यांच्या त्या बाबतीतील भूमिकेचा येथे फक्त काही महत्त्वाचा भाग नोंदवीत आहे. ईश्वराने शूद्रादी-अतिशूद्रांच्या मुक्ततेसाठी पाठविलेल्या मुसलमानांनी आपली जबाबदारी पार पाडण्यासाठी आपल्या देशात पाठविले, असे त्यांचे मत होते. राजा राम मोहन रॉय, लोकहितवादी, न्यायमूर्ती रानडे इत्यादींचेही मत असेच होते. इंग्रज सरकारप्रमाणेच ख्रिस्ती धर्मोपदेशकांचेही फुल्यांनी स्वागत केले आहे. ख्रिस्ती लोकांनी शाळा काढल्यामुळे हिंदू स्त्रियांना आणि शूद्रादी-अतिशूद्रांना शिक्षण मिळू लागले, याचे त्यांना फार मोल वाटले. स्वत: त्यांना त्यांच्या वडिलांनी ब्राह्मण कारकुनाच्या सांगण्यावरून शाळेतून काढले होते. परंतु लिजिट नावाच्या ख्रिस्ती माणसाने त्यांच्या वडिलांना समजावून सांगून त्यांना पुन्हा शाळेत पाठविण्याची व्यवस्था केली. त्यामुळे तीन वर्षांच्या खंडानंतर का होईना त्यांना शाळेत जाता आले आणि ते स्कॉटिश मिशनच्या शाळेत शिकू लागले. 'शेतकऱ्याचा असूड' या पुस्तकाच्या समारोपात या संस्थेतून ज्ञान प्राप्त झाल्याबद्दल व मनुष्यमात्रांचे अधिकार समजल्याबद्दल त्यांनी कृतज्ञता व्यक्त केली आहे. आपण आपले विचार मांडू शकलो ते इंग्रज सरकारमुळे, अशी कृतज्ञता व्यक्त करताना त्याच पुस्तकात ते म्हणतात, "इंग्रज सरकारच्या स्वतंत्र राज्यपद्धतीमुळे हे विचार मला निर्भयपणे बाहेर काढिता आले." परधर्मी लोक लाख वाट्याने बरे असे ते काही वेळा म्हणतात, ते त्यांनी शिक्षण वगैरेसाठी केलेली मदत पाहूनच होय. शिवाय हिंदू धर्मात होणाऱ्या शोषणाचे ज्ञान त्यांच्यामुळे झाले आणि त्या शोषणाविरुद्ध बंड करण्याची शक्यतादेखील त्यांच्यामुळेच निर्माण झाली, हेही त्यांनी अनेकदा दाखवून दिले आहे. हिंदू धर्मात राहून दास्य करण्यापेक्षा आम्ही प्रसंगी ख्रिस्ती धर्मही स्वीकारू, असे त्यांनी एकदा म्हटल्याचा निर्देश पूर्वी येऊन गेला आहेच. ख्रिस्ती धर्म स्वीकारून काही लोक मनुष्यपदास पोहोचले, असेही त्यांनी म्हटले आहे. पोर्तुगीज सरकारने अनेक हिंदूंना ख्रिस्ती करून आर्यांच्या कृत्रिम धर्मापासून मुक्त करून

सुखी केले, हे सांगताना त्या ख्रिस्ती लोकांमध्ये गोखले, भोसले वगैरे आडनावांची कुळे सापडत असल्याचा निर्देश त्यांनी केला आहे.

## टीका

त्यांनी इंग्रज व पोर्तुगी. सरकारची आणि ख्रिस्ती लोकांची अशी प्रशंसा केलेली असली, तरी शूद्रादी-अतिशूद्रांकडे इंग्रज सरकारने जितके लक्ष द्यावयास हवे तितके दिलेले नाही, असेही त्यांना वाटत होते. त्यामुळेच इंग्रज सरकार, गोरे अधिकारी व गोरे कामगार यांच्यावर त्यांनी अत्यंत जहाल टीकाही केली आहे. गोऱ्या शिपायांची व शेतकऱ्यांची तुलना करून त्या दोघांच्या राहणीमानातील कमालीची विषमता त्यांनी दाखवून दिली आहे. गोऱ्या अधिकाऱ्यांनी शेतकऱ्यांच्या झोपडीत राहून त्याची परिस्थिती स्वत: समजून घ्यावी, असे त्यांनी सुचविले आहे. त्यांनी इंग्रज सरकारला भोळसट म्हटल्याबद्दल त्यांच्यावर टीका करणाऱ्या लोकांनी त्यांनी त्या सरकारला भेकड व उधळे म्हटले आहे आणि त्याच्या कामगारांना गाफील, बेपर्वा, वास्तविक स्थितीची माहिती न घेणारे, आडदांड भागूबाई, ऐषआरामी, ख्यालीखुशालीत गुंग इत्यादी प्रकारची विशेषणे लावली आहेत, हेही ध्यानात घ्यावे. सुधारलेल्या इंग्रजी राज्यात अंधेर आहे किंवा हे सरकार जिकडे घुंगऱ्या तिकडे उदय उदय म्हणणारे आहे, अशी टीकाही केली आहे. शेतकऱ्यांवर पट्टी वाढविल्याशिवाय युरोपियन कामगार 'आमेन'ची आरती म्हणून कंबरा सोडीत नाहीत, असेही त्यांनी म्हटले आहे. १८५७चे युद्ध त्यांना पसंत नव्हते. तरीदेखील त्या युद्धापासून बरेच युरोपियन गृहस्थ आपल्याशी पहिल्यासारखे मन मोकळे करून नीट बोलेनात, आपल्याला पाहिल्याबरोबर कपाळाला आठ्या घालू लागले आणि त्यामुळे आपण त्यांच्या घरी जाणे बंद केले, असे ते म्हणतात. आपल्या धर्माचा आवेश बाळगणाऱ्या ख्रिस्ती लोकांना सत्यबोध करावा, असे त्यांनी म्हटले आहे. आपण निर्मिक पाहिला आहे असे विविध धर्मांचे गुरू म्हणत असले, तरी त्या सर्वांचे म्हणणे खोटे आहे, असे त्यांनी म्हटले असून एखाद्या ख्रिस्ती धर्मगुरूने आपणाला निर्मिक दाखविला, तर तू आपल्या पुत्राला दुष्टांच्या हाती कसे सोपविलेस, असे आपण त्याला विचारू, असे त्यांनी म्हटले आहे.

## धर्मांतराविषयी

त्यांनी स्वत: ख्रिस्ती धर्म स्वीकारला नाही. धर्मांतराचा प्रचार केला नाही. एवढेच नव्हे, तर काही जणांना धर्मांतरापासून परावृत्तही केले. धर्माने हिंदू असलेल्या अस्पृश्यांना आपल्या घरचा पाण्याचा हौद खुला केल्यामुळे ते ख्रिस्ती झाल्याचे म्हटले

जाऊ लागले; ही हिंदू धर्मशास्त्राची अजब किमया होय. खरे तर स्वत: ख्रिस्ती होणे दूरच, ख्रिस्ती लोकांनीच सत्यधर्म स्वीकारावा, अशी भावना त्यांनी व्यक्त केली आहे. पण धर्मांतराच्या बाबतीत त्यांनी मांडलेला एक विचार डोळ्यांत झणझणीत अंजन घालणारा आहे, "भटब्राह्मणांच्या ग्रंथांत धर्म या शब्दाचा खरा अर्थ असून जर त्यांनी (आर्यांनी) त्याप्रमाणे वर्तणूक ठेविली असती, तर कित्येक विद्वान भटब्राह्मणांसह पंडिता रमाबाईने ख्रिस्ती धर्माचा स्वीकार केला नसता!" मॅक्समुल्लरसारख्या पंडितांनी वेदधर्माचा गौरव केल्याचे नेहमी अभिमानाने सांगितले जाते. यावर फुल्यांनी केलेले भाष्यदेखील मोठे लक्षणीय आहे, "त्यांनी आपल्या ख्रिस्ती धर्माचा धिक्कार करून वेदधर्माचा स्वीकार का केला नाही, याचे मोठे आश्चर्य वाटते."

## कृतज्ञता, तरी राग

फुल्यांनी इंग्रज सरकार आणि ख्रिस्ती धर्मोपदेशक यांचे विशिष्ट हेतूने स्वागत केलेले असले, तरी त्यांच्याकडून त्यांच्या काही अपेक्षा होत्या. या देशातील मूळचे क्षेत्रवासी भिल्ल, कोळी वगैरेंना इंग्रज लोक विद्या देत नाहीत; त्यांनी जागे होऊन त्यांना विद्या दिली नाही तर काय होईल, ते सांगताना ते म्हणतात[८९],

*तसे न कराल तर ईशा रागवाल । पश्चत्तापी व्हाल । जोती म्हणे ॥*

आणखी एके ठिकाणी ते म्हणतात, की इंग्रज लोकांनी उद्योगधंदे केल्यामुळे आणि आबालवृद्ध स्त्रीजातीला बरोबरीने मान दिल्यामुळे लक्ष्मी त्यांची बटीक झाली आहे. परंतु हे इंग्रज लोक "आपल्या हस्तगत झालेल्या शूद्र शेतकऱ्यांपासून मन मानेल तसे द्रव्य गोळा करून त्यांज बरोबर वरकांती गोड गोड बोलतात खरे, परंतु त्यांस मनापासून विद्या देण्याकरिता चुकवाचुकव करितात, याचे मुख्य कारण हेच असावे, की शेतकरी विद्वान झाल्याबरोबर ते आपल्या खांद्यावर आसूड टाकून लक्ष्मीस पुढे घालून आपल्या घरी आणून नांदावयास लावण्याकरिता कधी मागेपुढे पाहाणार नाहीत, या भयास्तव ते शेतकऱ्यांस विद्वान करीत नाहीत. कारण तसे घडून आल्यास त्या सर्वांस दोमदोम करीत अमेरिकेत जाऊन तेथे रात्रंदिवस कष्ट करून आपली पोटे भरावी लागतील." इंग्रजांमुळे स्त्रियांना व शूद्रादी-अतिशूद्रांना विद्या मिळू लागल्याची कृतज्ञता फुल्यांच्या मनात असली, तरी मिळणारी विद्या समाधानकारक नसल्याचा रागही त्यांच्या मनात होता, हे यावरून स्पष्ट होते. उदाहरणार्थ, "इंग्लिश राज्याचे विद्येच्या प्रतापाने हिंदू स्त्रियांस खरे ज्ञान मिळण्याचा प्रसंग आला आहे." किंवा "या नि:पक्षपाती इंग्रज सरकारच्या राज्यात एकंदर सर्व मांगाम्हारांस विद्या मिळण्याचा संभव आहे." हे ज्ञान वा विद्या जुजबी असता कामा नये, हा त्यांचा आग्रह रास्तच होता आणि त्या आग्रहापोटी ते सरकारवर कठोर टीका करण्यास कचरत नव्हते.

## कायमचे नाहीत

इंग्रजांविषयीचा अत्यंत वास्तववादी विचार मांडताना फुले म्हणतात, "परंतु मी तुला सांगतो, की इंग्रज लोक आज आहेत, उद्या नाहीत. ते आपल्या जन्मास पुरवतील म्हणोन कोणाच्याने खात्री देऊन सांगवत नाही. यास्तव त्या लोकांचे राज्य या देशात आहे, तोच आपण सर्व शूद्रांनी जलद करून भटांच्या वडिलोपार्जित दास्यापासून मुक्त व्हावे, यातच मोठा शहाणपणा आहे."

## बौद्ध

फुल्यांनी बौद्ध धर्माचा फार कमी वेळा, परंतु आदराने उल्लेख केला आहे. बौद्धधर्मी सज्जन, बौद्ध धर्माचा चांगुलपणा, शाक्यमुनीसारखा विचारी सत्पुरुष इत्यादी सारखे निर्देश या दृष्टीने पाहण्यासारखे आहेत. आद्य शंकराचार्यांनी बौद्ध धर्माचा जो पाडाव केला, त्याविषयी फुल्यांनी व्यक्त केलेल्या विचारांमध्ये ऐतिहासिक तपशिलाच्या काही त्रुटी असण्याची शक्यता आहे. परंतु तत्त्वत: त्यांची भूमिका योग्य आहे. तसे पाहायला गेले तर फुल्यांनी केलेल्या बौद्ध धर्माच्या गौरवामुळे सनातनी हिंदूंना वाईट वाटण्याचे कारण नाही. किंबहुना, त्यांना आनंदच व्हावयास हवा. कारण बौद्ध धर्माचे संस्थापक गौतम बुद्ध यांचा त्यांनी विष्णूच्या अवतारांत अंतर्भाव केला आहे. प्रत्यक्षात मात्र बौद्धांच्या गौरवामुळे सनातन्यांना वैषम्य वाटते. एवढेच नव्हे, तर आद्य शंकराचार्यांनी बौद्ध धर्माचा पराभव केला हा जणू काही आपल्या इतिहासातील सुवर्णक्षण आहे, असा त्या घटनेचा त्यांना अभिमानही वाटतो.

खरे तर शंकराचार्यांनी केलेला बौद्धांचा तथाकथित पराभवदेखील काहीसा मजेशीरच आहे. फुले म्हणतात, "गोमांस खाणे व दारू पिणे मात्र बंद करून आपल्या सर्व ग्रंथांत फेरफार करून त्यांस मजबुती येण्याकरिता एक नवीन नास्तिक मत उपस्थित केले." बौद्धांचा शून्यवाद हा टिंगलीचा विषय व्हावा आणि काही फेरफार करून शंकराचार्यांनी मानलेला 'मायावाद' श्रेष्ठतेच्या बाबतीत एकमेवअद्वितीयच नव्हे, तर आजच्या वैज्ञानिक कसोट्यांवरही टिकणारा आहे, अशा अभिमानाचा विषय व्हावा, यामधील विसंगती उघड आहे. आपला तो बाब्या, दुसऱ्याचे ते कार्टे, दुसरे काय? बरे, शंकराचार्यांचे तत्त्वज्ञान बौद्धांच्या तत्त्वज्ञानासारखेच आहे, हे कोणा अवैदिकांनी सांगण्याची गरज नाही. कारण अनेक वैदिक तत्त्ववेत्त्यांनीही याच कारणाने शंकराचार्यांना प्रच्छन्न म्हणजे छुपे बौद्ध म्हटले आहे!

## अहंकारापायी अलग

आतापर्यंतच्या विवेचनावरून हे स्पष्ट आहे, की फुल्यांनी एकीकडे ब्राह्मणांवर

टीका केली आणि दुसरीकडे शूद्रादी-अतिशूद्र, मुसलमान, ख्रिस्ती इत्यादींचे कमी-जास्त प्रमाणात स्वागत केले. यामागे असलेल्या एका महत्त्वाच्या कारणाचे येथे विवेचन करायचे आहे. स्वत:ला सर्वश्रेष्ठ समजण्याच्या नादात ब्राह्मणांनी या सर्वांनाच तुच्छ लेखले असल्यामुळे त्या सर्वांमध्ये एकमेकांना जोडणारा दुवा निर्माण झाला, असे म्हणता येईल. फुले म्हणतात, ''ख्रिस्ती मुसलमानांसह शूद्रादी-अतिशूद्रांस नीच मानून त्यांचे सर्व प्रकारचे नुकसान करितात हे कसे?'' याउलट, आपल्यासारखे श्रेष्ठ व पवित्र आपणच आहोत, असा अहंकार ब्राह्मणांमध्ये असल्याचे त्यांनी अनेकदा दाखवून दिले आहे. याला मनुस्मृतीच्या पुढील श्लोकाचा उत्तम[१४] आधार आहे.

*एतद्देशप्रसूतस्य सकाशादग्रजन्मनः ।*
*स्वं स्वं चरित्रं शिक्षेरन् पृथिव्यां सर्वमानवाः ।।*

(या देशात जन्मलेल्या ब्राह्मणांकडून जगातील सर्व मानवांनी आपापले चरित्र शिकून घ्यावे.) सर्व मानवांचे जे पूर्वज त्यांच्या मनात मात्र असे श्रेष्ठतेचे वा कनिष्ठतेचे भेद नसावेत, असा तर्क मांडताना फुले म्हणतात, ''ते इतके पवित्र असतील, की त्यांना या सर्व मतलबी ग्रंथकारांस आपले वंशज म्हणण्याचे आवडले असते काय? त्यांच्यापुढे यांच्याने ''तू बुद्ध'', ''तू ख्रिस्ती'', ''तू मुसलमान'', ''तू महार'' म्हणून नीच, ''आम्ही ब्राह्म'' म्हणून उंच आहोत, असे म्हणण्याची जुरत तरी झाली असती काय?'' ब्राह्मणांनी मात्र अहंकारापायी इतर सर्वांना तुच्छ लेखून स्वत:च स्वत:ला इतरांपासून अलग करून घेतले. स्वाभाविकच फुल्यांचे इतर सर्वांच्या बाबतीत सहानुभूतीचे धोरण राहिले.

■

# ६. सार्वजनिक सत्यधर्म

## विधायक व आचरणसुलभ

फुल्यांनी आयुष्यभर हिंदू धर्मातील अनेक सिद्धान्तांवर कठोर हल्ला चढविला. त्या धर्मातील बहुतांश भाग नाकारला. या बाबतीतील फुल्यांचे विचार ज्यांना पटले, ते लोक त्यांना मानू लागले. अशा लोकांना बरोबर घेऊन त्यांनी 'सत्यशोधक समाज'ची स्थापना केली. ते स्वत:ला हवे असलेले समाजपरिवर्तन या समाजाच्या मार्फत घडवून आणू इच्छीत होते, हे स्पष्ट आहे. परंतु या समाजाचे सभासद धार्मिक बाबतीत काहीशा संभ्रमात असल्याचे लवकरच आढळून येऊ लागले. काही सभासदांनी तर विविध प्रकारचे धार्मिक विधी केल्याच्या बातम्या येऊ लागल्या. गंध लावणे, पूजा करणे, जानवी घालणे, मंगलाष्टके म्हणणे इत्यादींबाबतीत परस्परविरुद्ध मते मांडली जाऊ लागली आणि एक प्रकारचा गोंधळ निर्माण झाला. 'दीनमित्र' या वृत्तपत्रास १८८८च्या सुमारास या संदर्भात टीका येऊ लागली. कीरांनी उद्धृत केलेला तिचा एक नमुना असा आहे, "हा विषय हाती घेण्याचे कारण कोणाचा कोणाशी मेळ नसल्यामुळे लोक याबद्दल फार कुरकुरत आहेत व त्यांची ती कुरकूर थट्टेवारी नेण्याजोगी आहे, असे कोण म्हणेल? फार कशाला, सारच पुरे आहे. थोड्यात उमजावे. धर्मासारख्या महत्त्वाच्या गोष्टीत धरबंध नसणे लोकांच्या नाशास कारण आहे." या टीकेचा रोख फुल्यांकडेही होताच. किंबहुना, प्रस्थापित धर्मव्यवस्थेला सुरुंग लावण्याचे काम त्यांनीच सुरू केले असल्यामुळे कल्याणकारक अशी पर्यायी व्यवस्था देण्याची जबाबदारी त्यांचीच होती. स्वाभाविकच, आपल्या धर्मविषयक विचारांना एक विधायक आणि आचरणसुलभ असे रूप देण्याची आवश्यकता त्यांना तीव्रतेने जाणवू लागली.

## डाव्या हाताने पुस्तक

याच काळात म्हणजे १८८८ मध्ये त्यांना अर्धांगवायूचा झटका आला. परंतु त्याही अवस्थेत धर्माविषयीचे त्यांचे चिंतन चालूच होते. या संदर्भात यशवंताने पुढील माहिती

दिली आहे, ''रोग फार भयंकर असल्यामुळे त्यांस अनिवार त्रास भोगावे लागले... थोडे बरे वाटल्यावर निरुद्योगी राहाणे इष्ट न वाटून त्यांनी शूद्रादी-अतिशूद्रांसह एकंदर सर्व मानवांच्या हितार्थ ग्रंथ रचण्यास प्रारंभ केला. लिहिण्याचे मुख्य साधन जो उजवा हस्त तोच पक्षघाताने निरुद्योगी झाल्यामुळे त्यांस थोडे दु:ख झाले. तथापि ईश्वरेच्छा म्हणून धैर्य न सोडता आपल्या डाव्या हस्ताने व अत्यंत विचाराने 'सार्वजनिक सत्यधर्म' नावाचे पुस्तक तयार केले.'' एखादे धार्मिक कृत्य डाव्या हाताने करणे हे परंपरेने अशुभ मानले जात असले, तरी फुल्यांनी डाव्या हाताने लिहिलेले हे पुस्तक म्हणजे समाजधारणेच्या अत्यंत उदात्त तत्त्वांचा आविष्कार आहे, यात मुळीच शंका नाही. आयुष्यभर या धर्मतत्त्वांचे आचरण करून अखेरीस त्यांनी ही धर्मतत्त्वे पुस्तक रूपाने मांडली, हे तर या पुस्तकाचे महत्त्वाचे वैशिष्ट्य होय.

'सार्वजनिक सत्यधर्म' या शब्दसमूहात धर्माला लावलेली 'सार्वजनिक' व 'सत्य' ही दोन्ही विशेषणे महत्त्वाची आहेत. फुल्यांचा धर्म वैदिक धर्माप्रमाणे मोजक्या लोकांपुरता मर्यादित नसून तो सर्व लोकांना उपलब्ध आहे आणि तो वैदिक धर्माप्रमाणे विषमता, शोषण, कृत्रिमता इत्यादी असत्य मूल्यांवर आधारलेला नसून सत्यस्वरूपी आहे, हे त्यातून सूचित होते. या धर्माचे स्वरूप फुल्यांनी प्रामुख्याने उपर्युक्त पुस्तकात आणि अंशत: इतर लेखनांतून मांडले आहे. शिवाय, उपर्युक्त पुस्तकातच त्यांनी एकत्रितपणे ३३ नियम सांगितले असून त्यांच्यावरूनही सत्यधर्माचे स्वरूप स्पष्ट होऊ शकते. यानंतर हे स्वरूप संक्षेपाने समजून घ्यायचे आहे.

## निर्मिक

फुल्यांनी अत्यंत श्रद्धेने ईश्वराचे अस्तित्व मानले आहे. परंपरागत धर्मामधील विविध संकल्पना नाकारत असताना अशा प्रकारे ईश्वराचे अस्तित्व मानणे, हा कोणत्याही प्रकारे डावपेचाचा (स्ट्रॅटेजीचा) प्रकार नव्हता. ईश्वराचे वर्णन करण्यासाठी त्यांनी परंपरेने आलेले ईश्वर, देव, परमात्मा इत्यादी शब्दही वापरले असले, तरी त्यांनी स्वत: ईश्वराचा द्योतक म्हणून 'निर्मिक' किंवा 'निर्मीक' हा एक नवीनच शब्द तयार केला. त्यांचा ईश्वर मानवाचा अंतर्भाव असलेल्या सर्व प्राण्यांसह अखिल विश्वाचा निर्माता आहे असे या शब्दावरून सूचित होते. निर्माणकर्ता, उत्पन्नकर्ता इत्यादी प्रकारे त्यांनी त्याचे वर्णन अनेकदा केलेही आहे. सत्य हाच ईश असेही त्यांनी म्हटले आहे.

जगातील विविध वस्तू निर्मिकाने मानवासाठी निर्माण केल्या असून त्याने त्यांचा समान रीतीने उपभोग घेण्याची सर्व मानवांना मोकळीक दिली आहे. तसेच त्याने मानवाला सारासार बुद्धी, पवित्र मानवी अधिकार, स्वतंत्रता इत्यादी गोष्टी दिल्या

आहेत. महापवित्र, परमन्यायी, दयेचा सागर, दयाघन, कृपाळू इत्यादी शब्दांनी त्यांनी त्याचे वर्णन केले आहे. या दयेपोटीच शूद्रादी-अतिशूद्रांच्या मुक्ततेसाठी त्याने भारतात प्रथम मुसलमानांना व नंतर इंग्रजांना पाठविले, असे त्यांनी म्हटले आहे. प्रत्यक्ष फुल्यांच्या लेखनात मला न आढळलेला, परंतु १९११ साली सत्यशोधक समाजाने केलेला ईश्वराच्या स्वरूपाविषयीचा, एक ठराव असा आहे, ''सर्व माणसे एकाच देवाची लेकरे आहेत व देव त्यांचा आईबाप.'' हा ठराव फुल्यांच्या विचारांवरच आधारलेला असणार, यात मुळीच शंका नाही. या ठरावाचा अर्थ असा की ईश्वर केवळ पुरुष वा वडील नसून आईही असल्यामुळे उभयस्वरूपी आहे. आपल्याकडे नटराज हे शंकर व पार्वती यांचे संयुक्त स्वरूप आहे, असे मानण्यात आले आहे. निर्मिक, निर्माणकर्ता इत्यादी प्रकारचे ईश्वराचे द्योतक शब्द पुल्लिंगातच आहेत, हे खरे आहे. परंतु भाषेच्या बाह्यस्वरूपातील या मर्यादेवर फुल्यांना जरी मात करता आली नसली, तरी आशयाच्या दृष्टीने त्यांनी ईश्वराचे परंपरागत पुरुषप्रधान स्वरूप बदलून टाकले आहे.

निर्मिक हाच आईही आहे आणि वडीलही आहे हा विचार तर्कावर टिकणारा नाही, असे यावर कोणी म्हणू शकेल. ब्रह्मदेवाच्या मुख वगैरेमधून ब्राह्मण वगैरेंची निर्मिती झाली, या मीथसारखी हीदेखील एक मीथच मानावी लागेल, हे खरे आहे. ब्रह्मदेवाच्या मीथवर फुल्यांनी जहाल टीका केली असताना त्यांनी स्वत: अशी मीथ का मांडावी, असा प्रश्न येथे आपोआपच निर्माण होतो. या बाबतीत पुढील बाबी ध्यानात घ्यायला हव्यात. मीथ हे माध्यम तर्कावर न टिकणारे व काल्पनिक असले तरी सांस्कृतिकदृष्ट्या अत्यंत प्रभावी व मानवी मनाची जडणघडण करण्याच्या दृष्टीने अत्यंत उपयुक्त आहे. स्वाभाविकच, मानवी जीवनातून हे माध्यम वर्ज्य करण्याचे कारण नाही. ब्रह्मदेवाने चार वर्ण निर्माण केल्याची मीथ आणि निर्मिक आईवडील असल्याची मीथ यांच्यामध्ये एक महत्त्वाचा फरक आहे, हे मात्र नजरेआड करता येत नाही. ब्रह्मदेवाची मीथ ही माणसामाणसांत भेद निर्माण करणारी आणि शोषणाला धार्मिक अधिष्ठान देणारी आहे. याउलट, निर्मिकाची मीथ ही स्त्रियांच्या बाबतीत प्रदीर्घ काळापर्यंत चालत आलेले शोषण थांबवून सामाजिक जीवनाला न्यायाचे अधिष्ठान देणारी आहे. आता अन्यायाला धर्म मानण्याचे संस्कार करणारी मीथ नाकारणे आणि न्यायाचे संस्कार करणारी मीथ स्वीकारणे, हे अभिनंदनीयच म्हटले पाहिजे.

फुल्यांनी देवाच्या राज्याचीही कल्पना मांडली आहे. तसेच निर्मिकाची भीती बाळगावी, त्याच्या नियमांचे पालन करावे इत्यादी विचार मांडले आहेत. या दुर्दैवी जगात निर्मिकाचे राज्य तूर्त येणार नाही, अशी काहीशी निराशाही व्यक्त केली आहे. दुष्कृत्य करणाऱ्यांना देवाजीजवळ जाब द्यावा लागेल. परंतु त्याच्या आज्ञेप्रमाणे सत्यास स्मरून या जगात वर्तन करणाऱ्यांचा तो अंगीकार करील, असेही त्यांनी म्हटले आहे. अंगीकार करण्याच्या या

कल्पनेचे काही विवेचन पुढे येईल. 'सार्वजनिक सत्यधर्म' पुस्तक आपण निर्मिकाच्या कृपेने लिहिले, असा निर्देश त्यांनी कृतज्ञतापूर्वक केला आहे.

### उपासना

निर्मिकाच्या उपासनेचे परंपरागत स्वरूप पूर्णपणे बदलून तिला एक अगदी भावात्मक (positive) स्वरूप देण्याचा प्रयत्न फुल्यांनी केला आहे. ही उपासना कोणत्याही प्रकारे अलौकिक, गूढ वगैरे प्रकारची न ठेवता तिला ऐहिक, व्यवहार्य व सामाजिकदृष्ट्या अगदी निकोप असे स्वरूप त्यांनी दिले आहे. उदाहरणार्थ, फुलांचा पूजेसाठी कसा उपयोग करावा, हे सांगताना ईश्वराच्या नावाने फुलांच्या माळा सत्पुरुषांना सदैव अर्पण केल्या म्हणजे त्या फुलांचे सार्थक झाले, असे त्यांनी म्हटले आहे. सज्जनांना अशा माळा अर्पण करणे हीच ईश्वराची पूजा, असे त्यांना सुचवायचे आहे. सज्जन कोण हे त्यांनी अगदी स्पष्टपणे सांगितले असल्यामुळे ढोंगबाजीला मुळीच वाव राहत नाही. अशा प्रकारे ज्याला फुलांच्या माळा अर्पण करायच्या, तो स्वपरिश्रमाने आपल्या कुटुंबाचे पोषण करणारा असावा; तसेच, रात्रंदिवस जगकल्याणासाठी झटणारा असावा. जगाच्या कल्याणासाठी झटणारा कोणाला म्हणायचे, तेही त्यांनी सांगितले आहे. अज्ञानी मानवबांधवांना आपमतलबी व स्वकार्यसाधू लोकांच्या जाळ्यातून मुक्त करणे, म्हणजे जगाच्या कल्याणासाठी झटणे, असे ते म्हणतात. याचा अर्थ स्वत:च्या चरितार्थासाठी दुसऱ्या कोणाचे शोषण करण्याऐवजी स्वत: कष्ट करण्याची व्यक्तिगत नैतिकता पाळणे आवश्यक होते; तसेच अज्ञानी लोकांची स्वार्थी लोकांच्या शोषणातून सुटका करण्याची सामाजिक बांधिलकी मानणे आवश्यक होते. अशा रीतीने वैयक्तिक आणि सामाजिक अशा दोन्ही पातळ्यांवर ज्यांचे वर्तन प्रशंसनीय असेल, अशा लोकांची पूजा हीच ईश्वराची पूजा होय.

सज्जनांची पूजा हीच ईश्वराची पूजा, असे परंपरागत धर्मामध्येही काही वेळा म्हटल्याचे आढळते. मग फुल्यांच्या सांगण्याचे वेगळेपण ते कोणते, असे यावर कोणी विचारेल. परंपरागत धर्मामध्ये असे सांगितलेले असले, तरी ते सांगणे अर्थवादाच्या स्वरूपाचे असते. सज्जनांची पूजा करणेही प्रशंसनीय, असे त्यातून सुचविलेले असते. परंतु सज्जनांची पूजा ही काही ईश्वराच्या पूजेचा धर्मशास्त्रोक्त विधी ठरत नाही. विधिपूर्वक पूजा ही धर्मशास्त्राने सांगितलेले मंत्र, पूजाद्रव्ये इत्यादींच्या द्वारे ईश्वराच्या प्रतीकाचीच करायची असते. तात्पर्य, तेथे सज्जनांची पूजा ही ईश्वरपूजेचे प्रत्यक्ष स्थान घेत नाही वा तिच्यामुळे ईश्वराची विधिपूर्वक केली जाणारी पूजा रद्द होत नाही. परंपरागत भाषेत बोलायचे, तर फुल्यांच्या सत्यधर्मामध्ये सज्जनांची पूजा हाच ईश्वरपूजेचा शास्त्रोक्त विधी बनतो आणि ईश्वराला पूजाद्रव्य अर्पण करणे वगैरे मार्गांनी

होणारी पूजा ही ईश्वराची पूजा मानलीच जात नाही. याचा अर्थ एकीकडे ईश्वराची पूजा करून धार्मिक पुण्यही प्राप्त करायचे आणि दुसरीकडे वैयक्तिक आचरण अनीतीचे ठेवायचे वा इतर मानवप्राण्यांशी वागताना दुष्टाव्याने वागायचे, असा दुटप्पीपणा करायला परंपरागत धर्मात जो वाव मिळतो, तो सत्यधर्मात अस्तित्वातच राहत नाही. हेच उलट सांगायचे म्हटले, तर इतर माणसांशी दुष्टपणाने व क्रूरपणाने वागूनही ईश्वराची शास्त्रोक्त पूजा करणे परंपरागत धर्मात शक्य असते. सत्यधर्मात इतरांशी दुष्टपणाने वागणे या कृतीमुळेच ईश्वराची पूजा बाधित होते.

नैवेद्याच्या बाबतीतही फुल्यांनी असाच दृष्टिकोन मांडला आहे. पूजेच्या संदर्भात उल्लेखिलेल्या सज्जनांना वृद्धापकाळी विपत्ती आली किंवा ते काही संकटात सापडले तर त्यांना, जगातील पंगू लोकांना किंवा पोरक्या मुलांना निर्मिकाच्या नावाने आपल्या कुवतीनुसार मदत करावी, म्हणजे ईश्वराला नैवेद्य अर्पण होईल, ही सत्यधर्माची 'नैवेद्या'ची संकल्पना आहे. ईश्वराने निर्माण केलेल्या पदार्थांचा कोणकोणत्या ठिकाणी कसा कसा उपयोग करावा, याविषयी रात्रंदिवस खटपट करून ध्यानस्थ होऊन त्याविषयी विचार करीत बसणे, हे फुल्यांच्या मते अनुष्ठानाचे स्वरूप होते. मानवांनी कृतज्ञतापूर्वक व मन:पूर्वक निर्मिकाचे नामस्मरण न करणे हे अधमपणाचे व कृतघ्नपणाचे आहे, असे त्यांनी कटाक्षाने सांगितले आहे. परंतु या नामस्मरणाचे स्वरूप वेगळे आहे. माणसाने निर्मिकाची सदैव भीती बाळगावी, त्याच्या नावाची आठवण मनात पक्की ठेवावी आणि त्याने निर्माण केलेल्या सर्व मानवांबरोबर छक्के-पंजे न करता सरळ सात्त्विक आचरण करावे, हेच ईश्वराचे नामस्मरण होय. अशा आचरणानेच निर्मिकाच्या पवित्र नावाचा सन्मान होय. वृद्ध आईवडिलांचे कष्टपूर्वक पालन करणे, हेच त्यांचे खरे नामस्मरण ठरते, तसेच हे आहे.

## संस्कार

जीवनातील विविध अवस्थांमध्ये करावयाच्या संस्कारांविषयी फुल्यांनी बरेच मार्गदर्शन केले आहे. हे संस्कार करताना चाकोरीबद्ध विधी महत्त्वाचा नसून सदाचरणी वृत्ती महत्त्वाची आहे, असे त्यांनी सातत्याने सांगितले आहे. उदाहरणार्थ, कन्या अथवा पुत्र जन्मल्यावर करावयाच्या संस्काराविषयी ते म्हणतात, "आपल्यातील पूर्वीच्या दुर्गुणांचा सर्वोपरी त्याग करून आपण स्वत: शुचिर्भूत होऊन आपल्या कन्यापुत्रांस सत्य सदाचरणरूपी मंगलस्नान जर घालणार नाही, तर त्यांस लक्षावधी पाण्याच्या आंघोळी घातल्याने काय होणार आहे!" अर्थात, संस्कार म्हणून काही औपचारिक विधीही त्यांनी सांगितले आहेत. मुलाचा व मुलीचा जन्म झाल्यावर त्यांच्या कुळातील सत्यपालकाने प्रथम त्या अर्भकाचे चुंबन घ्यावे, मग त्याच्या जन्मदात्यांनी चुंबन घेऊन

निर्माणकर्त्याच्या कृपेविषयी गायन करून सर्व मानवांतील अंध-पंगू लोकांना आपल्या शक्तीनुसार मदत देऊन आनंद करावा, असे त्यांनी म्हटले आहे. नावाचा, अन्नाचा व शाळेचा संस्कार करण्याविषयी त्यांनी काही नियम सांगितले आहेत. मुलीच्या नावाचा संस्कार बाराव्या व मुलाच्या नावाचा संस्कार तेराव्या दिवशी करावा, असा फरक त्यांनी का केला आहे, त्याचा मात्र उलगडा होत नाही. स्त्रियांची परंपरागत उपेक्षा नाहीशी करायची असल्यास त्यांना प्राधान्य देणारे नियम काही काळासाठी करावेत, म्हणजे स्त्री-पुरुषांत समतेचे वातावरण तयार होईल, असा अथवा अशाच प्रकारचा आणखी काही हेतू यामागे असण्याची शक्यता आहे.

स्वभाव वगैरेंकडे दुर्लक्ष करून आणि केवळ श्रीमंती, सौंदर्य, शौर्य इत्यादींकडे पाहून लग्न करण्याऐवजी सारासार विचार करून लग्न करावे, असे त्यांनी म्हटले आहे. वधूवरांनी मानव पंचांसमक्ष मंगलाष्टके म्हणून विवाह करावा. स्वत: वधूवरांनी मंगलाष्टके म्हटल्यावर त्यांना आशीर्वाद देण्यासाठी सत्यपालक स्त्रीपुरुषांनी एक मंगलाष्टक म्हणावे. ही मंगलाष्टके फुल्यांनी स्वत: रचलेली आहेत. त्यानंतर त्या दोघांनी एक शपथ घ्यावी. नमुन्यासाठी वराने घ्यायची शपथ आपण पाहूया, ''आजपासून मी तुला माझी भार्या कबूल करून मानव पंचांसमक्ष मी अशी प्रतिज्ञा करतो, की आजपासून मी मनी कोणत्याही प्रकारचा कुतर्क न धरून एक क्षणभरदेखील तुझ्या बाहेर जाणार नाही; म्हणून आपल्या सर्वांच्या उत्पन्नकर्त्यासहित आपल्या कुलस्वामीस स्मरून प्रतिज्ञा करतो.'' लिंगभेदामुळे आवश्यक ठरणारे बदल करून वधूनेही अशीच शपथ घ्यावी. येथे कुलस्वामी ही निर्मिकाखेरीज वेगळी अशी देवता आहे, असे मानता येत नाही. आपल्या घराण्याच्या मूळ पूर्वजाचे कुलस्वामीच्या रूपाने कृतज्ञतापूर्वक स्मरण करणे, फुल्यांना अभिप्रेत असावे, असे दिसते. वरीलप्रमाणे शपथ घेतल्यावर वधूवरांनी धर्म, देश इत्यादी भेदभाव न करता 'मानवबंधूं'तील पोरक्या मुलीमुलांस व अंध-पंगूंस आपल्या शक्तीनुसार दानधर्म करीत आपल्या घरी अथवा गावी जावे, असे ते म्हणतात.

मृत्यू समोर ठाकल्यावर 'शांतपणे सत्यास स्मरून' निर्मिकाची प्रार्थना करावी. या प्रार्थनेमध्ये त्याच्याविषयी कृतज्ञता व्यक्त करावी. तसेच त्याने आपला व सत्यास स्मरून आचरण केलेल्या आपल्या सर्व मानव बहीणभावंडांचा अंगीकार करावा, अशी विनवणी त्याला करावी. मृत्यूनंतर इतरांनी अंत्यसंस्कार व प्रार्थना करण्याविषयीही काही सूचना त्यांनी केल्या आहेत. ईश्वराने अंगीकार करणे, या घटनेचा नेमका अर्थ त्यांनी स्पष्ट केलेला नाही. परंतु याविषयी काही अनुमान मात्र करता येईल. त्यांच्या मते शरीराहून वेगळा आत्मा नसतो. तसेच इहलोकीच्या जीवनामध्ये ईश्वरासाठी म्हणून परंपरागत पूजा वगैरेसारखे कोणतेही अनुष्ठान करायचे नाही. मानव बहीणभावंडांशी

सत्यवर्तन करणे, एवढेच ईश्वराने अंगीकार करण्यास पुरेसे आहे. हे सर्व ध्यानात घेतले असता सत्यवर्तनामुळे मानव बहीणभावंडांच्या हृदयात स्थान मिळणे, हाच फुल्यांच्या मते ईश्वराने केलेला अंगीकार, असे मानावे लागेल. आणि असे मानले नाही, तरी याच दिशेने त्याचे काही स्पष्टीकरण करावे लागेल.

मनुष्य मृत्यूनंतर स्वर्ग, नरक वगैरेंसारख्या परलोकात जाऊन इहलोकीच्या कर्मांची फळे भोगतो, हे फुल्यांना मान्य नसल्याचे यापूर्वीच स्पष्ट झाले आहे. त्यांच्या मते परलोक हा इहलोकीच असतो. हे अत्यंत नि:संदिग्ध शब्दांत त्यांनी पुढीलप्रमाणे मांडले आहे, ''एकंदर सर्व जगातील मानवप्राणी आपल्या पाप-पुण्यानुरूप इहलोकीच प्रत्यक्ष झाडा देऊन आपल्या पुढील वाढणाऱ्या सर्व संततिरूप वृक्षांस पाणी घालतात किंवा मारून टाकितात. अशा प्रकारे त्यांच्यावर किंवा त्यांच्या संततीवर त्या पापाचा किंवा पुण्याचा परिणाम होतो. ह्यावरून ईश्वराने परलोक हा प्रत्यक्ष इहलोकीच निर्माण केला आहे.''

मृताने पितृलोकात जाऊन राहणे आणि वंशजांनी केलेल्या श्राद्ध वगैरेमुळे तृप्त होणे, फुल्यांना अर्थातच मान्य नाही. परंतु लोकांनी आपल्या मृत पूर्वजांविषयी कृतज्ञता बाळगणे व त्यांच्या ऋणातून मुक्त होण्याचा प्रयत्न करणे त्यांना मान्य आहे. या संदर्भात त्यांनी काही दिशा दाखविली आहे. आईवडील वारल्यानंतर त्यांच्या प्रेतांची गती लावण्याकरिता आलेल्या व्यक्तींचे उतराई होण्यासाठी त्यांना शक्तीनुसार भोजन देऊन त्यांच्या गळ्यात फुलांच्या माळा घालाव्यात. शाळेत जाणाऱ्या त्यांच्या मुली-मुलांना मोठ्या उल्हासाने गाई बक्षीस द्याव्यात. आईवडिलांच्या आठवणीसाठी आपल्या सामर्थ्याप्रमाणे वर्षश्राद्धे करारीत. ही श्राद्धे रूढ स्वरूपाची नव्हेत, हे स्पष्टच आहे. उदाहरणार्थ, या प्रसंगी शाळेत जाणाऱ्या निराश्रित मुली-मुलांना कोणताही भेदभाव न करता निर्मिकाच्या नावाने थोडीबहुत मदत करावी, असे फुल्यांच्या कल्पनेतील श्राद्धाचे स्वरूप होते. त्यांनी स्वत:च्या वडिलांचे श्रद्ध याच पद्धतीने केले होते.

## इहलोकीच कर्माची फळे

परलोकीची फळे सांगणाऱ्या कर्मसिद्धान्तासह दैववाद फुल्यांनी नाकारला, परंतु इहलोकीच्या कर्मांची फळे भोगावीत लागत नाहीत, असा त्याचा अभिप्राय नव्हे. अनेक उदाहरणे देऊन त्यांनी हे स्पष्ट केले आहे. आईबापांनी शाळेत घालूनही शिकण्याची गोडी नसल्यामुळे एखादा अविद्वान बनतो. आईवडिलांनी न पाठविताही शिकण्याची गोडी असल्यामुळे एखादा विद्या प्राप्त करतो. शिल्पशास्त्राची माहिती नसता आगगाडी करण्याचा एखाद्याचा प्रयत्न फसतो. पण शिल्पशास्त्र वगैरेची माहिती असलेल्याचा प्रयत्न यशस्वी होतो. व्यापाराची माहिती नसलेला व माहिती असलेला मनुष्य यांच्या यशात फरक पडतो. युद्धाची तयारी न करता आणि तयारी करून केलेल्या युद्धाचे

फळ वेगवेगळे मिळते. या सर्व उदाहरणांतून माणसाला मिळणारे फळ हे त्याच्या पूर्वजन्माच्या कर्मावर वा दैवावर अवलंबून नसून वर्तमान आयुष्यातील योग्य-अयोग्य कर्मांवर अवलंबून आहे. स्वत:च्या वर्तमान जन्मातील कर्माशी संबंध नसता काही वेळा फळ मिळते, हे खरे आहे. परंतु त्याचाही दैवाशी संबंध नसतो. उदाहरणार्थ, चोरी करणाऱ्या आईबापांची मुले चोर झाल्यामुळे त्यांना सुखाचे जीवन जगता येणे. कर्माचे हे ऐहिक स्वरूप स्पष्ट करताना फुल्यांनी आणखी एक उदाहरण दिले आहे. मातापित्यांनी केलेल्या काही अनुचित कर्मामुळे त्या उभयतांच्या शरीरात विशिष्ट प्रकारचे रोग निर्माण होतात आणि त्यांचे परिणाम म्हणून त्यांच्या मुलांना क्लेशाने तडफडावे लागते.

स्वाभाविकच, इहलोकीच्या सुखी जीवनासाठी इहलोकीच योग्य कर्मे करण्यावर फुल्यांनी भर दिला आहे. शेतकऱ्यांच्या मुलांना शेतकीसह तत्संबंधी सर्व विद्या शिकविल्या, तर शेतकऱ्यांमध्ये हल्लीसारखे चोर निपजणार नाहीत. तसेच लोहार, सुतार, वगैरेंच्या मुलांना त्यांच्या कसबासंबंधीच्या विद्या शिकविल्या, तर अशा विद्या शिकलेली कारागिरांची फारच थोडी मुले चोर निपजतील, असे त्यांनी खात्रीपूर्वक सांगितले आहे. शेतकऱ्यांसह कारागिरांनी आपली मुले शाळेत पाठविली नाहीत, तर त्यांच्यासाठी बेलाशक सक्तीचा कायदा करावा. तसेच, मुले शाळेत पाठविली नाहीत, तर ती आळसामुळे उनाड होतील आणि आपली पोटे जाळण्याकरिता चोऱ्या करू लागतील, असे त्या मुलांच्या आईवडिलांना समजावून सांगावे, असेही त्यांनी म्हटले आहे. चोरीसारख्या गुन्ह्याकडे वळण्यामागे कोणती सामाजिक, आर्थिक, मानसशास्त्रीय इत्यादी कारण असतात, ते ध्यानात घेऊन धर्मशास्त्रांनी वस्तुनिष्ठ नियम केले पाहिजेत; धर्माच्या नावाखाली 'पाप-पुण्य' वा 'स्वर्ग-नरक' अशी केवळ काल्पनिक बुजगावणी उभी केल्यामुळे लोकांच्या जीवनातील खऱ्या समस्या सुटत नसतात, या वास्तवतेची सत्यधर्माने नीट दखल घेतलेली होती, हे फुल्यांच्या वरील विवेचनावरून स्पष्ट होते.

## संक्षेपाने सत्यधर्म

यानंतर सत्यवर्तनाचे म्हणजेच सत्यधर्माच्या पालनाचे फुल्यांनी सांगितलेले ३३ नियम संक्षेपाने पाहायचे आहेत. आपल्या सर्वांच्या निर्माणकर्त्याने सर्व प्राणिमात्रांना उत्पन्न केले, या सिद्धान्तावर हे नियम अधिष्ठित आहेत. सत्यवर्तन करणारे लोक पुढीलप्रमाणे वागतात :

स्त्री-पुरुष या दोघांना स्वतंत्र व सर्व अधिकारांचा उपभोग घेण्यास पात्र केले आहे, असे ते कबूल करतात. निर्मिकाच्या ऐवजी ग्रहोपग्रह, विचित्र तारा अथवा एखादी

धातूची वा दगडाची मूर्ती यांना मान देत नाहीत. निर्मिकाला वस्तू निरर्थक अर्पण करीत नाहीत. त्याचे पोकळ नामस्मरण करीत नाहीत. सर्व प्राणिमात्रांना सर्व वस्तूंचा यथेच्छ उपभोग घेऊ देतात. त्यांना निर्मिकाचे आभार मानून त्याचा गौरव करू देतात. प्राणिमात्रांना कोणत्याही प्रकारचा निरर्थक त्रास देत नाहीत. निर्मिकाने सर्व स्त्री-पुरुषांत सर्व मानवी अधिकारांचे मुख्य धनी केल्याचे ओळखून एखाद्या व्यक्तीवर जबरी करीत नाहीत. निर्माणकर्त्याने सर्वांना धार्मिक व राजकीय स्वतंत्रता दिली असल्यामुळे दुसऱ्या व्यक्तीस कोणत्याही तऱ्हेचे नुकसान करता येत नाही, हे ओळखतात. आपल्यावरून दुसऱ्या मानवाचे हक्क समजून इतरांस पीडा देत नाहीत. पती असलेल्या एका पुरुषास वगळून इतरांना भाऊ व पत्नी असलेल्या एका स्त्रीस वगळून इतरांना बहीण मानतात आणि व्यभिचार करीत नाहीत. मानवी हक्कांविषयी आपली मते बोलण्यास, लिहिण्यास वा प्रसिद्ध करण्यास स्वातंत्र्य असले, तरी आपल्या मतांपासून कोणत्याही व्यक्तीचे कोणत्याही तऱ्हेचे नुकसान होऊ नये म्हणून खबरदारी घेतात. धार्मिक वा राजकीय मते वेगळी असल्यामुळे कोणाला कोणत्याही प्रकारे नीच मानून त्यांचा छळ करीत नाहीत.

योग्यता वगैरेनुसार धार्मिक, गावकी अथवा मुलकी अधिकाराच्या जागा मिळण्यास सर्व स्त्री-पुरुष पात्र आहेत, असे कबूल करतात. तसेच, वरील तीन बाबतीत मानवाची स्वातंत्रता, मालमत्ता, संरक्षण व जुलमापासून बचाव यांना बाध आणत नाहीत. आपल्या मातापित्यांचा वृद्धापकाळी परामर्श करून इतर मानववृद्ध शिष्टांना सन्मान देतात. वैद्यांच्या आज्ञेवाचून अमली पदार्थांचे सेवन करीत नाहीत. तसेच, अपायकारक मानव वा इतर प्राणी वगळून इतर कोणा प्राण्यांची हत्या करीत नाहीत. आपल्या हितासाठी दुसऱ्याचे नुकसान करण्याकरिता खोटे बोलत नाहीत. चोरी करीत नाहीत. दुसऱ्याच्या घरास व इतर वस्तूस आग लावीत नाहीत. न्यायाने राज्य करणाऱ्याविरुद्ध वा सर्व प्रजेने मुख्य केलेल्या प्रतिनिधीविरुद्ध बंड करीत नाहीत. सर्व जगाच्या हितासाठी धर्मपुस्तक केले आहे, अशी बढाई मारीत असताना ते पुस्तक बगलेत मारून इतरांस न दाखविणाऱ्या कपटी बढाईखोरांवर विश्वास ठेवत नाहीत. ते स्वत:ला व आपल्या स्वकीयांना इतरांपेक्षा पिढीजात श्रेष्ठ समजून पवित्र मानीत नाहीत व इतरांना पिढीजात अपवित्र समजून नीच मानत नाहीत. पूर्वी कष्टाने लिहिलेल्या ग्रंथांच्या वहिवाटीवरून इतरांना पिढीजात दास मानत नाहीत.

आपल्या लोकांचे वर्चस्व राहावे म्हणून शाळेत शिकविताना इतरांच्या मुलांच्या बाबतीत दुजाभाव करीत नाहीत. न्यायाधीश असताना पक्षपात करीत नाहीत. शेती अथवा कलाकौशल्य करून पोटे भरणारांस श्रेष्ठ मानतात. अगदी चांभाराच्या घरीही बिगाऱ्यांचा धंदा करून निर्वाह करणारांना तुच्छ मानत नाहीत. स्वत: काही उद्योगधंदा

न करता निरर्थक धार्मिकपणाचा डौल आणून, अज्ञानी जनांना नवग्रहांची पीडा दाखवून त्यांना भोंदाडून खात नाहीत अथवा त्यासंबंधी पुस्तेक करून पोटे जाळीत नाहीत. भाविक मूढांना फसवून खाण्याकरिता ब्रह्मर्षीचे सोंग घेऊन त्यांना अंगाराधुपारा देत नाहीत. कल्पित देवांची शांती करण्याच्या निमित्ताने अनुष्ठानी बनून अज्ञानी जनांमा भोंदाडून खाण्याकरिता जपजाप करून आपली पोटे जाळत नाहीत. आपली पोटे जाळण्याकरिता अज्ञानी जनांत कलह उपस्थित करीत नाहीत. कोणाचे खोणेपिणे वा लेणे-नेसणे यांच्यामुळे कोणत्याही प्रकारचा विधिनिषेध वा भेदभाव न करता सर्वांबरोबर शुद्ध अंत:करणाने आचरण करतात. कोणताही भेदभाव न करता महारोगी, पंगू व पोरकी मुले यांना आपल्या शक्तीनुसार मदत करतात.

## वेगळेपण आचारात

आपल्या सार्वजनिक सत्यधर्मामुळे एकंदर सर्व मानव स्त्री-पुरुषांचे कल्याण व्हावे असे फुले पुन:पुन्हा म्हणत असत. 'सर्व सुखी व्हावे' किंवा 'सर्वां सुख देई' या त्यांच्या वचनांतून ही इच्छा व्यक्त झाली आहे. परंपरागत धर्मातही ऋषी, मुनी, संत, शास्त्रकार इत्यादींनी अशा प्रकारची इच्छा असंख्य वेळा व्यक्त केली असल्यामुळे त्या धर्मापेक्षा फुल्यांचे वेगळेपण ते कोणते आणि तो धर्म नाकारून त्यांच्या सार्वजनिक सत्यधर्माचा स्वीकार कशासाठी करायचा असे यावर कोणी म्हणेल. उदाहरणार्थ, 'सर्वेऽपि सुखिन: सन्तु' इत्यादी प्रकारचा श्लोक प्रसिद्ध आहे. त्यामध्ये सर्वांच्या सुखाची कामना करण्यात आली आहे.

वरवर पाहता हा प्रश्न मार्मिक वाटतो. परंतु बारकाईने पाहिले असता परंपरागत धर्म आणि फुल्यांचा सत्यधर्म यांमध्ये या बाबतीतही फार मोठी तफावत आहे. परंपरागत धर्मामध्ये एकीकडे सर्वांना सुख प्राप्त व्हावे अशी अपेक्षा व्यक्त केली, तरी दुसरीकडे थोड्या लोकांच्या सुखासाठी इतर अनेक लोकांचे शोषण करण्याचे धर्मसिद्धान्त मांडले जातात. उदाहरणार्थ, एकीकडे सर्वांचा आत्मा एक आहे, असे सांगितले जाते, तर दुसरीकडे अस्पृश्यतेचाही जोरदार पुरस्कार केला जातो. त्यामुळे विशिष्ट श्लोकामध्ये मांडलेला विचार आणि प्रत्यक्षातील आचार यांच्यामध्ये जमीनअस्मानाचे अंतर पडते. याउलट सत्यधर्मामध्ये फुल्यांनी सर्वांच्या सुखासाठी जे सिद्धान्त मांडले आहेत, त्यांना छेद देणारे व्यावहारिक स्वार्थाचे सिद्धान्त दुसरीकडे मुळीच मांडलेले नाहीत आणि मांडलेल्या सत्यसिद्धान्तांना अनुसरून त्यांनी आयुष्यभर आचरणही केले. सर्वांना सुख मिळावे किंवा सर्वांशी समतेने वागावे, असे नुसते सांगितले नाही. एकीकडे अस्पृश्यांसाठी आपल्या घरातील पाण्याचा हौद खुला करताना दुसरीकडे ब्राह्मण विधवांचे केशवपन होऊ नये म्हणून नाभिकांचा संप घडवून

आणणे अथवा त्यांच्या विवाहबाह्य संबंधातून झालेल्या मुलांचा सांभाळ करणे, अशा प्रकारच्या कृतींमधून त्यांनी सर्वांचेच माणूसपण जपण्याचा प्रयत्न केला. 'सर्वेऽपि सुखिन: सन्तु' असे नुसते तोंडाने म्हणणे किंवा तात्त्विक पातळीवरून आपल्या धर्माची प्रतिमा उदात्त व उज्ज्वल करण्यासाठी अधूनमधून असे विचार मांडणे वेगळे आणि अंत:करणातील उत्कट भावनेतून असे विचार मांडणे व प्रामाणिकपणाने तसे आचरण करणे वेगळे.

## हिंदू तत्त्वाला चिकटून राहिले?

विख्यात चरित्रकार धनंजय कीर यांनी लिहिलेले फुल्यांचे चरित्र अनेक दृष्टींनी उत्तम आहे. परंतु त्यांनी केलेले एक विधान धक्कादायक आहे. ते म्हणतात, ''जोतीरावांनी जरी ब्राह्मणी धर्मग्रंथांविरुद्ध बंड केले, तरी ते हिंदू तत्त्वज्ञानातील मुख्य तत्त्वाला चिकटूनच राहिलेले दिसतात. देवाच्या राज्याची ह्या भूतलावर स्थापना व्हावी, ऐहिक साम्राज्याची नव्हे, हाच त्या तत्त्वाचा प्राण आहे.'' कीरांनी केलेले हे मूल्यमापन मुळीच पटणारे नाही. फुल्यांनी अत्यंत श्रद्धेने ईश्वराचे अस्तित्व मानले होते, हे खरे आहे. परंतु याचा अर्थ ते हिंदू तत्त्वज्ञानातील मुख्य तत्त्वाला चिकटून राहिले, असे मुळीच म्हणता येत नाही. एक तर देवाला मानणे हे हिंदू तत्त्वज्ञानातील मुख्य तत्त्व नव्हेच. उदाहरणार्थ, सांख्य, मीमांसाक इत्यादींसारख्या वैदिक दर्शनांनीदेखील ईश्वराचे अस्तित्व मान्य केलेले नाही. दुसरे असे, की हिंदूंमधील ज्या संप्रदायांनी देवाचे अस्तित्व मानले आहे, त्यांच्याशीही फुल्यांच्या सत्यधर्मातील निर्मिकाचे अगदी अत्यल्प साम्य आहे. दोन्हीकडे 'ईश्वर' हा निर्माणकर्ता मानण्यात आला आहे. परंतु बाकीच्या अनेक बाबतींत दोघांच्या स्वरूपात फार मोठी तफावत आहे. पूजा, अनुष्ठाने, नामस्मरण इत्यादींचे स्वरूप फुल्यांनी पूर्णपणे बदलले असून ते सर्वथैव ऐहिक आहे. परंपरागत हिंदू धर्मात ईश्वराने समाजधारणेसाठी चातुर्वर्ण्य निर्माण केल्याचे मानले जाते आणि त्यामुळे ती विषम व्यवस्था राहणे, हे देवाचे राज्य ठरते. किंबहुना, ती व्यवस्था तशी ठेवणे हे पूर्वी राजे लोकांचे ईश्वराने नेमून दिलेले कर्तव्यच मानले जात असे. याउलट फुल्यांनी त्या व्यवस्थेला सुरुंग लावला आणि समतेची व्यवस्था असणे, हे देवाचे राज्य मानले. याचा अर्थ त्यांच्या धर्मातील देवाचे राज्य हे ऐहिक सामाज्यच आहे. हिंदू तत्त्वज्ञानातील देवाच्या राज्याशी केवळ शब्दसाम्यावरून त्याची एकरूपता मानणे, हा फुल्यांच्या भूमिकेचा मोठा विपर्यास ठरेल. फुल्यांनी ब्राह्मणी धर्मग्रंथांविरुद्ध बंड केले, ते हिंदू तत्त्वज्ञानातील मुख्य तत्त्व कायम ठेवून त्या तत्त्वज्ञानात केवळ वरवरचे काही बदल करण्यासाठी नव्हे. कीरांनी पुस्तकांच्या शीर्षकातच फुल्यांना 'आमच्या समाजक्रांतीचे जनक' असे म्हटलेले आहे आणि केवळ वरवरच्या

मलमपट्टीने कधी समाजक्रांती होत नसते. उलट, वरवरच्या काही गोष्टी कायम राहिल्या, तरी मुख्य तत्त्व वा गाभा बदलला तरच क्रांती होत असते. फुल्यांनी अशी क्रांती केल्याचे स्वत: कीरांनी आपल्या सुरेख पुस्तकात सिद्ध केले आहे. म्हणून त्यांच्याविषयी पूर्ण आदर बाळगूनही त्यांचे हे मत बरोबर नाही, असे म्हणावे लागते.

समाजधारणा करतो तो 'धर्म' असे तोंडाने म्हणायचे, परंतु प्रत्यक्ष व्यवहारात मात्र 'धर्म' एका छोट्याशा गटाच्या धारणेसाठी वापरायचा, असे परंपरागत धर्मात घडत होते. फुल्यांची बुद्धी इतकी प्रगल्भ होती की त्यांना यातील दुटप्पीपणा सहज ओळखता आला. त्यांचे मन इतके संवेदनशील होते, की त्यांना तो दुटप्पीपणा सहन झाला नाही. स्वाभाविकच, त्यांनी त्या धर्माचा धिक्कार केला. सारी शक्ती, बुद्धी व भावना एकवटून त्यांनी त्याच्यावर हल्ला केला. त्याला मुळासकट उपटून फेकून देण्यासाठी जणू काही सर्वंकष युद्ध पुकारले. परंतु हे करताना त्यांचा विवेक इतका जागृत होता, की त्यांनी पोकळी निर्माण होऊ दिली नाही. उलट, मानवाचा सर्वांगांनी विकास करणारा एक प्रसन्न धर्म लोकांसमोर ठेवला. एक असा धर्म, की जो खऱ्या अर्थाने समग्र समाजाची धारणा करणारा आहे. 'धारणाद् धर्म:' या व्युत्पत्तीला जागणारा आहे. तो सर्वांचाही आहे आणि खराही आहे!

■

# ७. धार्मिक स्वातंत्र्य

## सर्वांसाठी एकच धर्म

फुल्यांच्या मनात आदर्श कल्याणकारक धर्माची जी काही कल्पना होती, तिला अनुसरून त्यांनी लोकांपुढे 'सार्वजनिक सत्यधर्म' ठेवला. आपल्या देशातील शूद्रादी-अतिशुद्रांसह ब्राह्मणांनीही तो स्वीकारावा, असे तर त्यांना वाटत होतेच. तसेच ख्रिस्ती, मुसलमान इत्यादींनीदेखील तो स्वीकारावा, अशी त्यांची इच्छा होती. एक तर तो त्यांच्या दृष्टीने सर्व मानव, स्त्री-पुरुषांच्या हिताचा होता. दुसरे म्हणजे सर्व मानवांचा एकच धर्म असावा, असे त्यांना वाटत होते. ईश्वराने पृथ्वी, सूर्य, चंद्र आणि वायू हे जर एक-एकच केले आहेत, तर 'मानवांचे साठी बहु धर्म कसे' असा प्रश्न त्यांनी विचाराला आहे. 'धर्मराज्यभेद मानवा नसावे', 'मानवांचे धर्म नसावे अनेक', 'मानवांचा धर्म एकच असावा' इत्यादी वचनांतून त्यांनी आपले हे मत व्यक्त केले आहे. सर्वांनी जो एकच धर्म स्वीकारायचा, तो अर्थातच 'सत्यधर्म' होय. ते म्हणतात, 'सत्यावीण नाही जगी अन्य धर्म'

## पण दुराग्रह नको

आपण विवेकपूर्वक व नि:पक्षपाती वृत्तीने मांडलेली मूल्ये जगातील सर्वांनी स्वीकारावीत, असे कोणाला वाटले, तर त्यात काहीही गैर नाही. परंतु त्या बाबतीत कोणी दुराग्रह धरीत असेल, तर मात्र ते आक्षेपार्ह होय. परंपरागत धर्मांमध्ये हा दुराग्रह होता. फुल्यांना तो मान्य नव्हता. म्हणून तर त्यांनी 'धर्माभिमानाचे खूळ व्यर्थ का माजले आहे?' असा प्रश्न विचारला आहे. धर्मावरून लढाया खेळणाऱ्यांना फुल्यांनी पुढीलप्रमाणे फटकारले आहे.

*जगामाजी धर्म अगणित होती । लढाया खेळती । रेड्यापरी ॥१॥*
*रेडे धरणारे प्राणास मुकती । कित्येक म्हणती । स्वर्गी गेले ॥२॥*
*कोणी म्हणे सर्व मार्टर झाले । जन्नतीस गेले । कोणी म्हणे ॥३॥*
*सद्विवेकावीण सर्व भांबावले । रक्तपाती झाले । जोती म्हणे ॥४॥*

अशा रीतीने फुल्यांना धार्मिक बाबतीतील इतरांचा दुराग्रह मान्य नव्हता, हे स्पष्ट झाले. स्वाभाविकच त्यांनी स्वत:ही असा दुराग्रह धरला नाही. ही बाब धार्मिक क्षेत्रात जवळ जवळ अभूतपूर्वच म्हणावी लागेल.

## उणिवा दाखवून द्या

इतरांनी सांगितलेल्या धर्मामध्ये फुल्यांना जशा उणिवा दिसल्या होत्या, तशाच आपल्या धर्मामध्येही त्या असू शकतील, याचे भान त्यांना होते. म्हणूनच आपल्या उणिवा लोकांनी दाखवून द्याव्यात, असे आवाहन त्यांनी केले. आपल्या लेखनात जी व्यंगे दिसतील त्यांबद्दल क्षमा करून गुणांचा स्वीकार करावा, त्यात काही अयोग्य वा खोटा भाग दिसला तर तो कळवावा आणि ग्रंथाच्या दृढीकरणार्थ कोणाला काही सत्य विचार सुचवायचा असेल तर तो सुचवावा, अशी विनंतीही त्यांनी केली. अशी सूचना विचारी पुरुषांची असल्यास ती कृतज्ञतापूर्वक मान्य करून दुसऱ्या आवृत्तीत दाखल करण्याची तयारीही त्यांनी दर्शविली. याचा अर्थ परंपरागत धर्मावर टीका करण्याचे स्वातंत्र्य जसे त्यांनी स्वत: घेतले, तसे आपल्या धर्मावर टीका करणाचे स्वातंत्र्य त्यांनी इतरांनाही दिले.

## एका कुटुंबात अनेक धर्म

ईश्वराने प्रत्येकाला धार्मिक स्वातंत्र्य दिले आहे, धार्मिक कारणावरून दुसऱ्याला नीच मानू नये वा त्याचा छळ करू नये, दुसऱ्याच्या धार्मिक स्वातंत्र्याला बाध आणू नये हे सत्यधर्मातील सिद्धान्त त्यांच्या वृत्तीत दुराग्रह नसल्याचे स्पष्ट करतात. आपल्या व दुसऱ्याच्या धर्माविषयी सारासार विचार न करता माझाच धर्म खरा असा बेलगामी हट्ट केल्यामुळे वेगवेगळ्या धर्मांच्या अनुयायांमध्ये भेदभाव निर्माण होतो; म्हणून एकमेकांच्या धर्माविषयी सारासार विचार करावा. म्हणजे कोणीच कोणाच्या धर्माला खोटे म्हणणार नाही, अशी समंजस भूमिका त्यांनी मांडली. या समंजसपणाचा व पूर्वोक्त धार्मिक स्वातंत्र्याचा अत्युच्च आदर्श म्हणता येईल, अशी विचारसरणी त्यांनी पुढीलप्रमाणे मांडली, "कोणत्याही कुटुंबातील एका मानव स्त्रीने 'बौद्ध' धर्मी पुस्तक वाचून बौद्ध धर्म स्वीकारावा व त्याच कुटुंबातील तिच्या पतीने जुना व नवा करार वाचून त्याच्या मर्जीप्रमाणे पाहिजे असल्यास त्याने 'ख्रिस्ती' व्हावे व त्याच कुटुंबातील त्यांच्या कन्येने कुराण वाचून तिच्या मर्जीप्रमाणे पाहिजे असल्यास तिने 'महमदी' धर्मी व्हावे. आणि त्याच कुटुंबातील त्यांच्या पुत्राने सार्वजनिक सत्यधर्म पुस्तक वाचून त्याच्या मर्जीप्रमाणे पाहिजे असल्यास त्याने सार्वजनिक 'सत्यधर्मी' व्हावे; आणि या सर्व मातापित्यांसह कन्यापुत्रांनी आपला प्रपंच करीत असता प्रत्येकाने कोणी कोणाच्या धर्माचा हेवा करून द्वेष करू नये आणि त्या सर्वांनी आपण सर्वांच्या निर्माणकर्त्याने निर्माण केलेली लेकरे असून त्याच्याच (निर्मिकाच्या) कुटुंबातील आहोत, असे समजून

प्रेमाने व गोडीगुलाबीने एकमेकांनी वर्तन करावे, म्हणजे हे आपल्या सर्वांच्या निर्माणकर्त्याच्या राज्यात धन्य होतील.''

फुल्यांचे वरील विचार ऐकल्यानंतर त्यांना प्रश्न विचारणारे गणपतराव म्हणाले, ''या भूमंडळावर जेवढे म्हणून धर्म आहेत, ते सार्वजनिक सत्याची लेकुरे आहेत, अशी माझी खात्री झाली.'' त्यावर या विषयाचा समारोप करताना फुले म्हणतात, ''यावरून एकंदर सर्व धर्मांसह त्यांच्या अनुयायी लोकांनी नमून सार्वजनिक सत्यास साष्टांग प्रणिपात करावा, अथवा सार्वजनिक सत्याने एकंदर सर्व धर्मांसह त्यांच्या अनुयायी लोकांस कोणत्या तऱ्हेचा मान द्यावा, याविषयी तुमचा तुम्हीच सरळ चोख विचार करून पाहा. असो. परंतु प्रत्येक स्त्रीपुरुष मानवाने दुसऱ्या व्यक्तीचे नुकसान न करिता त्यास कोणत्याही तऱ्हेचे आचरण करण्यास अधिकार जर आहे, तर तुम्ही कोणत्याही धर्मासह त्यांच्या अनुयायी लोकांची आवडनिवड न करिता त्या सर्वांबरोबर बहीण-भावंडांप्रमाणे सत्यवर्तन करण्याचा क्रम चालू करा, म्हणजे तुम्ही आपणा सर्वांच्या जगनियंत्यासमोर धन्य व्हाल.''

## ईश्वराकडचा रस्ता माणसांच्या हृदयातून

आपल्यावरून जग ओळखावे, हे तत्त्व म्हणजे फुल्यांच्या धर्मविषयक समग्र विचारसरणीचे अधिष्ठान म्हणता येईल, अशा अर्थाचे विधान पहिल्या प्रकरणात केले होते. प्रस्तुत पुस्तकाच्या ओघात त्यांच्या विचारांशी आपला जो परिचय झाला, त्यावरून हे विधान योग्य असल्याचे एव्हाना स्पष्ट झाले आहे. धर्माद्वारे माणसाचे ईश्वराशी नाते जोडले जाते. परंतु हे नाते जगातील इतर माणसांना बाजूला ठेवून केवळ तो माणूस आणि ईश्वर यांच्यात प्रत्यक्ष वा थेट संबंध निर्माण करीत नाही. उलट, माणूस त्या इतर माणसांशी जितका चांगला वागेल, तितके त्याचे ईश्वराबरोबरचे नाते दृढ होत जाते. म्हणून तर ते पुन:पुन्हा म्हणतात,[१०६]

*खरी हीच नीती मानवाचा धर्म । बाकीचे अधर्म । जोती म्हणे ।।*

किंवा

*मानवाचा धर्म सत्य हीच नीती । बाकीची कुनीती । जोती म्हणे ।।*

किंवा

*मानवी नीती हीच धर्मनीती । बाकीची कुनीती । जोती म्हणे ।।*

त्यांच्या धर्माचे स्वरूप हे असे ईश्वरसापेक्ष, परंतु मानवाधिष्ठित आहे. माणसाला ईश्वराकडे घेऊन जाणारा त्यांच्या धर्माचा रस्ता इतर माणसांच्या हृदयांतून जातो, असेही याचे वर्णन करता येईल. किंबहुना तो रस्ता त्या हृदयांपर्यंतच जातो आणि तेथे पोहोचणे हाच ईश्वराकडून झालेला मानवाचा औपचारिक नव्हे, तर वास्तव अंगीकार होय, असेही म्हणता येईल.

■

# संदर्भ सूची

१. महात्मा फुले : समग्र वाङ्मय, संपा : डॉ. स. ग. मालशे, श्री. धनंजय कीर, (संक्षेप-माकी); १९६९, मुंबई, पृ. ४४९.
२. माकी पृ. ४४९.
३. माकी पृ. ४५८.
४. माकी पृ. ४५६-४५८.
५. माकी पृ. ४८३
६. जोतीराव फुले समग्र ग्रंथ, अधिकारी प्रकाशन, (संक्षेप-अधि.); १९६३, पुणे, पृ. २७१
७. 'सोबत' पुणे, दि. ४-१२-८८ व ११-१२-८८
८. अधि पृ. ९०
९. सार्वजनिक सत्यधर्म पुस्तक, प्रकाशक : राजेंद्र विठ्ठल रघुवंशी प्रकाशन (संक्षेप-रघु.), मुंबई २८, पृ. १
१० १.१००,१०१
११. शेतकऱ्याचा असूड : संपादक : वासुदेव मुलाटे, (संक्षेप-असूड), पुनर्मुद्रण १९८८, औरंगाबाद, पृ. ७६.
१२. अधि पृ. ४१
१३. असूड पृ. ७४-७५
१४. असूड पृ. ७४-७५
१५. रघु पृ. ४१
१६. माकी पृ. ३०७
१७. अधि पृ. ५०
१८. रघु पृ. २१
१९. रघु पृ. ४४-४५
२०. माकी पृ. ४४९
२१. रघु पृ. ७
२२. माकी पृ. ४९३

२३. माकी पृ. ४५८०
२४. माकी पृ. ४५३
२५. माकी पृ. ४४९
२६. असूड पृ. ८५
२७. रघु पृ. ४८-४९
२८. रघु पृ. ३
२९. रघु पृ. १३
३०. रघु पृ. ६८
३१. रघु पृ. ३७
३२. रघु पृ. ३४
३३ माकी पृ. ४६५
३४. रघु पृ. १२
३५. रघु पृ. १३
३६. रघु पृ. ४
३७. माकी पृ. ४७१
३८. रघु पृ. ३२
३९. माकी पृ. ४४७-४४८
४०. माकी पृ. ४८२
४१. माकी पृ. ४५७
४२. महात्मा जोतीराव फुले, ले. धनंजय कीर, १९६८, मुंबई, पृ. ३२०
४३. रघु पृ. ८
४४. अधि १८८-१९३
४५. महाराष्ट्र टाइम्स, १० सप्टेंबर १९९१
४६. रघु पृ. ५३
४७. असूड पृ. ६६
४८. अधि पृ. २८३
४९. माकी पृ. ४७६
५०. अधि २६२
५१. रघु पृ. २५
५२. असूड पृ. १
५३. असूड पृ. ७०
५४. असूड पृ. १८
५५. माकी पृ. २८६-२८७

५६. महात्मा फुले गौरव ग्रंथ, पी. बी. साळुंखे, (संक्षेप-गौरव ग्रंथ), १९८२, मुंबई, पृ. १०९
५७. महात्मा फुलेंची बदनामी : एक सत्यशोधन, १९८९, पुणे, पृ. ४४-४५
५८. असूड पृ. ७२
५९. गौरव ग्रंथ पृ. ४७
६०. दासबोध, संपादक : शं. श्री. देव, अकरावी आवृत्ती, १९८२, पुणे १४.८.३१-३२
६१. अधि पृ. ९५
६२. रघु पृ. १९
६३. माकी पृ. २८५
६४. माकी पृ. ४५०
६५. माकी पृ. ४८९
६६. माकी पृ. ४८२
६७. अधि पृ. २९३
६८. असूड पृ. ७१
६९. २.१.१०
७०. माकी पृ. ४९०
७१. ८.२७२
७२. माकी पृ. ४९०
७३. माकी पृ. ४९०
७४. असूड पृ. ३९
७५. माकी पृ. १३
७६. म. जोतीराव फुले, पृ. १३
७७. म. जोतीराव फुले, पृ. ३४
७८. म. जोतीराव फुले, पृ. १९-२०
७९. असूड पृ. ८०
८०. म. जोतीराव फुले, पृ. ४७
८१. असूड पृ. १४
८२. असूड पृ ४१
८३. रघु पृ. १९
८४. माकी पृ. ३००
८५. अधि पृ. १२७-१२९

124306.
31.3.08

I. I. A. S. LIBRARY

Acc. No.

This book was issued from the library on the date last stamped. It is due back within one month of its date of issue, if not recalled earlier.

CP&SHPS—519-I.I.A.S./2004-25-6-2004-20000.

Library IIAS, Shimla
MR 891.461 5 Sa 38 M

00124306

# आमची इतर प्रकाशने

**जोतीबा फुले आणि स्त्री-मुक्तीचा विचार**
डॉ. गेल ऑम्व्हेट — २० रु.

**महात्मा फुले यांचे शैक्षणिक कार्य**
प्रा. तानाजी ठोंबरे — २० रु.

**महात्मा फुले आणि शेतकरी चळवळ**
डॉ. अशोक चौसाळकर — २० रु.

**जोतीरावांची समता-संकल्पना**
भास्कर लक्ष्मण भोळे — २० रु.

**महात्मा फुले आणि सांस्कृतिक संघर्ष**
भारत पाटणकर — २० रु.

**महात्मा फुले आणि धर्म**
आ. ह. साळुंखे — २० रु.

**डॉ. आंबेडकर यांचे राजकीय विचार**
प्रा. म. द. देशपांडे — ३० रु.

**डॉ. आंबेडकरांच्या सामाजिक आणि राजकीय चळवळी**
कृष्णा मेणसे — ३० रु.

**महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांचे आर्थिक आणि सांस्कृतिक विचार**
पी. डी. दिघे — [illegible]

Library IIAS, Shimla
MR 891.461 5 Sa 38 M
00124306

**महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांच्या राजकीय व सामाजिक चळवळी**
तानाजी ठोंबरे

**विठ्ठल रामजी शिंदे यांचे बहुजनवादी राजकारण**
भा. ल. भोळे — ५० रु